१९५०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. नं. २५६




# लोकयात्रा

जोशी

REFBK 0011392
REFBK-0011392

भाग १८६०



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ११३९२

# लोकयात्रा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
क्रम २६४४८ ..... वि: प्र-प्रवास
क्रमांक ....२५५....... नों: दि: २४/३/६०

श्रीपाद जोशी

किंमत

REFBK-0011392

इनामदार बन्धु प्रकाशन : पुणें

□ प्रकाशक :

बा. शा. इनामदार
इनामदार बन्धु प्रकाशन
९९१ सदाशिव : पुणें २

□ मुद्रक :

रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार : पुणें २

□ प्रथमावृत्ति :

१५ फेब्रुवारी १९६०

□ सजावट :

सुधाकर खासगीवाले

□ पुढील आवृत्तीचे
हक्क लेखकाचे स्वाधीन


प्रवासाची
आवड
असणाऱ्या
कुमार-मित्रांना

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम [illegible] वि. [illegible]
क्रमांक [illegible] नों. दि. [illegible]

वाटचाल :

- प्रवासांतील क्षणचित्रें
- सौराष्ट्र
- केरळ
- उत्कल
- भारताची एकात्मता

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २६४४७ ... वि: भू-प्रवास
क्रमांक ... २५६ ... नों: दि: २४.३.६०



# प्रवासांतील क्षणचित्रें

ना. क्र. ११३८२

लेखन हा माझा व्यवसाय, म्हणजेच उपजीविकेचें साधन असल्यामुळे, रस्त्याच्या कडेला बसलेला चांभार जसा येणाऱ्या-जाणाऱ्यांच्या पादत्राणांकडे दुरुस्तीच्या इच्छेने नजर ठेवून असतो, त्याप्रमाणे प्रत्येक गोष्टीकडे पाहतांना हिच्यांतून आपल्याला कितपत लेखनसामग्री मिळूं शकेल, याचाच विचार माझ्या मनांत प्रामुख्याने घोळत असतो. अर्थात् कित्येक घटनांमधून कांहीच विषय मिळत नाही आणि मोठ्या आशेने फोडलेला नारळ कुजका निघावा तशी माझी स्थिति होते; तर कधी कधी एकाच वेळीं इतके विषय डोक्यांत गर्दी करतात की, त्यांच्यापैकी एकाकडेहि नीट लक्ष पुरवितां येत नाही! पुष्कळसे साबणाचे फुगे किंवा पुष्कळ म्हाताऱ्या एकदम पकडण्याच्या प्रयत्नांत आपल्या हातीं एकहि फुगा किंवा म्हातारी लागत नाही, त्याप्रमाणे सगळे विषय पाहतां-पाहतां उडून जातात आणि मी बावळटाप्रमाणे त्यांच्याकडे पाहत राहतों! तरी पण माझा तो छंद कांही सुटत नाही.

## प्रवासाची प्रेरणा व फायदा

ही जर रोजच्या जीवनांतील मामुली घटनांची गोष्ट, तर एखादा दूरचा प्रवास करण्याची संधि आली असतां मला किती आनंद होत असेल याची कल्पनाच केलेली बरी. मला स्वतःला प्रवास ही एक मोठी मेजवानीच वाटते. माझ्या मानसिकच नव्हे, तर शारीरिक स्वास्थ्यावरहि प्रवासाचा

फार चांगला परिणाम होतो असा माझा अनुभव आहे. लागोपाठ तीन-चार महिनेपर्यंत जर मला एके ठिकाणीं राहावें लागलें, मग तें घरीं असो की बाहेर असो, तर माझें वजन घटूं लागतें. आणि मग सौभाग्यवती हळूच आठवण करते, 'हल्ली तुमची तब्येत कांही ठीक दिसत नाही. बऱ्याच दिवसांत कुठं बाहेर गेलां नाहींत तुम्ही, म्हणून वाटतं? मग जाऊन या ना कुठं तरी!' आणि मग मीहि प्रवासासाठी निमित्त शोधूं लागतों. अर्थात् प्रवासामुळे लिखाणासाठी अनेक विषय मिळतात, प्रवासवर्णनाचे लेख तयार होतात आणि पुढे-मागे त्या लेखांचा संग्रहहि प्रकाशित होण्याची शक्यता निर्माण होते, हा आर्थिक फायदाहि कांही कमी महत्त्वाचा नसतोच!

## अतिपरिचयात् अवज्ञा

परंतु माझ्यामध्ये एक मोठी उणीव आहे. अपरिचित व नवीन ठिकाणाबद्दलच लिहिण्याची इच्छा मला होते. 'अतिपरिचयात् अवज्ञा' म्हणतात ती हीच. वस्तुतः ज्या स्थानाबद्दल आपल्याला भरपूर माहिती आहे, ज्या लोकांमध्ये आपण वर्षानुवर्षे राहिलों आहोंत, त्यांच्याविषयीच आपण लिहिणें योग्य नाही काय? ज्या शहरांत किंवा प्रदेशांत मी कांहीं दिवस, किंबहुना कांही तासच घालविले आहेत, त्यांच्याबद्दल लिहितांना माझ्या लेखणीला जो उत्साह वाटतो, त्यांत जशी ती रंगते, तशी परिचित शहरा–प्रदेशांबद्दल लिहितांना ती रंगत नाही. आणि जरी मी 'लेखन-कामाठी'गिरी करीत असलों—'कलमका मज़दूर' असलों, तरी माझ्या औजारावर, माझ्या लेखणीवर माझी फार ममता आहे. तिच्या इच्छेविरुद्ध तिला कांहीं लिहावें लागूं नये याची मी खबरदारी घेत असतों. म्हणूनच चार-दोन तासांत किंवा एक-दोन दिवसांत पाहिलेल्या गोष्टींविषयी लेख लिहिल्याबद्दल जरी माझे कांही मित्र मला दोष देत असले, तरी माझ्या लेखणीचे लाड किंवा हौस पुरविण्यासाठी मी तो लेखनप्रकार सोडून देत नाही.

## गंतव्य स्थानासंबंधी गाडींत वाचन

अर्थात् केवळ शैलीच्या जादूगिरीवर किंवा भाषेच्या फुलोऱ्यावर

आपल्या वाचकांना झुलवावें, या मताचा मी नाहीं. माझा प्रवासवर्णनात्मक लेख वाचल्यानंतर आपल्याला कांहीं तरी नवीन माहिती मिळाली, असें माझ्या वाचकांना वाटलें पाहिजे अशी माझी धडपड असते. म्हणून रिकाम्या डोक्याने ( अर्थात् आंतरिक ! ) कोठेहि न जातां, ज्या ठिकाणीं जायचें असेल तेथील स्थानें, लोक, वैशिष्ट्यपूर्ण गोष्टी वगैरेसंबंधीची जास्तींत जास्त माहिती पूर्वींच डोक्यांत भरून घेऊन मी प्रवासाला जात असतों. त्यामुळे अनेक वेळां तेथील स्थानिक लोकांपेक्षा माझ्याजवळच त्या स्थाना-विषयी जास्त माहिती ( प्रत्यक्ष पाहण्यापूर्वींच ) जमलेली असते. अर्थात् त्यासाठी मिळतील तेवढीं पुस्तकें वाचून काढावीं लागतात. रोजच्या कामाच्या गडबडींत हीं पुस्तकें निवांतपणें वाचणें शक्य नसतें, आणि निवांतपणें वाचल्याखेरीज त्यांचा कांही उपयोगहि नसतो. म्हणून गाडींत किंवा मोटारींत हीं पुस्तकें वाचून काढण्याचा कार्यक्रम मी ठेवीत असतों. त्यामुळे वाचनहि होतें आणि गाडींतील गर्दीचा, गोंगाटाचा किंवा उकाड्याचा त्रासहि भासत नाही.

## परिचित दिल्लीची वारी

परंतु परवा दिल्लीला गेलों तेव्हा माझ्या गाडींतील कार्यक्रमांत दिल्ली-संबंधी पुस्तकें वाचण्याचा अंतर्भाव मीं केलेला नव्हता. याचें एक कारण असें की, दिल्लीशीं वर्तमानपत्रांच्या द्वारें आपल्या लोकांचा इतका निकट संबंध रोज येत असतो की, पुणें, मुंबई आणि दिल्ली हीं शहरें एकाच गावांतील तीन गल्ल्यांसारखीं आपल्याला परिचित वाटूं लागलेलीं आहेत. शिवाय दिल्लीसंबंधी इतक्या लोकांनी आजपर्यंत लिहिलेलें आहे की, आपण त्यापेक्षा अधिक कांही लिहूं शकूं असें मला वाटत नाही. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मी १९३९ पासून दिल्लीला ओळखून आहें. त्या वेळीं मीं दिल्लींत एक वर्ष काढलें होतें. त्यानंतर अधूनमधून अनेकदां दिल्लीच्या वाऱ्या मला कराव्या लागल्या आहेत. त्यामुळे दिल्ली ही मला मुंबईसारखीच वाटते.—कामापुरतें जायचें आणि काम होतांच परतायचें ! अर्थात् १९३९ सालची दिल्ली आणि आताची दिल्ली यांत जमीन-अस्मानाचें अंतर पडलेलें आहे. त्यावर एक छानसा लेख लिहितां येण्या-

सारखा आहे. ( पुढे-मागे मी लिहिणारहि आहें. ) पण त्यासाठीं गाडींत पूर्ववाचन करण्याची जरूर नव्हती. म्हणून प्रसिद्ध बंगाली लेखक श्री. शरदिंदु बंद्योपाध्याय यांनी मला भेट म्हणून दिलेला त्यांचा ' शरदिंदु बंद्योपाध्यायेर श्रेष्ठ गल्प ' हा कथासंग्रह मीं गाडींत वाचण्यासाठी बरोबर घेतला होता.

## डेहराडून एक्स्प्रेसची ' स्लीपिंग ॲकॉमोडेशन '

' सगळे रस्ते रोमला जाऊन मिळतात ' या इंग्रजी म्हणीप्रमाणे भारतांतील सगळे मार्ग दिल्लीला जाऊन मिळत असले तरी मुंबईहून दिल्लीला जाण्यासाठी मुख्य असे दोनच रेल्वे-मार्ग आहेत. एक बडोदा, रतलाम, कोटा, भरतपूर वगैरे शहरांवरून जाणारा, रेताड आणि रूक्ष असा पश्चिम ( पूर्वीची बी. बी. सी. आय्. ) रेल्वेचा मार्ग, आणि दुसरा म्हणजे भुसावळ, खांडवा, भोपाळ, झाशी, ग्वाल्हेर, आग्रा वगैरे ऐतिहासिक आणि प्रेक्षणीय स्थानांवरून जाणारा समृद्ध व सुपीक प्रदेशांनी युक्त मध्य-रेल्वेचा ( पूर्वीची जी. आय्. पी. ) मार्ग. यांपैकी मध्य-रेल्वेच्या मार्गाने दिल्ली शंभर मैल लांब पडत असली ( एकूण मैल ९५७ ) तरी वाळवंटांतून जाण्यापेक्षा मीं त्याच मार्गाने जावें अशी कांही मित्रांनी मला शिफारस केली होती. पण मी दोन्ही मार्गांनी अनेक वेळां गेलों—आलों असल्यामुळे, वाटेंतील प्रदेशाच्या सौंदर्याचें आकर्षण मला विशेष उरलेलें नव्हतें. उलट पश्चिम-रेल्वेने वेळ बराच वांचत असल्यामुळे आणि त्यांत ३६ तासांपैकीं २४ तासांच्या दोन रात्रीच असल्यामुळे मीं तोच मार्ग पसंत केला. शिवाय रात्रीला तीन रुपये या दराने झोपण्याची सोय असलेली एकमात्र गाडी ' डेहराडून एक्सप्रेस ' ही पश्चिम मार्गावरून धावत असल्यामुळे तेंहि एक आकर्षण होतेंच. मी इतका प्रवास करीत असलों तरी गाडींत किंवा मोटारींत मला झोप येऊं शकत नाही हें खरें; पण पाठ टेकायला हक्काची जागा असणें यांत एक खास समाधान असतेंच. शिवाय पहिल्या रात्रीं झोप आली नाही तरी दुसऱ्या रात्रीं ती येतेच. हिंदु साध्वीप्रमाणे ती यजमानाला सोडून कुठे जाणार ?

## भिन्नभाषिकांची सोबत

पश्चिम—रेल्वेचा मार्ग स्वीकारण्यांत माझा आणखी एक छुपा हेतु होता.

मध्य–रेल्वेवरील जवळजवळ निम्म्या वाटेपर्यंत मराठीभाषिकांची ये–जा असते. त्यामुळे अन्य-भाषिकांशीं फारसा संबंध येत नाही. याच्या उलट पश्चिम–रेल्वेवर शें-सव्वाशें मैलांतच मराठी मुलूख संपतो, आणि तोहि रात्रीच्या वेळीं निघून जातो. त्यामुळे या प्रवासांत गुजराती किंवा हिंदी-भाषिकांशीं विशेष संबंध येण्याची शक्यता असते. भिन्न-भाषिकांशीं ऐसपैस गप्पा मारण्यांत कांही और मजा असते. आपल्या प्रांताविषयी त्याच्या-पाशीं आपल्याला वाटेल तशा थापा मारतां येतात, आणि वर्तमानपत्रांत किंवा पुस्तकांत वाचायला न मिळणारी किती तरी माहिती त्या त्या भागांतील सहप्रवाशांच्या तोंडून आपल्याला ऐकायला मिळते. अर्थात् यामुळे ज्ञानांत भर पडली नाही तरी मनोरंजन खासच होतें.

**शांतपणें गेलेली रात्र**

गाडीला गर्दी भरपूर होती. परंतु झोपण्याच्या डब्यांत रात्रीं फक्त रिझर्व्हेशन केलेल्या उतारूंनाच बसतां येतें आणि भिंतीशीं अडकवून ठेवलेली झोपायची फळी ( बर्थ ) एकदा खाली पाडली की इच्छा असली तरी खालच्या बाकावर कोणाला बसतां येत नाही; खालच्या बाकाचें रिझर्व्हेशन केलेल्या माणसालाहि मग झोपणेंच भाग पडतें. यामुळे आमच्या डब्यांतील लोकांना गर्दीचा त्रास झाला नाही. अधूनमधून 'गलती'ने किंवा जाणूनबुजून कांही प्रवासी डब्यांत घुसून येत, पण लौकरच चेकर येऊन त्यांना बाहेर काढीत असे.

आमच्या डब्यांत अनेक प्रांतांची आणि भाषांची मंडळी होती. मराठी-भाषिक मी एकटाच होतों. एक बंगाली जोडपें होतें, पारशासारखा दिसणारा एक बोहरी मुसलमान होता, एक पेशावरी हिंदु निर्वासित होता, मध्य-भारताच्या विधानसभेचे एक जनसंघीय आमदार होते. ( हे दुसऱ्या दिवशीं आले. पहिल्या दिवशीं आम्ही पांचसहा मंडळीच होतों ! ) यामुळे रात्र शांतपणें गेली.

**बंगाली गृहस्थांशीं ओळख**

माझ्या हातांतील शरदिंदुबाबूंचें बंगाली पुस्तक पाहून गाडींतील बंगाली गृहस्थांना माझ्याबद्दल कुतूहल वाटलें, ( त्यांना तें वाटावें अशा

अपेक्षेनेच मीं तें पुस्तक त्यांच्या सहज नजरेला पडावें असें धरलें होतें !) आणि त्यांनी माझी चौकशी केली. शरदिंदुबाबूंनी स्वतःच्या हस्ताक्षरांत तें पुस्तक मला भेट दिलेलें पाहून तर त्यांना अचंबाच वाटला आणि मी कुणी सामान्य माणूस नाहीं याची त्यांना खात्री पटली. (आणि अशा प्रकारें माझा हेतु सफळ झाला !) त्यानंतर आमची चांगली दोस्ती जमली. ते गृहस्थ तेजपूर-(आसाम)-चे व्यापारी होते; त्यांना स्वतःला ललित साहित्याबद्दल विशेष आकर्षण नव्हतें. म्हणून त्यांनी आपल्या सौभाग्यवतीला माझ्या हातांतील पुस्तक वाचायला दिलें. (आणि तिचें तोंड बंद केलें !) आणि माझ्याशीं गप्पा मारायला सुरुवात केली. माझ्या हातांतील पुस्तक निघून गेल्यामुळे मलाहि त्यांच्याशीं गप्पा मारण्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाही. बंगाली आणि कोकणी (विशेषतः गोव्याच्या) लोकांना बोलण्याची विशेष आवड असते, असा माझा अनुभव आहे, तो जास्त दृढ झाला.

## मुंबईकर लोकांचे कांही सद्‌गुण

आपल्यांतील गुणदोषांची माहिती नेहमीच आपल्याला असते असें नाही. पुष्कळ वेळां आपल्याला जे सद्‌गुण वाटतात ते इतरांच्या दृष्टीने दोष ठरतात, तर आपल्याला ज्या गुणांची कांही किंमत वाटत नाही त्यांच्याबद्दल इतरांना भलतेंच कौतुक वाटत असल्याचें आपल्याला आढळून येतें. आता त्या गाडींतील बंगाली सद्‌गृहस्थांचेंच मत मी सांगतों. ते मला म्हणाले, " मुंबईतील मला सर्वांत अधिक आवडलेली गोष्ट म्हणजे स्वच्छता. इतकी स्वच्छता कलकत्त्यांत किंवा उत्तर-प्रदेश, बंगाल, बिहार, आसाम वगैरे उत्तरेकडील अथवा पूर्वेकडील प्रदेशांत मला कुठंच आढळली नाही. "

" पण आम्हांला तर मुंबईची स्वच्छता अगदीच सामान्य वाटते. " मी म्हणालों.

" कारण तुम्हीं खरी अस्वच्छता पाहिलेली नाही. " त्या गृहस्थांनी उत्तर दिलें.

" बरं, आणखी कोणती गोष्ट आवडली तुम्हांला आम्हां लोकांची ? " मीं विचारलें.

" आम्हां पूर्व-भारतीय लोकांपेक्षा तुम्हां मराठी नि गुजराती लोकांमध्ये धूम्रपानाचं प्रमाण खूपच कमी दिसलं मला. आमच्याकडे घरोघरीं हुक्का नाही तर सिगारेट्स् यांचा बेसुमार वापर तुम्हांला हटकून आढळेल. वस्तुतः आमच्याकडे तंबाखू कांही पिकत नाही; ती इकडेच पिकते;—पण ती ओढण्याचं प्रमाण मात्र आमच्याकडेच भयंकर आहे. "

" आमची आणखी कोणती गोष्ट तुम्हांला चांगली वाटली ? " मीं विचारलें.

" मुंबई-पुण्याकडे स्त्रीला जें स्वातंत्र्य आहे, इथली स्त्री जितक्या निर्भयपणें हिंडते, तें पाहिलं कीं मन थक्क होतं. इथल्या स्त्रिया एकट्या वाटेल तिथं जाऊं शकतात, लांबचा प्रवाससुद्धा करतात, ही गोष्ट मला मोठी कौतुकास्पद वाटते. "

" अहो, पण बंगाली बायकाहि खूप सुधारल्या आहेत, असं आम्ही ऐकतों. त्याचं काय ? "

" आमच्या बायकांची सुधारणा फक्त शिक्षण अन् नटणंमुरडणं, कपडालत्ता, फॅशन, एवढ्यापुरतीच आहे. मराठी आणि गुजराती स्त्री-इतकी बंगाली स्त्री स्वतंत्रपणें वावरूं शकत नाही. यांत तिचा दोष किती आहे अन् आमच्या समाजाचा किती आहे, हें सांगणं कठिण आहे. पण तुमची स्त्री मुक्तपणें हिंडूं शकते ही गोष्ट तुमच्या समाजाला भूषणावह आहे, यांत मात्र मुळींच शंका नाही. " त्यांनी खुल्या दिल्याने कबुली दिली.

## तसेंच कांही दोषहि !

" अहो, पण कांही दोषहि तुम्हांला आमच्या लोकांत आढळले असतीलच की नाही ? " मीं मुद्दाम पृच्छा केली.

" दोष काय, सर्वांतच असतात. कुणांत कमी, तर कुणांत जास्त. माणूस सर्वगुणसंपन्न थोडाच असतो ? "

" तरी पण ! " मीं विशेष आग्रह धरला.

" आता तुम्ही विचारतांच आहांत, म्हणून सांगतों. मुंबईतील लोक इतरांच्या सोई–गैरसोईची पर्वा फारशी करीत नाहीत. पाणी वगैरे टाकतांना तें कुणाच्या अंगावर तर पडत नाही ना याची फिकीर कुणी बाळगीत

नाही. तसंच पान खाऊन त्याची पिचकारी कुठं टाकावी याचाहि फारसा विधिनिषेध आढळला नाही मला. ”

“ खरं आहे तुमचं म्हणणं ! या पानाच्या पिचकाऱ्यांविरुद्ध मध्यंतरीं मुंबईस मोठा प्रचार सुरू करण्यांत आला होता. त्या बाबतींत एखादा कायदा करण्याचाहि विचार चालू होता. पुढं-मागं तसा कायदा झाल्याशिवाय राहणार नाही; आणि कायदा झाला म्हणजे हळूहळू ही गलिच्छ सवय नाहीशी होईल. एस्. टी.च्या गाड्यांतून आणि नाटक–सिनेमागृहांतून धूम्रपानाचं उच्चाटन झालंच आहे ना ? ” मीं त्यांना थोडें सांत्वन दिलें.

## हिंदीवाल्यांचें एकराष्ट्रीयत्वाचें तुणतुणें

आजकाल कुणीहि शेंबड्या पोरानें उठावें आणि महाराष्ट्रीय लोकांना राष्ट्रीयत्वाचा आणि लोकशाहीच्या मार्गांचा उपदेश करावा अशी स्थिति झालेली आहे. त्यांतहि ज्यांची मातृभाषा हिंदी आहे, त्यांचा या बाबतींतला उत्साह कांही औरच असल्याचें दिसून येतें. त्यांची हिंदी भाषा भारताची राज्यभाषा झाल्यामुळे इतर भाषिकांना उपदेश देण्याचा हक्कच आपल्याला प्राप्त झाला आहे, अशी कांहीशी शिष्टपणाची भावना त्यांच्यामध्ये दिसून येते.

गप्पांच्या ओघांत मुंबईच्या दंगलीसंबंधी चर्चा निघणें क्रमप्राप्तच होतें. कारण तिच्यासंबंधी वर्तमानपत्रांतून उलटसुलट बातम्या त्या वेळीं प्रकाशित होत होत्या. माझ्याजवळ असलेलें डॉ. वसंत रणदिवे यांचें ‘ अन्‌हॅपी बॉम्बे ’ ( दुःखी मुंबई ) हें इंग्रजी पुस्तक मी गार्डीतील मित्रांना वाचायला दिलें. त्यावरून बोलणें निघतां निघतां एक हिंदीभाषी मित्र म्हणाले, “ तुम्ही दक्षिणेकडले लोक आपल्या प्रांतीय भाषांना भलतेंच महत्त्व देत असतां. तुम्हांला तुमच्या भाषांपुढं एकराष्ट्रीयत्वाची कांही किंमतच वाटत नाही. खरं म्हणजे, भारतांतल्या सगळ्या भाषा ह्या घरगुती वापराच्या बोलीभाषा बनल्या पाहिजेत, आणि हिन्दी हीच एक सबंध भारतवर्षाची भाषा झाली पाहिजे. तरच आमचं ऐक्य टिकून राहील. ”

त्यांना लांबलचक आणि सडेतोड उत्तर देणें कांही मला आवघड नव्हतें; पण त्याचा त्यांच्यावर कांही परिणाम होणार नाही हें मी ओळखून होतों. म्हणून मी फक्त हसत हसत टोला हाणला, “ एकराष्ट्रीयत्वाचा मक्ता

फक्त आपल्याकडेच आला आहे अशी जी तुम्ही हिंदीवाल्यांनी स्वतःची समजूत करून घेतलेली आहे ती चुकीची असल्याचं लौकरच तुमच्या लक्षांत येईल. हिंदी हीच सगळ्या राष्ट्राची एकमेव भाषा असावी असं म्हणणारे प्रामाणिक लोक दक्षिणेंतहि आहेत; पण तें मत मान्य नसणारे विनोबा, राजाजी, शंकरराव देव वगैरे थोर पुरुष तुमच्यापेक्षा कमी राष्ट्रीय आहेत, ही कल्पना जितक्या लौकर तुमच्या डोक्यांतून निघून जाईल तितकं बरं! आणि एक भाषा असलेल्यांमध्ये भांडणं नसतात म्हणून कुणी सांगितलंय तुम्हांला? आपल्या पायांखाली काय जळतंय तें पहा ना जरा!"

पण हा विषय आम्हीं वाढवला नाही. इतर विनोदी चुटके सांगण्याचा कार्यक्रम सुरू झाला आणि दिल्ली केव्हा आली तें कळलेंहि नाही आम्हांला!

* * *

## येतांना फर्स्ट क्लासच्या जगांतून

निदान लेखकांनी तरी आगगाडीचा प्रवास थर्ड क्लासमधूनच करावा अशा मताचा मी आहें; कारण त्यामुळे चांगला जनसंपर्क घडतो आणि किती तरी नवीन गोष्टी कळतात. शिवाय, डेहराडून एक्स्प्रेससारखी झोपण्याची सोय असेल तर मग दुसऱ्या वर्गाची जरूरच भासतां कामा नये. पण ज्या संस्थेच्या कामासाठी मी दिल्लीला गेलों होतों तिचा असा नियम आहे की, ज्या वर्गाने प्रवास केला असेल त्याच वर्गाचें भाडें द्यायचें त्यामुळे थर्ड क्लासने प्रवास करून फर्स्ट क्लासचें भाडें उकळण्याचा राजरोस (सरकारी!) मार्ग अवलंबिणें तेथे शक्य नव्हतें. म्हणून मी येतांना फर्स्ट क्लासने येण्याचें पसंत केलें. फ्रँटियर मेलने आल्यामुळे १२ तास वेळहि वांचतो आणि फर्स्ट क्लासची चैनहि होऊन जाते, असा विचार करून मी फ्रँटियर मेलने निघालों. सकाळीं ८-३० ला दिल्लीहून निघालेली ही गाडी दादरला रात्रीं ८-२६ ला पोंचते. यावरून तिच्या वेगाची चांगली कल्पना येऊं शकेल. अशी संधीहि मराठी लेखकाच्या आयुष्यांत नेहमीच येते असें नाही. म्हणून ती दवडायची नाही असें मीं ठरविलें. श्रीकृष्णाच्या द्वारकेच्या राजवाड्यांत सुदाम्याला जसें चुकल्याचुकल्यासारखें वाटलें तसें फ्रँटियरच्या कोऱ्या करकरीत फर्स्ट क्लासच्या डब्यांत मला जरा बिचकल्यासारखें झालें तरी प्रवास मात्र मजेंत झाला.

## आपापल्या क्षेत्रांतील बडे लोक

पहिल्या वर्गातून प्रवास करतांना सामान्यतः ज्या प्रकारचे लोक आपल्याला आढळतात त्याच प्रकारचे लोक आमच्या डब्यांत होते.—डब्यांत म्हणजे खोलींत. आमच्या खोलींत आम्ही चारजण होतों. त्यांपैकी तिघे महाराष्ट्रीय : एक नागपूरकडले, दुसरे हुबळीकडले आणि तिसरा मी, पुण्याचा. म्हणजे संयुक्त महाराष्ट्राचे तीन प्रतिनिधि आम्ही तेथे होतों. नागपूरचे गृहस्थ म्हणजे मुंबई—सरकारचे डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज श्री. मंडलेकर हे होते, आणि दुसरे श्री. महाडेश्वर हे मध्यवर्ती सरकारच्या इन्कम्-टॅक्स खात्यांत बडे ऑफिसर आहेत. प्रारंभीं हे दोघेहि जरा आपल्याच रुबाबांत होते; पण त्यांना जेव्हा माझी माहिती (व महती) समजली तेव्हा लगेच ते खेळीमेळीने बोलूं लागले आणि गाडींत असेपर्यंत आमची चांगलीच गट्टी जमली. श्री. महाडेश्वर हे विशेष आध्यात्मिक वृत्तीचे आणि ज्ञानेश्वरभक्त दिसले. ज्ञानेश्वरीचें हिंदींत ओवीबद्ध भाषांतर करून तें प्रसिद्ध करण्याची त्यांची इच्छा आहे. खूप पैसा मिळवावा आणि तो सत्कारणीं खर्च करून टाकावा, अशी त्यांची वृत्ति दिसली. (त्या वेळीं माझ्याबरोबर असलेलीं माझीं बहुतेक सगळीं पुस्तकें त्यांनी मोठ्या हौसेने विकत घेतलीं !)

## उद्योगपतीचें दुःख

चौथे गृहस्थ कौल नांवाचे काश्मिरी ब्राह्मण होते. ते मूळ आग्ऱ्याचे राहणारे. सध्या गाझियाबाद येथे त्यांचा 'एव्हरेस्ट' नांवाचा एक हातमागाचा कारखाना आहे. केवळ एक हजार रुपयांवर सुरुवात करून आज त्यांनी लाखों रुपयांच्या किमतीची फॅक्टरी उभी केली आहे. स्वतःच्या कारखान्यांतील कांही टॉवेल्स (टर्किश) आणि कापडांचे नमुने त्यांनी दाखविले. ते पाहून मीच नव्हे, तर श्री. मंडलेकरहि थक्क होऊन गेले. इतका उत्कृष्ट माल भारतांत आणि तोहि हातमागावर निघूं शकत असेल अशी मला स्वप्नांतहि कल्पना नव्हती. या मालासाठी श्री. कौल मदुरेच्या एका विशिष्ट गिरणींतील सूत वापरीत असतात. म्हणजे एक प्रकारें त्यांचें कापड संपूर्णपणें स्वदेशी असतें. मध्यंतरीं रशियन पुढारी ख्रुश्चेव आणि

अनुक्रम २६४४७ वि: भू-प्रवास

क्रमांक ... नों. दि. २४/२/५०

बुल्गानिन हे आले असतां त्यांना भेट म्हणून देण्यासाठी स्नानोत्तर पायपुसणीं श्री. कौल यांच्याकडूनच करवून घेण्यांत आलीं होतीं. त्यांचा माल खूपच महाग असतो. त्यांनी दाखविलेल्या एका टॉवेलची किंमत बारा रुपये होती ! पण तरीहि त्यांना सरकारच्या आणि बिनसरकारी श्रीमंतांच्या इतक्या ऑर्डर्स असतात की, त्या पुऱ्या करणें त्यांच्या शक्तीबाहेर होतें.

" मग तुम्ही आपला कारखाना वाढवीत कां नाही ? " मीं त्यांना विचारलें.

" वाढवून काय करूं ? रिकामा त्रास विकत घेऊं ? मी पांच हजार लोकांना काम देऊं शकेन; पण सध्या पांचशें लोक आहेत त्यांनाच संभाळणं कठिण होतं. रोज उठून सरकार जे नवनवीन नियम अन् कायदेफतवे काढतं त्यामुळं नको ही कारखानदारी असं होऊन गेलंय मला ! " ते वैतागाने उद्गारले.

" म्हणजे तुमच्यांत अन् कामगारांच्यांत फारसं सख्य नाही वाटतं ? " मीं जरा खोचून विचारलें.

" साफ चुकलांत तुम्ही. " ते हंसून म्हणाले, " माझ्या कारखान्यांतल्या लोकांशीं माझे संबंध फारच सलोख्याचे अन् घरगुती आहेत. तुम्हांला एकच उदाहरण सांगतों : माझ्या कारखान्यांतल्या एक-दोन चांगल्या तज्ज्ञांना सरकारनं मोठा पगार देऊं करून आपल्या खात्यांत येण्याचं प्रलोभन दिलं, पण थोडा कमी पगार घेऊनहि त्यांनी माझ्याकडेच राहायचं ठरवलं. कारण, माझ्याकडे त्यांना जितकं स्वातंत्र्य असतं, त्यांच्या बुद्धिमत्तेला जितका वाव असतो, तितका तो सरकारी चक्रांत सापडल्यानंतर राहणार नाही हें ते चांगलं जाणून आहेत. " श्री. कौल अभिमानाने म्हणाले.

" तुमच्या कारखान्यांत काश्मिरी लोकांचा भरणा खूपच असेल, नाही ? " मीं विचारलें.

" छेः, छेः ! याच्या अगदी उलट स्थिति आहे. " श्री. कौल म्हणाले, " माझ्या कारखान्यांत माझा कुणीहि नातेवाईक नाही; एवढंच नव्हे, तर काश्मिरीहि कुणी नाही. नातेवाइकांना मीं कटाक्षानं टाळलेलं आहे. माझ्याकडे सर्व जाती–जमातींचे आणि वेगवेगळ्या प्रांतांतले लोक आहेत. माझ्या येथील मुख्य डिझाइनर महाराष्ट्रीय गृहस्थ आहे. गुजराती, पंजाबी,

हिंदु, मुसलमान– सर्व प्रकारचे लोक माझ्या कारखान्यांत आहेत. त्यांची कांहीच तक्रार नाही. पण रोज उठून बदलणाऱ्या सरकारच्या अनिश्चित धोरणामुळं कारखाना चालवणं मोठं कठिण होऊन बसलं आहे. ”

त्यांचा मुख्य रोख अंबर चरखा, खादी यांना प्रोत्साहन देण्याच्या सरकारी धोरणावर होता. माझ्या अंगावरील कपडेच नव्हे, तर माझें बेडिंग आणि अंथरुणांतील सगळे कपडेहि खादीचे असल्यामुळे त्यांनी खादीच्या बाबतींत माझ्यावर प्रश्नांचा नुसता भडिमार केला. अर्थात् गेलीं पंचवीस वर्षें अशा भडिमारांना मी तोंड देत आलों असल्यामुळे मी कांही डगमगलों नाहीं. तरी पण माझें म्हणणें त्यांना पटलें नाही, हें मी सहज समजूं शकलों.

‘ काश्मिरी ब्राह्मण हा अर्धा मुसलमान असतो,’ असें म्हणतात. त्याच्या आवडीनिवडी, आहारविहार, राहणीकरणी ही बहुतांशीं मुसलमानासारखीच असते. मुसलमानांबद्दल त्याला विशेष आत्मीयता आणि प्रेमहि वाटतें. यामुळेच त्याला ‘ अर्धा मुसलमान ’ म्हणतात. श्री. कौलहि याला अपवाद नाहीत. त्यांच्या कारखान्याच्या डायरेक्टर्समध्ये एक बडे पाकिस्तानी मुसलमान गृहस्थ आहेत, आणि हिंदुस्थानांतहि त्यांचे अनेक मुस्लिम मित्र आहेत. उर्दू कवितेबद्दल त्यांना विलक्षण आपलेपणा आणि अभिमान वाटतो. उत्तर प्रदेशांतून उर्दू भाषेची हकालपट्टी करण्याचे जे पद्धतशीर प्रयत्न सरकार आणि हिंदीवाले करीत आहेत त्याबद्दल त्यांनी खेद आणि दुःख व्यक्त केलें. उर्दू साहित्याचा इतिहास हिंदी भाषेंत देणारें माझें ‘ उर्दू के अदीब ’ हें पुस्तक पाहून त्यांना मोठा आनंद झाला. त्यांतील ‘ चकबस्त ’ आणि ‘ जोश ’ या कवींच्या कविता मीं त्यांना वाचून दाखविल्या. कारण त्यांना हिंदी देवनागरी लिपि विशेष वाचतां येत नव्हती. त्यावरून ‘ जोश ’ कवींचा विषय निघाला. इतक्या राष्ट्रीय आणि क्रांतिकारक कवीने अखेर पाकिस्तानांत निघून जावें, ही गोष्ट मला अत्यंत क्लेशकारक वाटत होती. माझ्या अंतःकरणांतील वेदना मीं श्री. कौल यांना बोलून दाखविली. त्यांनाहि ती जाणवली; पण श्री. जोश हे त्यांचे जिवलग मित्र असल्यामुळे त्यांना त्यांची चांगली माहिती होती. त्यांच्या पाकिस्तानगमनाचें कारण त्यांनी असें सांगितलें की,– “ श्री. जोश यांच्यावर अवलंबून असणारें फार मोठें कुटुंब आहे. त्याच्या निर्वाहासाठी

लागणारी प्राप्ति भारतांत मिळविणें त्यांना अशक्य झालें. तेव्हा त्यांनी आपल्या पाकिस्तानी मित्रांकडे चौकशी केली असतां, ' तुम्ही पाकिस्तानांत आलांत तर आम्ही तुमची कांही तरी सोय करूं, ' असें त्यांना सांगण्यांत आलें. म्हणून ते पाकिस्तानांत गेले. तेथे त्यांना रिक्षाचें एक कंत्राट आणि ट्रक्सचा परवाना देण्यांत आलेला आहे. त्यांतून त्यांना हजारों रुपये मिळतात. परंतु त्यांचीं मतें पाकिस्तानी जनतेला पसंत नाहीत आणि त्यांनी मुस्लिम धर्मवेडाची आतापर्यंत टर उडविली असल्यामुळे पाकिस्तानच्या जाहीर जीवनांत त्यांना उजळ माथ्यानें मिरवतां येत नाही. ते कसेबसे एकान्तवासांत जीवन कंठीत आहेत..."

अर्थात् यांतील किती भाग खरा व किती काल्पनिक असेल हें सांगणें कठिण आहे. पण जोश कवींच्या भारत-त्यागामुळे सर्वसामान्य मुसलमानांबद्दल हिंदूंमध्ये पुनः एकदा अविश्वासाचें वातावरण निर्माण झालें आहे, आणि कोणता मुसलमान कोणत्या वेळीं पाकिस्तानांत निघून ( पळून ? ) जाईल हें सांगणें भल्याभल्यांनाहि शक्य राहिलेलें नाही हें मात्र नक्की. माझ्या कांही मुस्लिम मित्रांनीहि ही परिस्थिति माझ्याजवळ कबूल केली आहे.

## ' डेक्कन क्वीन 'मध्ये भेटलेले इंग्रज प्राध्यापक

अशा प्रकारें गप्पागोष्टींमध्येच फ्रॉंटियर मेलचा प्रवास संपला आणि. वाचायला घेतलेलें पुस्तक तसेंच राहून गेलें. मुंबईला तर काय, सगळ्या जगांतली घाई नि गर्दी एकवटली आहे. तिथे स्वास्थ्य नांवाची वस्तूहि दृष्टीला पडत नाही. तरी पण ( किंबहुना म्हणूनच ! ) तेथेहि जागतिक कीर्तीचे भारतीय तत्त्वज्ञ श्री. जे. कृष्णमूर्ति यांचीं व्याख्यानें ऐकण्यासाठी परीटघडीचे चेहरे घेऊन पारशी, गुजराती आणि क्वचित् मराठी ( पांढरपेशे ) लोक जमत असतात. श्री. जे. कृष्णमूर्तींच्या व्याख्यानांत मला विशेष रस नव्हता; पण तिथला तो ' भगत 'गणांचा मेळावा पाहण्याची मला उत्सुकता होती, म्हणून मीहि गेलों होतों. शाङ्गच्या गौरीसारखा मुखवटा आणि केतकीसारखा तुकतुकीत पिवळा रंग असलेली एक आंग्ल रमणी—अर्थात् पिंगट केस आणि पिंगट डोळे यांसह !— तेथे अगदी एकाग्रपणें कृष्णजींचें प्रवचन ऐकत होती. आजच्या साऱ्या दुःखाचें मूळ

' More '-( अधिक )-साठी धडपड हेंच आहे, हा त्या प्रवचनाचा मुख्य विषय होता. समोर जमलेल्या श्रोत्यांवर त्या विवेचनाचा कितीसा परिणाम झाला असेल याविषयी मी साशंकच आहें. पण मला वाटतें, इतर अनेक ' फॅशन्स 'प्रमाणे कृष्णजींच्या व्याख्यानाला हजर राहणें हीहि एक फॅशनच बनून गेली आहे हल्ली !

सारांश काय, मला मुंबईतहि निवांतपणा मिळाला नाही, त्यामुळे मुंबई-पुणें या तीन तासांच्या प्रवासांत तरी पुस्तक वाचण्याइतका निवांतपणा मिळावा म्हणून मीं डेक्कन क्वीनने यायचें ठरविलें. जातांना मी ' जनते 'ने गेलों होतों आणि बरोबर एक मित्र होते. त्यामुळे घरून बरोबर घेतलेलें पुस्तक जसेंच्या तसेंच राहिलें होतें. डेक्कन क्वीनला गर्दी नसते आणि तो दिवस रविवारचा असल्यामुळे तर त्या गाडींत फारच कमी लोक होते. त्यामुळे आता आपण झकपणें पुस्तक वाचीत जाऊं असें मला वाटलें.

माझ्या रिझर्व्ह केलेल्या डब्यांत—म्हणजेच खोलींत— जाऊन पाहिलें तों तेथे एक युरोपियन गृहस्थ बसलेले दिसले. दारावर नांव पाहिलें,— ' एच्. आर. मिल्स ' असें लिहिलेलें होतें. मी मनांत म्हणालों, ' बरं झालं, युरोपियन माणूसच सहप्रवासी म्हणून भेटला. एखादा हिंदी किंवा महाराष्ट्रीय प्रवासी असता तर त्याने कांही तरी विषय खात्रीने काढला असता. आता, मला इंग्रजी बोलण्याचा सराव नसल्यामुळे माझ्याकडून तरी संयम सुटणार नाही आणि हा युरोपियन माणूस माझ्यासारख्या ' काळ्या आदमी 'शीं कशाला बोलतोय ?... अन् हा इंग्रज असेल तर माझ्याकडे ढुंकूनहि पाहणार नाही !...

### इंग्रज असूनहि बोलका !

पण इथेहि माझा अंदाज चुकला. सदर गृहस्थ एक फार मोठे इंग्रज प्रोफेसर असून कोलंबो-योजनेप्रमाणे ते आशियाई देशांत दौरा करीत होते. त्याच दिवशीं ते कोलंबोहून आले होते. आणि आता पाषाणची ' नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ' आणि खडकवासल्याची ' वॉटर रीसर्च इन्स्टिटयूट ' ( सेंट्रल वॉटर अँड पॉवर रीसर्च स्टेशन ) या संस्था पाहण्यासाठी ते पुण्याला निघाले होते. इंग्रज माणूस सामान्यतः तुसडा आणि अनोळखी माणसाशीं

आपण होऊन न बोलणारा असतो, असें मीं वाचलें-ऐकलें होतें. पण या गृहस्थांच्या बाबतींत मला वेगळाच अनुभव आला. त्यांनी गाडी सुरू झाल्यावर 'इथं चहा मिळण्याची काय सोय आहे ?' या प्रश्नापासून सुरुवात केली ती पुण्याला पोंचेपर्यंत त्यांची टकळी चालूच होती. अर्थात् त्यांनी एकदा सुरुवात केल्यानंतर मी थोडाच गप्प बसणार ? 'इंग्लंडमध्ये आगगाड्यांतील व्यवस्था कशी असते,' येथपासून तों एकूण जागतिक राजकारणापर्यंत सर्व विषयांवरील त्यांचें म्हणणें समजावून घेण्याचा मीं प्रयत्न केला. आणि त्यांनीहि मोठ्या मोकळेपणाने माझ्या प्रश्नांना उत्तरें दिलीं.

## इंग्लंडमध्ये आर्थिक विषमता कमी

आगगाडीसंबंधीच्या माझ्या प्रश्नाला उत्तर देतांना ते म्हणाले, "इंग्लंडमध्ये आगगाडींत फक्त दोनच वर्ग असतात : एक वरचा आणि एक खालचा. बहुतेक सर्व लोक दुसऱ्या वर्गानेच प्रवास करतात. वरच्या वर्गाने प्रवास करणारा विरळाच. इंग्लंडमध्ये सर्वांत खालचा नि सर्वांत वरचा या वर्गांत फार मोठें अंतर नसतें. इथे तें अंतर फारच भयंकर आहे."

## तेलुगु आणि उर्दू भाषांचें ज्ञान

प्रो. मिल्स हे कांही वर्षें आंध्रमध्ये एका कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. त्या वेळीं त्यांनी तेलुगु भाषा चांगली आत्मसात् केली होती. अजूनहि ती भाषा आपल्याला चांगली येत असल्याचें त्यांनी सांगितलें. उर्दूचेंहि कामचलाऊ ज्ञान त्यांनी मिळविलेलें दिसलें. ते पाकिस्तानांत जाऊन आलेले असल्यामुळे तेथील राजकीय परिस्थितीसंबंधी मीं त्यांना त्यांचें मत विचारलें, तेव्हा विशेष खोलांत न शिरतां ते एवढेंच म्हणाले, "तिथं सध्या पुढारीपणासाठी इतकीं कांही लाथाळीं चालू आहे की, उद्या काय होईल तें सांगतां येत नाहीं !" या बाबतींत त्यांना फार छेडणें मलाहि प्रशस्त वाटलें नाही.

मीं त्यांना (माझ्या दृष्टीने) एक खोचक प्रश्न विचारला, "इंग्रज लोकांच्या मनांत भारतीयांविषयी अजूनहि तुच्छ भावना आणि स्वतःविषयी अहंगंड आहे काय ? भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांच्या भावनेंत कांही बदल झाला आहे की नाही ?"

" म्हणजे तुम्ही असं गृहीत धरून चाललां आहांत की सर्व इंग्रज लोकांच्या मनांत भारतीयांविषयी तुच्छताबुद्धि होती. ही तुमची कल्पना चुकीची आहे. कांही थोड्या अहंमन्य राज्यकर्त्यांवरून तुम्हीं ही समजूत करून घेतली होती. पण तशी स्थिति पूर्वीहि नव्हती, अन् आताहि नाही. परंतु मी तुम्हांला विचारतों, तुम्ही गोऱ्यांच्या वर्णद्वेषाबद्दल इतके नाकानं कांदे सोलतां, पण प्रत्यक्ष तुमच्या पायांखाली काय जळतंय् याचा तुम्ही कधी विचार करतां का ? तुम्हां हिंदूंमधील ब्राह्मणांमध्ये स्वतःच्या उच्चत्वाबद्दल जो भयंकर अहंकार असतो त्याच्या शतांशानेहि गोऱ्या लोकांत तो आढळणार नाही. अन् तुम्ही हरिजनांची जी दुर्दशा करून टाकली आहे तिचा विचार करतां, गोऱ्यांची वागणूक किती तरी पटींनी सभ्य समजली पाहिजे. मला वाटतं, तुम्ही लोकांनी अंतर्मुख होऊन स्वतःचे आचारविचार तपासावेत. "

—मी काय उत्तर देणार ? प्रोफेसरमजकुरांचें म्हणणें चूक होतें काय ? पाश्चात्त्यांच्या वागणुकींतील वर्णद्वेष त्यांच्या साम्राज्याबरोबर गेल्या दोनतीनशें वर्षांत वाढला, आणि साम्राज्यें जशीं वितळूं लागलीं तसा तोहि वितळूं लागला आहे. पण आमच्यांतील शिवाशीव, उच्चनीचता आमच्या रक्तांतच भिनलेली आहे. गुलामगिरींतहि तिने आमची पाठ सोडलेली नाही...

इतक्यांत पुणें स्टेशन आलें आणि मला वाटलें, मोठ्या संकटांतून सुटलों मी !



# सौराष्ट्र

भारतांतच नव्हे, तर साऱ्या आशिया खंडांत सिंहांची वस्ती असलेला एकच छोटासा प्रदेश आहे. तो म्हणजे सौराष्ट्र. जुनागडजवळील ५७६ चौरस मैलांच्या छोट्याशा गीर जंगलांत २५३ सिंह सध्या सुखाने राहत आहेत. सुखाने अशासाठी म्हटलें, की गेल्या कांही वर्षांत त्यांची संख्या झपाट्याने कमी होऊं लागली होती; म्हणून सिंहांच्या शिकारीला बंदी घालून सरकारने सिंहांना संरक्षण दिलेलें आहे. तें दिलें नसतें तर एव्हाना बहुधा सौराष्ट्रांतून, भारतांतून व आशियांतूनहि सिंह या प्राण्याचें कायमचेंच उच्चाटण झालें असतें !

## केसरी व नरकेसरींचा देश

सिंहांप्रमाणेच अखिल भारतीय– किंबहुना जागतिक कीर्तीच्या कांही नरकेसरींची जन्मभूमीहि सौराष्ट्रच आहे. भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्म सौराष्ट्रांत पोरबंदर ऊर्फ सुदामपुरी येथे झाला आणि त्यांचें शिक्षण सौराष्ट्राची सध्याची राजधानी राजकोट या शहरीं झालें हें पुष्कळांना माहीत असेल. पण आर्यसमाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचा जन्महि मोरवीजवळील टंकारा गावीं झाला हें तुम्हांला कदाचित् माहीत नसेल. ‘ गुजराती भाषेचे ज्ञानेश्वर ’ असें ज्यांना संबोधितां येईल असे संत नरसी मेहता हे जुनागडचे रहिवासी होते ही गोष्ट मला नुकतीच कळली. हरिजन व आदिवासी लोकांची आमरण सेवा करणारे

श्री. ठक्करबाप्पाहि सौराष्ट्राचेच निवासी होते आणि शिक्षणक्षेत्रांतील अखिल भारतीय कीर्तीचे प्रा. नानाभाई भट्ट, विधायक कार्यकर्ते व मुंबईचे माजी अर्थमंत्री श्री. वैकुंठभाई मेहता व काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्री. उच्छृंगराय ढेबर हे सर्व सौराष्ट्राचेच निवासी आहेत, ही गोष्ट कळल्यानंतर त्या प्रदेशाबद्दल माझ्या मनांत आदराची विशेष भावना निर्माण झाली. गांधीजींप्रमाणेच ज्यांना आधुनिक भारताचे निर्माते ( वेगळ्या अर्थाने ) म्हणतां येईल ते मुहम्मदअल्ली झीणा ( जिना ) हेहि सौराष्ट्रीयच होते व त्यांचा जन्महि पोरबंदरजवळील पानेली नांवाच्या गावीं झाला होता हें ऐकल्यावर तर मला त्या योगायोगाची मोठी गंमत वाटली.

तसें पाहिल्यास ' सौराष्ट्र ' हें नांव अत्यंत प्राचीन आहे. त्याचा उल्लेख रामायण, महाभारत व पुराणें यांत आढळतो. सौराष्ट्र म्हणजे चांगला देश. यावरून हा भाग एके काळीं लोकांना फार आवडला असावा असें दिसतें. परंतु मध्यंतरीं हें नांव शेकडो वर्षेपर्यंत प्रचारांतून गेलें होतें. १५ फेब्रुवारी १९४८ रोजीं सौराष्ट्रांतील २२२ संस्थानांचें विलिनीकरण करून भारताचे पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी काठियावाडचें नवें राज्य स्थापन केलें तेव्हा त्याला पुन्हा ' सौराष्ट्र ' हें नामाभिधान प्राप्त झालें. त्यापूर्वी त्याला उपरान्त, सूरठ, सोरठ, काठियावाड वगैरे नांवें वेळोवेळीं देण्यांत आलीं होतीं. यांपैकी काठियावाड किंवा काठेवाड हें नांव अठराव्या शतकांत तेथे राज्य करण्यास गेलेल्या मराठ्यांनी तेथील काठी लोकांकडून दिलेलें होतें, असें कांही लोकांचें म्हणणें आहे.

सौराष्ट्राचा नकाशा पाहिल्यास निसर्गानेच त्याला सरहद्दी आखून दिल्या असल्याचें दिसून येतें. याच्या उत्तरेस, पश्चिमेस व दक्षिणेस अरबी समुद्र असून ईशान्येस कच्छचें रण आहे. सौराष्ट्राचें क्षेत्रफळ २१,४५१ चौरस मैल ( जास्तींत जास्त लांबी २०० मैल व रुंदी १६० मैल ) असून लोकसंख्या ४१,३७,३५९ आहे. लहान-मोठ्या टेकड्या, डोंगर, माळरान आणि छोट्या नद्या व तलाव यांनी सर्व प्रदेश व्यापलेला आहे.

## थोडा पूर्वेतिहास

द्वारका क्षेत्रामुळे सौराष्ट्राचें नांव भारतांतील सर्व हिंदु स्त्री-पुरुषांना

पुराणकालापासून माहीत आहे. सौराष्ट्राचा इतिहासहि द्वारकेंतील श्रीकृष्णाच्या आगमनापासून सुरू होतो. जुनागडजवळ सम्राट् अशोक, रुद्रदामन व स्कंदगुप्त यांचे शिलालेख एका प्रचंड खडकावर पाहायला मिळतात. त्यावरून चंद्रगुप्त मोर्यांच्या काळापासून हा प्रदेश मौर्य, क्षत्रप व गुप्त साम्राज्यांत प्रविष्ट झाला होता असें दिसून येतें. त्यानंतर वल्लभी वंशाने येथे राज्य केलें. त्या काळीं हा प्रदेश अत्यंत भरभराटीस आलेला होता, असें वर्णन सुप्रसिद्ध चिनी प्रवासी ह्युएनत्संग याने लिहून ठेविलें आहे. नालंदाप्रमाणेच वल्लभीपुर येथील ज्ञानपीठें भारतांत प्रख्यात होतीं. सन ७६५ च्या सुमारास सिंधमधील मुस्लिमांनी वल्लभीच्या राज्यावर हल्ला करून त्याचा पाडाव केला. त्यानंतर चावडा, चूडासमा, झाला, गोहेल, जडेजा वगैरे वेगवेगळ्या वंशांचे रजपूत लोक येथे आले आणि त्यांनी आपलीं छोटीं छोटीं राज्यें येथे स्थापिलीं. याच सुमारास (इसवी सनाच्या ९ व्या शतकांत) काठी नांवाचे सिथियन लोक पंजाबांतून येथें आले. मराठ्यांना १८ व्या शतकांत याच काठी लोकांनी जोराचा प्रतिकार केला होता व त्यांच्यावरूनच मराठ्यांनी या प्रदेशास काठेवाड असें नांव दिलें.

सन १०२४ हें साल सौराष्ट्राच्याच नव्हे, तर अखिल भारताच्या इतिहासांत अत्यंत महत्त्वाचें ठरलेलें आहे. या वर्षीं गझनीच्या मुहंमदाने सौराष्ट्रांतील रत्न व भारतांतील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असें सोमनाथाचें मंदिर हल्ला करून लुटलें ! त्यानंतर उलगखान, बहादुरशाह वगैरे मुस्लिम आक्रमकांनी सन १२९७, १३१८, १३९५, १५११ व १५२० या सालीं सोमनाथावर हल्ले करून त्याची पुनः पुन्हा लुटालूट केली. अखेर सन १७०६ सालीं औरंगजेबाने या मंदिराचें मशिदींत रूपांतर करून टाकलें ! तेव्हापासून परवापर्यंत तेथे मशीदच होती. परंतु १९५० सालीं सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुढाकारामुळे त्या प्राचीन मंदिराचा पुनरुद्धार होऊन नवें प्रचंड मंदिर बांधण्याचें कार्य सुरू आहे.

मुसलमानी साम्राज्याला उतरती कळा लागली तेव्हा अठराव्या शतकांत मराठ्यांनी सारें सौराष्ट्र व्यापलें. इंग्रजांच्या आगमनापर्यंत (सन १८२० पर्यंत) बडोद्याच्या गायकवाडांच्या ताब्यांत सौराष्ट्राचा मुलूख होता. पुढे १९२५ सालापर्यंत सौराष्ट्रांतील संस्थानांचा भाग मुंबई इलाख्यांतच मोडत होता.

## लोक आणि त्यांचीं वैशिष्ट्यें

जुन्या काळीं सौराष्ट्र हें परदेशांतून भारतांत येण्याचें मुख्य प्रवेशद्वार होतें. त्यामुळे सिथियन, पार्थियन, हूण, बॅक्ट्रियन, ग्रीक, रोमन, पर्शियन, अरब, पोर्तुगीज वगैरे नाना वंशांचे व नाना देशांचे लोक या भागांत आले आणि येथे स्थायिक झाले. त्याचप्रमाणे भारतांतील मौर्य, गुप्त, क्षत्रप, सैंधव, मैत्रेक, चालुक्य, राजपूत, काठी वगैरे लोकहि येथे आले. अर्थात् हे सर्व लोक आता येथे एकजीव होऊन गेले आहेत. परंतु गोपालनाचा व्यवसाय करणारे पोरबंदरच्या बाजूचे मेर, मेंढपाळ व गुराखी म्हणून प्रसिद्ध असलेले गीरच्या आसपासचे रबारी, मोरवीच्या आसपासचे भटक्ये मियाणा, द्वारकेच्या जवळपास राहणारे कणखर वाघेर, चारण, माहिया वगैरे लोक अजून आपापलीं वैशिष्ट्यें राखून आहेत. यांपैकी मेर व काठी हे लोक चांगले धिप्पाड व देखणे असून शौर्याच्या बाबतींत प्रख्यात आहेत. एकूण सौराष्ट्राचा विचार केल्यास येथील सर्वसामान्य माणूस हा धट्टाकट्टा, कणखर, सरळ मनाचा आणि उत्सवप्रिय आहे. पूर्वी त्याच्या शौर्याला खूप वाव होता; परंतु अलीकडे त्याला सैन्यांत प्रवेश मिळणें अवघड झाल्यामुळे ( कारण 'या भागांतील लोक सैनिकी पेशाचे नाहीत' असें इंग्रजांनी ठरवून टाकलें होतें ! ) त्यांची मोठी कुचंबणा झाली. येथील शेतकऱ्यांमध्ये मुख्यतः कुणबी, मुमना ( मुसल्मान ), काठी, गिरासदार ( रजपूत ) या जातींचे लोक आहेत. पांढरपेशांमध्ये ब्राह्मण व वाणी जातींचे लोक असून अन्य गुर्जर भाषिकांपेक्षा त्यांच्यामध्ये ज्ञान व विद्वत्ता यांचें आकर्षण धनलालसेच्या तुलनेने जास्त आहे. तेथील लोक स्वभावाने उमदे व सुखासीन वृत्तीचे असून त्यांच्यामध्ये आतिथ्यशीलता विशेष प्रमाणांत दिसून येते. शिवाय स्त्रियांमध्ये पडद्याची प्रथा नसल्यामुळे महाराष्ट्रीय मंडळींना सौराष्ट्रांत वावरतांना मुळीच अपरिचित वाटत नाही. सौराष्ट्रांत प्रवास करीत असतां मला कोठेहि हॉटेलांत उतरावें लागलें नाही. एवढेंच नव्हे तर कांही ठिकाणीं वेळेच्या अभावीं अनेक मित्रांकडे जेवावयास जाणें जमलें नाही, याची हळहळ त्यांना वाटल्याचें मला स्पष्ट दिसून आलें. गुजरातच्या आतिथ्यशीलतेविषयी मी आजपर्यंत पुष्कळ ऐकलें-वाचलें होतें, त्याचा प्रत्यक्ष अनुभव या सौराष्ट्र-भ्रमणांत चांगला आला.

सौराष्ट्रांतील लोक स्वभावाने प्रेमळ आणि मिळूनमिसळून राहावें या वृत्तीचे आहेत. त्यामुळे येथे एकत्र-कुटुंबपद्धतीचा पगडा जबरदस्त आहे. येथील जातीय वादाचें स्वरूपहि एकत्र कुटुंबपद्धतीला पोषक असेंच आहे. सौराष्ट्रांत व गुजरातेंत महाराष्ट्राप्रमाणे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद नाही. कारण, ब्राह्मणांतील व ब्राह्मणेतरांतील पोटजाति इतक्या प्रबळ आहेत, की त्यांच्यांत ऐक्य होणेंच अवघड आहे ! या जातींची संख्या इतकी अधिक आहे, की त्यांनी एक व्हावयाचें ठरवलें तरी त्याला पुष्कळ वेळ लागेल ! प्रत्येक पोटजात ही स्वतःला स्वतंत्र जातच नव्हे, तर जणु स्वतंत्र धर्म समजते. ब्राह्मणांचीच गोष्ट घेतली तरी औदिच्य, नागर, श्रीमाळी, खेडावाळ वगैरे अनेक पोटजाति त्यांच्यांत असून त्यांच्यांत आपापसांत लग्नसंबंध होत नाहीत.

एका मोठ्या कॉलेजांत प्राध्यापक असलेल्या तरुणाला मीं म्हटलें, “ तुम्ही हे जातिभेद मोडायचा कां प्रयत्न करीत नाही ? निदान पोटजातीबाहेर तरी तुम्हीं लग्न करायला काय हरकत आहे ? ”

त्यावर त्यांनी दिलेलें उत्तर नमुनेदार आहे. ते म्हणाले, “ माझा स्वतःचा या जातिभेदावर विश्वास नाही; परंतु घरच्या लोकांसाठी मला ते पाळावेच लागतात. माझे चुलते फार सनातनी आहेत. मीं पोटजातीबाहेर लग्न केल्यास ते आमच्या घरीं पाणीहि पिणार नाहीत ! त्यामुळं माझ्या वडिलांना फार दुःख होईल. म्हणून मला आमच्या पोटजातींतच लग्न केलं पाहिजे. मग मुलगी माझ्या अपेक्षेप्रमाणं सुशिक्षित किंवा सुंदर न मिळाली तरी हरकत नाही ! ”

यावरून येथील कौटुंबिक बंधनांची कल्पना येईल. भाऊ भाऊ मिळवते झाले तरी आपण विभक्त न होतां समाईकपणेंच राहावें अशी त्यांची इच्छा आणि इतरांची अपेक्षा असते. या पद्धतीमध्ये स्त्रियांना नेहमीच त्रास सहन करावा लागलेला आहे. अर्थात् जुनें संस्थानी व मध्ययुगीन वातावरण जसजसें कमी होत जाईल तसतशी ही परिस्थिति बदलत जाईल आणि विभक्त कुटुंबपद्धति प्रचलित होऊन स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य मिळूं लागेल, अशीं चिन्हें तेथेहि दिसूं लागलीं आहेत.

सौराष्ट्रीय स्त्री ही इतर गुर्जर किंवा महाराष्ट्रीय स्त्रीप्रमाणे स्वातंत्र्यप्रिय

आहे. येथे पडदापद्धति जवळजवळ नाहीच म्हटली तरी चालेल. ग्रामीण स्त्रियांमध्ये तोंडावरून पदर घेण्याची प्रथा पुष्कळच दृढ आहे; पण पुरुषाला भिण्याची किंवा बुजण्याची वृत्ति तेथेहि नाही. मध्यम वर्गांतील सौराष्ट्रीय स्त्री ही वर्णाने गोरी आणि रूपाने देखणी असते; पण गोरा रंग हा अनेक वेळां सौंदर्याला फिकेपणा आणतो. सावळ्या रंगांतील लावण्य खेड्यांतील स्त्रियांमध्ये फार मोठ्या प्रमाणांत आढळतें.

सौराष्ट्रांतील किंवा गुजरातेंतील स्त्री स्वतंत्र असूनहि जीवनाच्या संघर्षांमध्ये ती मागेच राहते. आघाडीवर येण्याची धडाडी तिच्यांत नाही असें नाही, पण तिची वृत्तीच गृहिणीची आहे. छानछान कपडे घालावेत, नटावें थटावें, घरच्या मंडळींना गोडधोड पदार्थ करून खायला घालावेत यांतच तिला कृतार्थता वाटते. अर्थात् इकडील पुरुष आर्थिक दृष्ट्या मराठी पुरुषांपेक्षा अधिक सुस्थितींत असल्यामुळे आपल्या स्त्रियांचा नाजुकपणा कायम ठेवणें त्यांना शक्य असतें व आवडतेंहि. याचा परिणाम असा झाला आहे, की राजकीय, सामाजिक, शैक्षणिक वगैरे क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने धडपडणाऱ्या स्त्रिया इकडे दिसत नाहीत. इतकेंच काय, पण साहित्याच्या क्षेत्रांतहि स्त्रियांची अनुपस्थिति जाणवते.

हुंड्याच्या पद्धतीमुळे अनेक बायका करण्याकडे पुरुषांची प्रवृत्ति होते आणि मग आधीच्या बायकांचें जीवन असह्य होऊन आत्महत्या करण्याकडे त्यांचा कल वाढूं लागतो. सौराष्ट्रामध्ये स्त्रियांच्या आत्महत्येचें प्रमाण भरमसाट वाढलेलें आहे. त्यासंबंधी चौकशी करण्यासाठी सरकारने एक समितीहि नेमली आहे. ती समिति जाहीर झाल्यानंतर एक महिन्याच्या आंतच दहा स्त्रियांनी आत्महत्या केल्या ! या आत्महत्या अशिक्षितांपेक्षा पांढरपेशा समाजांतच अधिक प्रमाणांत असतात, ही गोष्ट विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**सण आणि संस्कार**

दिवाळी, बेसतुं वर्ष ( दिवाळींतील पाडवा ), मकरसंक्रांति, होळी, रामनवमी, बळेव ( श्रावणी ), रक्षाबंधन, जन्माष्टमी, दसरा वगैरे अखिल भारतीय स्वरूपाचे उत्सव येथेहि तसेच साजरे केले जातात. महाराष्ट्रांतल्या-

प्रमाणे येथे गणेशोत्सव नाही; येथील गणेशचतुर्थी भाद्रपदांत नसून वैशाखांत अक्षय्यतृतीयेच्या दुसऱ्या दिवशीं असते. मात्र त्या दिवशीं मातीचे गणपति न करतां, दारावर 'श्रीगणेशाय नमः' असें लिहून त्याची पूजा करतात व मोदक वगैरे करून खातात. पण ठिकठिकाणीं राहिलेली महाराष्ट्रीय मंडळी जेव्हा गणेशोत्सव साजरे करतात तेव्हा स्थानिक सौराष्ट्रीय स्त्री-पुरुष त्यांत मोठ्या उत्साहाने सामील होतात. सौराष्ट्रांतील सर्वांत मोठा व सामुदायिक स्वरूपाचा उत्सव म्हणजे नवरात्र होय. या दिवसांत आपल्याकडील गणेशोत्सवाप्रमाणे रात्रभर गरबा, रास, दांडिया, गीत वगैरे कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर चालतात. गिरनार व पालीताणा येथील जत्रा व शिवरात्रीचा मेळावा हेहि मोठे उत्सव असतात. आपल्याकडे जोंधळ्याचा हुरडा करतात त्याप्रमाणे सौराष्ट्रांत गव्हाचा हुरडा करून खाण्याचा रिवाज आहे. अर्थात् जोंधळ्याच्या हुरड्याच्याहि पार्ट्या चालतातच. गुऱ्हाळें असतील तेथे त्यांचाहि आनंद लुटला जातो. सौराष्ट्रीय स्त्री-पुरुष रंगेल असल्यामुळे येथील सणांमध्ये एक औरच लज्जत येते.

सौराष्ट्रांतील विवाहित स्त्री ओळखण्याची खूण म्हणजे तिच्या हातांतील बांगड्या व नाकांतील चमकी ही होय. त्यांतहि कुमारिका नाकांत चमकी घालतात; यामुळे तें सौभाग्याचें नक्की चिन्ह नव्हे. अलीकडे कुंकू लावण्याचा रिवाज लोकप्रिय होत आहे; परंतु तो शोभा म्हणून; सौभाग्याचें चिन्ह म्हणून नव्हे. गुजरातेंत मंगळसूत्राचा थोडाफार प्रचार आहे; पण सौराष्ट्रांत मला मंगळसूत्र कोठेच दिसलें नाही.

येथील लग्नहि अखिल भारतीय पद्धतीचेंच असतें. सप्तपदी व मंगलाष्टकें हे विधि अपरिहार्य असून लग्नासाठी ब्राह्मणाची जरूर लागतें. वरवधूपक्ष एकमेकांच्या ज्या उखाळ्यापाखाळ्या काढतात, त्याला 'फटाणा' असें म्हणतात. वेविशाळ ऊर्फ साखरपुडा झाल्यानंतर ४–५ वर्षांनीहि लग्न होऊं शकतें. मुलीच्या गावीं लग्नाकरिता जी बरात (वऱ्हाड) जाते तिच्यांत पूर्वी मुलाकडील स्त्रिया व पुरुष मिळून ४०–५० गाड्या भरून मंडळी जात. आता ही संख्या कमी झाली असून २०–२५ लोकच जातात. लग्नाच्या पहिल्याच रात्रीं पतिपत्नींचें मीलन होतें आणि १०–१५ दिवस

सासरीं राहिल्यानंतर मुलगी माहेरीं जाते. अर्थात् सुशिक्षितांमध्ये हे जुने रीतिरिवाज फारच थोडे उरले आहेत.

सौराष्ट्रीय जनतेमध्ये भडक रंगांबद्दल विशेष प्रेम असल्याचें दिसून येतें. माणसांतील चैतन्याचें तें लक्षण आहे, असें म्हणतात. लाल, निळा व हिरवा रंग इकडील स्त्रियांमध्येच नव्हे, तर पुरुषांमध्येहि खूष लोकप्रिय असल्याचें दिसलें. येथे खेडोपाडीं फार पूर्वीपासून जाडीभरडी खादी तयार होते तीच ग्रामीण लोक वापरतात. लोकरीच्या जाड्याभरड्या व ऐटबाज वस्तूहि तयार होतात. मेंढपाळांच्या बायका बाराहि महिने लोकरीचे कपडे वापरतात ही मोठी गमतीची गोष्ट आहे ! पातळाप्रमाणे बारीक विणीची घोंगडी त्या वापरतात.



येथील शेतकऱ्यांचा व मजुरांचा पोषाख मोठा मजेदार असतो. एक सुरवार ( पिंढऱ्यांवर आवळून बसणारा चुडीदार पायजमा ), कंबरेपर्यंत कसा-बसा पोचणारा झबल्यासारखा अंगरखा, त्यावर जाकीट व मोठें पागोटें. बटनाला लावलेल्या चांदीच्या साखळ्या पाहणाऱ्याचें लक्ष चटकन् ओढून घेतात. बायकांमध्ये घागरा ( मुख्यतः लाल रंगाचा ) व ओढणी असते. अंगांत कोपरापर्यंत बाह्याचें पोलकें असतें. सौराष्ट्रांत लंगोटी लावणारा एकहि शेतकरी मला आढळला नाही किंवा वस्त्राच्या अभावीं लज्जारक्षणाची

काळजी लागून राहिलेली स्त्रीहि दिसली नाही. भिकारीहि कोठे आढळले नाहीत. यावरून इकडे महाराष्ट्राच्या मानानें अधिक चांगली स्थिति असावी असा मीं कयास बांधला व तो खरा असल्याचें मला नंतर कळलें.

## शेती व पीकपाणी

१. झालावाड, २. हालार, ३. सोरठ, ४. गोहिलवाड आणि ५. मध्य सौराष्ट्र असे सौराष्ट्राचे पांच जिल्हे असून १ कोटि २८ लाख एकर जमिनीपैकी ८० लाख एकर जमीन लागवडीखाली आहे. एकेकाळीं येथे खूप मोठें जंगल होतें; परंतु आता थोडें जंगल राहिलें आहे. त्याचा परिणाम हवामानावर होऊन पाऊस फारच कमी झाला आहे. अधूनमधून कोणत्या नां कोणत्या भागांत दुष्काळ पडतच असतो. या बाबतींत त्याचें महाराष्ट्राशीं खूपच साम्य आहे. राजकोटहून सणोसरा या गावीं जातांना मीं एस्. टी. च्या बसमधून प्रवास केला. त्या वेळीं वाटेंतील उजाड माळरानें, छोट्या टेकड्या, बाभळीचीं झुडुपें व मधूनच दिसणारें एखादें कडुलिंबाचें झाड हीं सर्व पाहून आपण पुणें-नगर जिल्ह्यांतूनच जात आहोंत असा मला भास झाला. अर्थात् महाराष्ट्राइतके मोठेमोठे डोंगर व किल्ले येथे नाहीत. आणि कच्छचें रण जवळ असल्यामुळे हवेंत कमालीचा रूक्षपणा आहे एवढाच काय तो फरक.

येथील शेतजमिनीपैकीं निम्मी जमीन अन्नधान्याखाली असून निम्म्या जमिनींतून कापूस व गळिताचीं धान्यें काढलीं जातात. येथील मुख्य पिकें ज्वारी, बाजरी व गहू हीं असून अलीकडे भातहि होऊं लागलें आहे. सामान्य लोकांचा आहार मुख्यतः ज्वारी व बाजरी हा असून उच्च-वर्गीयांत गहू व थोड्या प्रमाणांत तांदूळ खाल्ला जातो.

सौराष्ट्रांतील बहुतेक शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे आणि पाऊस तर अगदी अनियमित असतो. यामुळे अवर्षणाची तलवार सदैव टांगलेली असते. यांतून सुटण्यासाठी नूतन सौराष्ट्राने आपल्या सर्व नद्यांना धरणें बांधण्याचा निश्चय केलेला आहे. भादर, शेत्रुंजी, ओझत, उबेण, हीरण, रावळ, मालण, भोगावो, आजी, मच्छु, पुना वगैरे नद्या सौराष्ट्रांतून वाहतात. यांतील भादर व शेत्रुंजी या सर्वांत मोठ्या नद्या होत.

भादरची लांबी १०५ मैल असून शेत्रुंजीची लांबी १०० मैल आहे. या सर्व नद्यांना बांध घालण्याच्या योजना आखण्यांत आलेल्या असून त्यांपैकी रंघोळा, ब्राह्मणी, घी, मोज, पुना, मालण, आजी, सुरजवडी, भीमडाद वगैरे धरणांचीं कामें पुरींहि झालीं आहेत. मी शत्रुंजय डोंगरावर गेलों होतों त्याच वेळीं शेत्रुंजी नदीवरील धरणाची पायाभरणी करण्यासाठी भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू येथे आलेले होते. आता त्या धरणाचेंहि काम सुरू झालें आहे. प्रदेश लहान असल्यामुळे कोणत्याहि कामाला निष्कारण विलंब लागत नाही, हा एक फायदा या प्रांताला मिळालेला आहे. दुसरी पंचवर्षीय योजना पुरी होईल त्या वेळीं २२ कोटि ८५ लाख रुपये खर्चून बांधलेल्या धरणांमुळे सव्वापांच लाख एकर जमीन बागाईत बनेल आणि अन्नधान्याच्या बाबतींत सौराष्ट्र हा एक संपन्न प्रदेश होईल.

सौराष्ट्रांतील गीर गाई आणि म्हशी विपुल दुधाबद्दल प्रसिद्ध आहेत. येथील लोकांच्या आहारांत दूध, तूप व तेल यांची रेलचेल असते. दूध-तूप उत्कृष्ट व स्वस्तहि मिळतें. लौकरच येथे दुधाचा मोठा कारखाना निघणार आहे. हा कारखाना सबंध आशियांत मोठा असेल; दुधाची पावडर करणें, डब्यांतील दूध तयार करणें व इतर कामें या कारखान्यांत होतील. अर्थात् त्यामुळे स्थानिक लोकांना मात्र चांगलें व स्वस्त दूध मिळणार नाही याबद्दल एका कार्यकर्त्यांनी मजजवळ दुःख व्यक्त केलें.

## छोटे उद्योगधंदे

सौराष्ट्र हा मुख्यतः शेतीप्रधान प्रदेश आहे. त्यामुळे शेतींत कितीहि कमी उत्पादन होत असलें तरी तिच्याखेरीज लोकांना दुसरा मार्गच नव्हता. शिवाय, लहान लहान संस्थानांमुळे मोठे कारखानेहि निघणें शक्य नव्हतें. यामुळे छोट्या प्रमाणावरील उद्योगधंदे करण्याकडे लोकांची प्रवृत्ति विशेष असे. स्वतः सूत कातून तें विणून व्यावयाचें व वापरावयाचें अशी प्रथा अजूनहि खेडोपाडीं दिसून येते. यांतूनच गांधीजींना चरख्याची व खादीची कल्पना सुचली होती. आजहि सौराष्ट्रांत खादीचें काम बऱ्याच मोठ्या प्रमाणावर चालू आहे. १९५२-५३ सालीं तेथे सुमारें सहा लाख

रुपयांची खादी तयार झाली आणि तितक्याच किंमतीची खादी विकली गेली. येथे लोकरीचेंहि उत्पादन खूप मोठ्या प्रमाणावर होतें आणि उत्कृष्ट घोंगड्या तयार केल्या जातात. काठेवाडी घोंगडी— मुख्यतः पांढऱ्या लोकरीची व नक्षीदार काठ असलेली— कोणालाहि मोह पाडील अशी सुंदर असते. त्याखेरीज भरतकाम, कांचेच्या मण्याच्या माळा, अत्तरें, सुरमे, हस्तिदंती बांगड्या, कुंकू, गुलाल, खेळणीं वगैरे तयार करण्याचें काम लहानमोठ्या प्रमाणावर सर्व सौराष्ट्रभर चालू असतें.

सौराष्ट्राला खूप मोठा समुद्रकिनारा मिळाला असल्यामुळे प्राचीन काळापासून येथील बंदरें प्रख्यात आहेत. भावनगर, बेडी ( जामनगर ), नवलखी, वेरावळ आणि पोरबंदर हीं यांच मोठीं बंदरें तेथे असून भारतांतील मध्यमश्रेणीच्या बंदरांत तीं उत्कृष्ट गणलीं जातात. सध्या सौराष्ट्रांत मीटर गेज रेल्वे-मार्ग आहे तो ब्रॉड गेज झाला म्हणजे या बंदरांचा विकास झपाट्याने होऊं शकेल; कारण मुंबईपेक्षा हीं बंदरें उत्तर भारताला जास्त नजीक असल्याने येथून मालाची आयात-निर्यात करणें उत्तरेकडील प्रदेशांना जास्त सोयीचें होणार आहे. याखेरीज ओखा, महुवा, जाफराबाद, भेराई, कोळीयाक, हाथब, चोरवाड, मांगरोळ, गोपनाथ वगैरे बंदरांचा चांगला विकास होऊं शकेल.

या बंदरांमुळेच मच्छीमारीच्या धंद्यालाहि येथे चांगला वाव आहे. सौराष्ट्रांतील उच्च व मध्यम वर्गांत मासे खाण्याचा प्रघात फार कमी आहे. तरी पण तो व्यवसाय चांगलाच वाढत आहे. १९५० सालीं सुमारें ९ लाख मण मासळी पकडण्यांत आली तर १९५३ सालीं १२ लाख मण मासळी मिळाली. येथून मुंबई-दिल्ली-डेहराडूनपर्यंत मासळी पाठविण्याची सोय आता झाली आहे.

मासळीप्रमाणेच येथे मोत्यींहि सापडतात. त्यांच्यांत शास्त्रीयता व पद्धतशीरपणा आणण्याच्या दृष्टीने सध्या प्रयत्न चालू आहेत.

पोरबंदर येथे एक वैशिष्ट्यपूर्ण कारखाना मला पाहायला मिळाला. त्याचें नांव ‘ विश्वकर्मा इंजिनियरिंग वर्क्स. ’ वस्तुतः याला कारखाना असें बडें नांव देतां येईल की नाही याविषयी मला शंका वाटते; कारण सध्या येथे फक्त सहा कारागीर काम करीत असतात. तरी पण तेथे जी

यंत्रसामुग्री मीं पाहिली तिचा विचार करतां त्याला ' कारखाना ' म्हणायला हरकत नाही असें मला वाटतें.

या कारखान्यांत मुख्यतः सोन्याचांदीच्या विशेष प्रकारच्या वस्तु तयार केल्या जातात; आणि कारखान्याचे मालक श्री. गोविंदभाई गज्जर यांनी असें सांगितलें, की या प्रकारचा भारतांत एकमेव कारखाना आहे. येथील सर्वांत प्रख्यात वस्तु म्हणजे सिगारेट केस ! इतक्या विविध प्रकारच्या सिगारेट-केसेस येथे तयार होतात, की तशा भारतांतच काय पण परदेशांतहि तयार होत नाहीत. हिंदुस्थानचा नकाशा असलेली एक सिगारेट-केस त्यांनी तयार करून पंडित जवाहरलाल नेहरू यांना दिली आहे; त्यांत हिंदुस्थानचा भाग सोन्याचा असून पाकिस्तानचा चांदीचा आहे. ही केस जेव्हा पाकिस्तानचे माजी पंतप्रधान श्री. महंमदअली यांच्या पाहण्यांत आली तेव्हा त्यांनी आपल्यासाठी तशी डबी तयार करण्याची ' ऑर्डर ' दिली व त्याबद्दल तीन हजार रुपये देण्याचें कबूल केलें. परंतु त्यांना पाकिस्तानच्या नकाशांत जम्मू व काश्मीर या प्रदेशाचा समावेश हवा होता. तसा करण्यास श्री. गज्जर तयार झाले नाहीत. ज्या मित्रामार्फत हें काम आलें होतें तो त्यांना म्हणाला, " तुम्हांला त्या भांडणाशीं काय करायचंय्? तुमच्या कामाबद्दल पैसे मिळाल्याशीं कारण ! अन् मी विचारतों, सिगारेटच्या डबीवर जम्मू-काश्मीर पाकिस्तानांत गेल्यानं तो काय खरोखरी पाकिस्तानांत जाणार आहे ? "

यावर श्री. गज्जर यांनी दिलेलें उत्तर मोठें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. ते म्हणाले, " जो नुसता व्यापारी असेल तो हें काम करील; त्याला त्यांत कांही वाटणार नाही ! "

या कारखान्यांत तयार झालेल्या कांही सिगारेट-केसेस व इतर वस्तु मीं पाहिल्या. त्यांत प्रत्येकींत कांही तरी वैशिष्ट्य होतें. एका सिगारेट-केसमध्ये भरलेल्या सिगारेटस् लपविण्याची सोय होती, तर एका लिप्स्टिक्च्या डबीला फक्त ओठ दिसतील एवढा आरसा लावलेला होता. विलायती चांदीच्या आरशांना एकाच पोझिशनमध्ये ठेवण्याची सोय असते, तर श्री. गज्जर यांनी तयार केलेल्या आरशाला बिजागऱ्यांच्या साहाय्याने वाटेल तसें फिरवितां येतें. असे नाना प्रयोग ते करीत असतात.

कारखान्यांतील कामगारांसंबंधी जे नवे नवे कायदे सध्या होत आहेत त्यामुळे श्री. गज्जर हैराण झाल्यासारखे दिसले. ते म्हणाले, "मोठ्या गिरण्यांना लागू करावयाचे कायदे आमच्यासारख्या छोट्या अन् कसबी कारखान्यांनाहि लागू केल्यामुळे आमची मोठी पंचाईत झाली आहे. पूर्वी आमच्याकडे ३०-३२ कारागीर होते आणि आमचा माल परदेशांतहि जात होता. पण आता फक्त ६ कारागीर उरले आहेत. अर्थात् आमचें मुख्य गिऱ्हाईक जे राजेरजवाडे तेच नाहीसे झाल्यामुळेहि आमच्यावर परिणाम झाला आहेच.

## सौराष्ट्रांतील मोठे उद्योगधंदे

सिमेंट, पॉटरी, कांच, मीठ, केमिकल्स् वगैरे पदार्थांना आवश्यक असा कच्चा माल भरपूर प्रमाणांत सौराष्ट्रामध्ये उपलब्ध असल्यामुळे येथे त्यांचे अनेक कारखाने पूर्वीपासून चालू आहेत. येथे एकूण ६२७ कारखाने असून कामगारांची संख्या ४८ हजार आहे.

सर्वांत महत्त्वाचा उद्योग सिमेंटचा. पोरबंदरचा सिमेंट कारखाना हा भारतांतील पहिला कारखाना आहे. तो १९१३ सालीं स्थापन झालेला असून त्याचें उत्पादन दरसाल ४२ हजार टन आहे. दुसरा कारखाना जामनगर (सीका) येथील असून त्याचें उत्पादन १ लाख टन आहे. पण पहिल्या नंबरचा कारखाना द्वारकेचा 'ओखा सिमेंट वर्क्स' हा असून त्याचें उत्पादन १ लाख ८० हजार टन आहे. देशाच्या एकूण उत्पादनाच्या ११ टक्के सिमेंट सौराष्ट्रांत होतें. याचें कारण चुनखडी, माती (क्ले), जिप्सम व रेती हे पदार्थ येथे भरपूर प्रमाणांत मिळतात. सिमेंटपासून कौलें व इतर वस्तु तयार करणारे अनेक लहानमोठे कारखाने जामनगर, सुरेंद्रनगर, राजकोट, जोरावरनगर वगैरे ठिकाणीं आहेत. या कारखान्यांतून शास्त्रज्ञ म्हणून अनेक महाराष्ट्रीय मंडळी काम करीत आहेत.

सिमेंटच्याइतकाच महत्त्वाचा उद्योग म्हणजे पॉटरी व सिरॅमिक इंडस्ट्री. यांत कपबशा, बरण्या, विटा वगैरे चिनी मातीच्या वस्तु तयार होतात. चिनी मातीच्या विटा भयंकर उष्णतेच्या भट्ट्या बांधण्यासाठीं लागतात. या क्षेत्रांत मोरवीचे श्री. परशुरामपंत गणपुले यांचें नांव आघाडीवर आहे. थान,

वाकानेर व मोरवी या तीन ठिकाणीं त्यांचे परशुराम पॉटरी वर्क्सचें काम चालत असून त्यांत १४५० मजूर काम करीत असतात. येथील मंडळींचें वैशिष्ट्य म्हणून असें सांगतां येईल, की स्थानिक गुर्जरबंधूंशीं ती अगदी समरस होऊन गेली आहेत. श्री. अनंतराव गणपुले हे मोरवीच्या कारखान्याचे संचालक असून त्यांना मी मुद्दाम भेटलों तेव्हा त्यांना विचारलें, " येथील संस्थानें विलीन झाल्यामुळे आता आपल्याला फार त्रास होत असेल, नाहीं ? "

त्यावर ते म्हणाले, " येथील राजांनी आम्हांला बोलावलें म्हणून आम्हीं आलों; परंतु त्यांच्या सवलतींचा फायदा आम्हीं घेतला नाहीं. यामुळे आता त्या सवलती गेल्या तरी आम्हांला फारसें दुःखहि होत नाही. मात्र जे नवेनवे कायदे अस्तित्वांत येत आहेत त्यांचा इतरांप्रमाणेच आम्हांलाहि त्रास होतो. अर्थात् या अडचणींना आम्हांप्रमाणे सर्वांनाच तोंड द्यावें लागतें. " श्री. अंतुभाईंची मोरवींतील गुर्जर समाजांतील लोकप्रियता पाहून मला फार आनंद झाला.

परशुराम पॉटरी वर्क्सखेरीज सिहोर, जामनगर, वगाडिया वगैरे ठिकाणींहि पॉटरी, कौलें वगैरे बनविण्याचे कारखाने आहेत.

सौराष्ट्राला सुमारें सातशे मैलांचा समुद्रकिनारा आहे. यामुळे मिठाचें प्रचंड उत्पादन येथे होतें. गाडींतून जातांना पांढऱ्याशुभ्र मिठाचे पर्वत अधूनमधून दिसत असतात. कुडा, भावनगर, पोरबंदर, जामनगर, व लवणपूर, नवलखी येथील मिठागरें विशेष प्रख्यात आहेत त्यांतून दरसाल सुमारें आठ लाख टन मीठ तयार होतें.

ध्रांगध्रा केमिकल वर्क्स, ध्रांगध्रा आणि टाटा केमिकल वर्क्स, मीठापूर, हे केमिकल्सचे दोन मोठे कारखाने असून त्यांतून हजारो टन सोडा ॲश, सोडा बाय् कार्ब, कॅल्शियम् क्लोराइड, कॉस्टिक सोडा, लिक्विड क्लोराइड, ब्लीचिंग पावडर वगैरे पदार्थ तयार होतात. पोरबंदर येथे एका सोडा ॲश प्लँटला परवानगी देण्यांत आलेली असून त्यांतून रोज १०० टन कॉस्टिक सोडा व इतर माल तयार होईल.

याखेरीज सोडियम् सिलिकेट तयार करणारे ११ कारखाने सौराष्ट्रांत आहेत. सौराष्ट्रांत खनिज संपत्ति विपुल असून जिप्सम्, बॉक्साइट वगैरे

खनिज पदार्थ फार मोठ्या प्रमाणावर विद्यमान आहेत. सौराष्ट्रांतील कॅल्साइटचा साठा हा जगांतील उत्कृष्ट साठ्यांपैकी एक समजला जातो.

सौराष्ट्रांत कापूस खूप मोठ्या प्रमाणावर उत्पन्न होत असला तरी तेथे कापडाच्या व सुताच्या गिरण्या मात्र फारच थोड्या म्हणजे फक्त ९ आहेत. यांपैकी जामनगर, पोरबंदर व भावनगर येथील गिरण्या मोठ्या आहेत. सर्व गिरण्यांत मिळून १४ हजार माग असून सुमारें ९ कोटि वार कापड व २ कोटि पौंड सूत तयार होतें. जामनगरला एक लोकरीची गिरणी असून तिच्यांत १०० माग व ८ हजार चात्या आहेत.

त्यांखेरीज मोरवी, चोरवाड, पोरबंदर व पालीताणा येथील आगपेट्यांचे कारखाने; मोरवी, भावनगर व पोरबंदर येथील वनस्पति तुपाचे कारखाने आणि एनॅमल, हाडांचें खत, होजिअरी, ह्यूम पाइप्स, रंग व वॉर्निश, प्लॅस्टिक्स, रबर, रेशीम, साबण, साखर वगैरे तयार करण्याचे अनेक छोटे कारखाने सौराष्ट्रांत आहेत.

**त्यांची मुख्य अडचण**

सर्व कच्चा माल उपलब्ध असूनहि सौराष्ट्रांत कारखान्यांचें जाळें पसरूं शकलें नाही याचीं कारणें मुख्यतः दोन आहेत. एक म्हणजे येथे विद्युत्शक्ति नाही अथवा कोळसाहि मिळत नाही. नद्या छोट्या व सपाट प्रदेशांतून वाहणाऱ्या असल्यामुळे नैसर्गिक विद्युत्-उत्पादनाची शक्यता येथे नाही. कोळसा बिहार-बंगालमधून म्हणजे देशाच्या दुसऱ्या टोकापासून आणावा लागतो. पूर्वी जो कोळसा ६ रुपये टन मिळे त्यालाच आता ४३ रुपये द्यावे लागतात. यावरून जळणाची महर्घता लक्षांत येईल. दुसरें कारण म्हणजे वाहतुकीची गैरसोय. सौराष्ट्रांत मोटाररस्ते फारच थोडे आहेत आणि रेल्वेरस्ते खूप जुने झाले आहेत; त्यामुळे मालाची वाहतूक फार त्रासाची होते. महागुजरातेंत सौराष्ट्र विलीन झाला म्हणजे अहमदाबादपर्यंत ब्रॉड गेजचा रेल्वेरस्ता होईल आणि तोंपर्यंत कंडला बंदर तयार होऊन त्याचाहि फायदा सौराष्ट्राला मिळूं लागेल व सौराष्ट्रांतील उद्योगधंदे भरभराटीस येतील.

कराची बंदर पाकिस्तानांत गेल्यामुळे उत्तर भारताची फार कुचंबणा


होऊं लागली. मुंबईहून माल मागवावयाचा म्हणजे जवळजवळ तिप्पट खर्च येऊं लागला. शिवाय मुंबईवरचा ताणहि भयंकर वाढला. यामुळे कराची व मुंबई यांच्या दरम्यान कच्छच्या किनाऱ्यावर १२ कोटि रुपये खर्च करून कंडला येथे नवें बंदर बांधण्याचें काम भारत सरकारने हातीं घेतलें असून तें चालू वर्षी पुरें होईल. सौराष्ट्रांतील नवलखी बंदरापासून फेरी बोटीने सुमारें २५ मैल रुंदीची खाडी ओलांडली की कंडला बंदर येतें. येथील जुने कंडला बंदरहि बऱ्यापैकी आहे. परंतु नवें बंदर सर्व सुखसोयींनी सुसज्ज झालेलें आहे. येथे एक मोठा विमानतळ बांधण्याचेंहि काम सुरू असून तो आंतरराष्ट्रीय विमानतळ होईल आणि मग कराचीच्या विमान-तळावर उतरण्याची जरूर विमानांना भासणार नाही असें म्हणतात. येथे लोकांना राहण्यासाठी गांधीधाम, गोपालपुरी वगैरे उपनगरें वसविण्यांत आलेलीं असून त्यांची व्यवस्था सिंधु रीसेटलमेंट कार्पोरेशन या संस्थेकडे आहे. येथे मुख्यतः सिंधी व पंजाबी व्यापाऱ्यांचेंच प्राबल्य मला दिसलें.

सौराष्ट्रांतील अनेक व्यापारी आफ्रिकेंत व आग्नेय आशियांत व्यापारा-निमित्त गेलेले आहेत. तेथून ते विपुल संपत्ति मिळवून सौराष्ट्रांत येतात व तिचा उपयोग वैयक्तिक आणि सामाजिक कार्यांमध्ये करतात. अशा व्यापाऱ्यांपैकी जामनगरचे श्री. मेघजी पेथराज व पोरबंदरचे श्री. नानजी कालीदास यांचीं नांवें सौराष्ट्रांतून प्रवास करतांना आपल्याला हटकून ऐकूं येतात. या दोघांनी मिळून कांही कोटी रुपये सौराष्ट्रीय जनतेच्या कल्याणा-साठी खर्च केलेले आहेत. लोक कर्तबगार असले म्हणजे सरकारच्या मदतीशिवाय किती प्रचंड कामें होऊं शकतात याचें उदाहरण म्हणून या दोघांचें कार्य दाखवितां येईल. श्री. मेघजी पेथराज यांनी सौराष्ट्रांत शिक्षण व ग्रंथालयें याच्यासाठी मुख्यतः आपला पैसा वापरला आहे, तर युगांडा (आफ्रिका) मध्ये 'उसाच्या मळ्यांचा राजा' म्हणून प्रसिद्ध असलेल्या श्री. नानजी कालीदास यांनी आपला पैसा मुख्यतः स्त्रीशिक्षणाच्या कामीं वेचला आहे. पोरबंदर येथे 'आर्यकन्या गुरुकुल' नांवाची एक मोठी संस्था त्यांच्या पैशाने चाललेली असून स्वतः श्री. नानजी कालीदास यांच्या कन्याच तिच्या संचालिका आहेत. त्याखेरीज ठिकठिकाणीं मुलींच्या वसति-गृहांनाहि त्यांनी सढळ हाताने मदत केलेली आहे.

वि:
क्रमांक नों: दि:

## विविध प्रेक्षणीय स्थळें

सौराष्ट्र विस्ताराने लहानच असला तरी तेथे प्रेक्षणीय स्थळें भरपूर आहेत. अर्थात् त्यांपैकी बहुतेक धार्मिक स्वरूपाचींच आहेत आणि मानव-निर्मित सौंदर्यापेक्षा निसर्गाची जादूच मनाला मोहून टाकते. येथे कोणार्क किंवा भुवनेश्वरसारखी अप्रतिम शिल्पकला दिसत नाही किंवा अजिंठ्या-सारखी चित्रकलाहि दिसत नाही. येथे मुसलमानांनी नुसता विध्वंस केलेला आहे ! अहमदाबाद येथे दिसतात तशा मानवाला थक्क करून सोडणाऱ्या मशिदी व झुलते मनोरे येथे नाहीत; पण पालिताण्याजवळील शत्रुंजय टेकडीवरून आणि जुनागडजवळील गिरनारच्या डोंगरावरून आसमंतात् दिसणारीं दृश्यें पाहिलीं की मनाचा सारा शीण नाहीसा होतो. तसेंच सोमनाथाचें मंदिर असलेला प्रभासपाटणचा समुद्रकिनारा पश्चिम भारतांतील अत्यंत मनोहर किनाऱ्यांपैकी आहे आणि पोरबंदरच्या समुद्रकिनाऱ्यावर थोडा वेळ बसल्यास मनाला मोठा आनंद होतो. ज्यांना शक्य असेल त्यांना गीरच्या जंगलांत जाऊन वनराजाचेंहि दर्शन घेतां येतें. आणि छोटेछोटे तलाव तर सौराष्ट्रांत विपुल आहेत. भावनगरजवळील बोरतलाव तर अवश्य पाहण्या-सारखा आहे.



[ श्रीकृष्णाचें देऊळ : द्वारका ]

सौराष्ट्रांतीलच नव्हे, तर भारतांतील एक अत्यंत महत्त्वाचें क्षेत्र या नात्याने द्वारकेचें नांव सर्वांना परिचित आहे. येथील श्रीकृष्णाचें देऊळ प्रचंड असून जमिनीपासून शिखराच्या टोकापर्यंतची

ध्रांगध्रा व मीठापूरचे केमिकल्सचे कारखाने वगैरे अनेक स्थानें पाहण्यासारखीं आहेत. द्वारकेपासून कांही मैलांच्या अंतरावर समुद्रांत असलेलें बेटहि मोठें प्रेक्षणीय आहे. वडवाणचें राणकदेवीचें मंदिर इतिहास व वास्तुशास्त्र या दोन्ही दृष्टींनी महत्त्वाचें आहे; आणि जुनागडचे मकबरे व मशिदी पाहण्यासारख्या आहेत.

बहुतेक सर्व सौराष्ट्रभर मराठी मंडळी पसरलेली असून सौराष्ट्रीय जनतेशीं त्यांचे संबंध फारच सलोख्याचे व मैत्रीचे आहेत. किंबहुना, त्यांच्यांत दुजाभावच उरलेला नाही असें म्हणतां येईल.

## भाषा व शिक्षण

सौराष्ट्रांतील मेर, मियाणा, वाघेर, रबारी वगैरे आदिवासी जमातींच्या बोली वेगवेगळ्या असल्या तरी त्या सर्वांची मूळची भाषा काठेवाडी ही गुजरातीचीच बोली आहे. यामुळे सौराष्ट्राची भाषा गुजराती आहे असें म्हणण्यास हरकत नाही. विलिनीकरणापूर्वी गोंडल, भावनगर वगैरे संस्थानांत शिक्षणाचा बराच प्रसार झालेला होता व स्त्रीशिक्षणाला विशेष उत्तेजन मिळत होतें. परंतु एकूण सौराष्ट्राचा विचार करतां शिक्षण खूपच कमी होतें. गेल्या सात वर्षांत तें बरेंच वाढलें असून विद्यार्थ्यांची संख्या दीडपट झाली आहे. तेथे सध्या २४८६ प्राथमिक शाळा, ९८ माध्यमिक शाळा, ६ कॉलेजें, ४ ट्रेनिंग कॉलेजें, १० संस्कृत पाठशाळा व १३ बालमंदिरें असून : लाखांवर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणावर सुमारें दीड कोटि रुपये खर्च होतात.

येथील विद्यार्थी मुंबईच्याच शालान्त परीक्षेला (एस्. एस्. सी.) बसतात व येथील कॉलेजें गुजरात युनिव्हर्सिटीला जोडलेलीं आहेत. मूलोद्योगी शिक्षणाचा प्रयोगहि येथे यशस्वीपणें चालू असून सणोसरा येथील ‘ लोकभारती ’ हें ग्रामीण विद्यापीठ या दृष्टीने भारतांतील बहुधा पहिलेंच विद्यापीठ असावें. येथील शिक्षणक्रम खेडीं दृष्टीसमोर ठेवून आखण्यांत आलेला असून या विद्यापीठांतून बाहेर पडणारे विद्यार्थी नोकरी करण्याऐवजी उत्तम शेतकरी, शिक्षक व ग्रामसेवक बनतील. प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. नानाभाई भट्ट या संस्थेचे संचालक आहेत.

## साहित्य व कलांच्या प्रांगणांत

सौराष्ट्राच्या नापीक भूमींतून धान्य फारसें निर्माण झालें नाही तरी काव्य मात्र विपुल प्रमाणांत उत्पन्न झालें आहे व होत आहे. दिवंगत सौराष्ट्रीय कवींपैकी श्री. मणिशंकर भट्ट ऊर्फ कान्त कवि व कवि कलापी; लेखकांपैकी श्री. झवेरचंद मेघाणी व श्री. गिजूभाई यांचीं नांवें विशेष प्रसिद्ध आहेत.

गद्यलेखकांपैकी पोरबंदरचे श्री. गुलाबलाल ब्रोकर हे गुजरातींतील प्रसिद्ध कथालेखक असून ते सध्या मुंबईत असतात. श्री. मनुभाई पंचोळी हे शिक्षणतज्ज्ञ व साहित्यिक या दोन्ही नात्यांनी प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक नाटकें, कादंबऱ्या व चिंतनात्मक लेख लिहिले आहेत. हे सध्या सणोसरा येथील ' लोकभारती 'चे उपप्रमुख आहेत. या संस्थेचे संचालक श्री. नानाभाई भट्ट हेहि अत्यंत लोकप्रिय लेखक आहेत.

गुजराती नियतकालिकें आणि प्रकाशन-संस्था यांचीं केंद्रें मुंबई व अहमदाबाद हींच आहेत. यामुळे सौराष्ट्रांत नियतकालिकांचा संसार अगदीच तुटपुंजा आहे. येथे ' जय हिंद ', ' फुलछाब ' व ' नूतन सौराष्ट्र ' हीं तीन दैनिकें असून तीं तिन्ही राजकोटहून निघतात. यांतील पहिलें कॉंग्रेसविरोधी असून त्याचा खप सर्वांत जास्त आहे. पण पत्राचें स्वरूप सामान्य जिल्हा पत्रांसारखेंच आहे. ' सरस्वती ', ' विकास ', व ' सौराष्ट्र ' हीं तीन मासिकें सरकारी असून तीं राजकोटहून निघतात. श्री. महेंद्र मेघाणी यांच्या संपादकत्वाखाली भावनगरहून निघणारे ' मिलाप ' हें विशेष प्रतिष्ठित मासिक आहे. पण त्याचें स्वरूप कांहीसें उच्च दर्जाच्या डायजेस्टसारखें आहे.

सौराष्ट्रांतील अनेक कलाकार सध्या सौराष्ट्राबाहेरच कार्य करीत आहेत. गोंडलचे प्रसिद्ध गवयी श्री. शिवकुमार शुक्ल हे बडोद्याच्या संगीत ॲकॅडमीचे प्रिन्सिपॉल आहेत, तर भावनगरचे गवई श्री. यशवंतराव पुरोहित मुंबईला असतात. भावनगर येथे श्री. जगदीप वीराणी यांनी ' सप्तकला ' या नांवाची एक संस्था चालविलेली असून तेथे ते स्वतः गायन, वादन, नृत्य; अभिनय, चित्र, शिल्प व फोटोग्राफी या सात कलांचें शिक्षण देत असतात.

चित्रकलेच्या क्षेत्रांत भावनगर हें सर्वांत अग्रेसर आहे. तेथील प्रसिद्ध चित्रकार श्री. सोमालाल शाह यांनी काठेवाडी जनतेचें जीवन चित्रित करणारीं अनेक चित्रें काढलेलीं असून ' रंगरेखा ' नांवाचा त्यांचा चित्रसंग्रह प्रसिद्ध आहे. ' बर्डस् ऑफ सौराष्ट्र ' हें त्यांचें दुसरें महत्त्वाचें पुस्तक होय.

पोरबंदरचे श्री. पुरुषोत्तम डाबी यांचें शिक्षण चौथीपर्यंतच झालेलें असलें तरी स्थापत्यकलेच्या क्षेत्रांत त्यांचा हात धरणारे फार थोडे लोक सापडतील.


सौराष्ट्रांतील संस्थानांचा क्रिकेटपटूंच्या निर्मितीला चांगला उपयोग झाला होता. गुजरातचे म्हणून जे प्रसिद्ध क्रिकेटपटु आपल्याला माहीत आहेत ते बहुतेक सौराष्ट्रांतच पुढे आलेले आहेत. रणजी, दुलीप, अमरसिंह, एल्. रामजी, लखजीराज व विनू मनकड हीं नांवें क्रिकेटप्रेमी लोकांना चांगलींच परिचित आहेत.

## उज्ज्वल भविष्यकाळ

अशा प्रकारें जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत झपाट्याने प्रगति करीत असलेल्या या छोट्याशा भूप्रदेशाचा भविष्यकाळ अत्यंत उज्ज्वल आहे याविषयी माझी तर खात्रीच पटली. शेती व उद्योगधंदे यांच्या विकासासाठी सौराष्ट्राने ज्या योजना आखल्या आहेत त्यांना लागणारा पैसा सौराष्ट्रांतून निर्माण होणें आज तरी शक्य नाही. यामुळे एखाद्या मोठ्या प्रांतामध्ये विलीन होणेंच त्याला भाग आहे. आज ना उद्या सौराष्ट्र महागुजरातमध्ये विलीन होणार आहे या दृष्टीनेच सौराष्ट्रीय नेत्यांनी आतापर्यंत पावलें टाकलेलीं आहेत. पण त्याचा त्यांनी मुळीच गाजावाजा केलेला नाही. सौराष्ट्राचें नवें राज्य बनल्याबरोबर तेथील सगळी राज्यपद्धति मुंबई राज्याच्या पद्धतीबरहुकूम करण्यासाठी तेथील अधिकारी पुण्या-मुंबईला येऊन माहिती व शिक्षण घेऊन गेले होते ही गोष्ट आपल्यांपैकी फारच थोड्यांना ठाऊक असेल.

भारतामध्ये जेथे जेथे संस्थानांच्या विलिनीकरणाचा प्रश्न उत्पन्न झाला तेथे तेथे स्थानिक लोकांनी त्या गोष्टीला अत्यंत निकराने प्रतिकार केला.

परंतु सौराष्ट्राने मात्र पहिल्यापासूनच याची मानसिक तयारी चालविलेली होती. यामुळे राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिद्ध होतांच सौराष्ट्राने त्याचा आनंदाने स्वीकार केला. कांही काँग्रेसेतर पक्षांनी सौराष्ट्र स्वतंत्र ठेवण्याची मागणी केली, नाही असें नाही; परंतु काँग्रेसखेरीज दुसरा नांव घेण्यासारखा पक्षच सौराष्ट्रांत नसल्यामुळे त्यांचा तो आवाज हवेंतच विरून गेला. सौराष्ट्रीय जनता आमच्याइतकी बुद्धिमान् आहे की नाही हा वाद आता सर्वथा अप्रस्तुत ठरेल. पण ती आमच्यापेक्षा जास्त शहाणी आहे याचा प्रत्यय मात्र मला सौराष्ट्रांत फिरतांना पदोपदीं येत होता आणि केवळ बुद्धिमत्तेपेक्षा शहाणपणच जीवनांत अधिक उपयोगीं पडतें हा अनुभव आपल्याला सध्या येतच आहे.



# केरळ

'काश्मीर हें भारतांतील प्रथम श्रेणीचें नंदनवन मानलें तर केरळला आपोआपच दुसरा क्रमांक लाभतो; आणि म्हणूनच कांही लोक केरळला 'दक्षिणेंतील काश्मीर' असेंहि म्हणतात. " केरळमध्ये प्रेक्षणीय स्थळें कोणकोणतीं आहेत ? " असें मीं एका केरळीय मित्रांना विचारलें. तेव्हा त्यांनी दिलेलें उत्तर नमुनेदार होतें. ते म्हणाले, " सारा केरळच प्रेक्षणीय आहे. एखादा किल्ला, राजवाडा किंवा मंदिर यांच्यापुरती त्याची प्रेक्षणीयता मर्यादित नाही. तुम्ही नुसते डोळे अन् हृदय उघडें ठेवून केरळमधून फेरफटका मारा; म्हणजे तुमच्या लक्षांत येईल की, या प्रदेशांत निसर्गसौंदर्याचं जणू भांडारच उघडलेलं आहे ! " त्या मित्रांच्या या उद्‌गारांची सत्यता मला लौकरच पटली. या प्रदेशामध्ये खुल्या वातावरणांत जेवढें कांही निसर्गनिर्मित पाहण्यासारखें आहे त्यामानाने चार भिंतींच्या आंत किंवा मानवाने निर्मिलेलें फारच थोडें पाहण्यासारखें आहे. मी केरळमध्ये दोनदा फिरलों आहें. पहिल्या खेपेला तिरु अनंतपुरम्-( त्रिवेंद्रम )-चें प्रख्यात अनंतशयनम्-( विष्णु )-चें मंदिर, पद्मनाभपुरम्‌चा राजवाडा, कोच्चि-( कोचीन )-चें कृत्रिम किंवा मानव-निर्मित बेट ( कोचीन हार्बर आयलंड ) एर्नाकुलम् शहराचें सुंदर दृश्य वगैरे गोष्टी मीं पाहिल्या, तर दुसऱ्या खेपेला शंकराचार्यांचें जन्मस्थान कालटी गाव, 'केरळचें पंढरपूर' म्हणून प्रसिद्ध असलेलें गुरुवायूरचें मंदिर, त्रिचूर हें टुमदार शहर आणि केरळमधील दुसऱ्या नंबरचें शहर कालिकत

( कोळिकोड ) पाहिलें. अशा प्रकारें दोन खेपांत केरळची परिक्रमा पुरी झाली. अर्थात् कुठून कुठेहि गेलें तरी केरळचें वैशिष्ट्य जें सृष्टिसौंदर्य तें आपल्या डोळ्यांसमोर नाचतच असतें. शेवटीं शेवटीं मला वाटूं लागलें की, या सौंदर्यदर्शनाचें माझ्या मनाला अजीर्ण तर होणार नाही ना ?

## डोंगरावरील नारळीच्या बागा

क्षितिजापर्यंत पसरलेल्या नारळी-पोफळीच्या बागा, मधूनच वाहणाऱ्या छोट्या-छोट्या पहाडी नद्या आणि त्या नद्यांच्या पाण्याचा मुक्तपणें उपभोग घेणारीं हिरवींगार भातशेतें हा केरळीय निसर्गसौंदर्याचा स्थायीभाव आहे. कोणत्याही ऋतूंत तुम्ही गेलांत तरी यांत उणीव आढळणार नाही. म्हणून तर केरळला ‘ नंदनवन ’ म्हणतात ! मलबारांतून कर्नाटकांत जातांना जो पश्चिम घाट ओलांडावा लागतो तो निसर्गसौंदर्याच्या दृष्टीने परमोच्च बिंदु समजला जातो. घाटावरून मंगळूरला जातांनाहि हाच पश्चिम घाट मीं ओलांडला होता आणि त्याची भयाण भव्यता छाती दडपून टाकते असा मलाहि अनुभव आला. परंतु केरळची जीं विशेष गोष्ट माझ्या मनांत ठसून राहिली आहे ती म्हणजे डोंगरावरील नारळीच्या बागा ही होय. कालटीहून कोळिकोड-( कोझीकोडे, कालिकत )-ला जातांना या बागा मीं पाहिल्या. डोंगरावर लावलेल्या नारळी-पोफळीच्या झाडांना पाणी द्यायचें म्हणजे किती परिश्रम करावे लागत असतील याची कल्पनाच केलेली बरी ! अशा प्रकारचे परिश्रम मुख्यतः किरिस्तांव आणि मुसलमान लोकच करीत असावेत. कारण मीं पाहिलेल्या बागा मलबारच्या मुस्लिम वस्ती असलेल्या भागांतच होत्या. डोंगरावरील नारळीच्या झाडांचे नारळ अत्यंत गोड असतात असें ऐकलें. इतकी मेहेनत घेतल्यानंतर फळामध्ये गोडी न उतरली तरच आश्चर्य !

## जलवाहतुकीची सोय : ‘ बॅक–वॉटर्स ’

या प्रदेशांतील जलवाहतुकीची सोय हें याचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. पश्चिम किनाऱ्यावरील अरबी समुद्राचें पाणी अनेक ठिकाणीं किनारा ओलांडून केरळच्या भूमींत घुसलेलें आहे, आणि समुद्राला समांतर अशी उत्तर-दक्षिण खोल पाण्याची उभी पट्टी बनलेली आहे. कांही ठिकाणीं

मोठमोठीं सरोवरें कालव्यांनी जोडलेलीं आहेत, आणि कित्येक नद्या समुद्राला मिळाल्यानंतर आपलें पाणी देण्याऐवजी समुद्राचेंच पाणी आपल्या उगमाच्या दिशेने घेऊन जातात. अशा प्रकारच्या या जलप्रवाहांना येथे ' बॅक-वॉटर्स '— मल्याळम् भाषेंत त्यांना ' कायल ' असें नांव आहे—असें म्हणतात. आपण त्यांना ' खाडी ' असें म्हणूं शकतों. या जलप्रवाहांतून लहान-मोठ्या बोटी आणि पडाव अहोरात्र उतारूंची व मालाची वाहतूक करीत असतात. त्यामुळे अधूनमधून झालेल्या बेटांना किंवा खुष्कीच्या वाहतुकीची सोय नसलेल्या प्रदेशांना एकाकी वाटत नाही. कोझीकोडेजवळच्या एका ' बॅक-वॉटर्स ' मधून आम्ही एका सायंकाळीं सहज सहल करून आलों. तेव्हा पाण्याने वेढलेल्या प्रदेशावरील नारळी-पोफळीच्या बनांनी वेष्टिलेल्या झोपड्या जणू परीकथेंतल्या एखाद्या अद्‌भुत नगरीप्रमाणे किंवा स्वप्नलोकांतील मोहक वस्तीप्रमाणे आमच्या डोळ्यांसमोरून तरंगत जाऊं लागल्या. त्या पाहून आमचें भान हरपून गेलें. अशा एका बेटावर स्टेनलेस स्टीलचा एक मोठा कारखानाच चालू होता. तिथे काम करणाऱ्या आपल्यासभोवतालच्या पाण्याची जणू पर्वाच नव्हती. मुंबईच्या एखाद्या निवान्त उपनगरांत वावरावें तसें ते लोक त्या बेटावर वावरत होते. या खाड्यांतील पाणी मात्र अत्यंत मळकट असतें. यामुळे नावेंत बसल्यानंतर पाण्यांत हात बुडवून खेळ करण्याची इच्छा आपल्याला होत नाही. नुसत्या कालिकतजवळ सुमारें पन्नास मैलांपर्यंत ' बॅक-वॉटर्स ' मध्ये इमारती लाकडांचे ओंडके तरंगतांना आढळतात यावरून या जलमार्गांचें महत्त्व ध्यानांत येईल.

## लोकसंख्या व उत्पादन

चहा, कॉफी व रबर यांच्या मळ्यांखेरीज येथे कांही महत्त्वाचे उद्योगधंदे व कारखाने चालू असून रबर-फॅक्टरी, जहाजबांधणी वगैरेंचे आणखी कांही कारखाने काढण्यासंबंधी केरळच्या साम्यवादी सरकारने प्रख्यात उद्योगपति श्री. बिडला ( बिर्ला ) त्यांच्याशीं बोलणीं चालविलीं आहेत. छोट्या छोट्या वस्त्यांना आपण ' खेडें ' असें म्हणतों. अशा प्रकारचीं खेडीं केरळमध्ये जवळजवळ नाहीतच. किंबहुना केरळचे कायदेमंत्री श्री. अय्यर यांनी सर्वोदय-संमेलनांतील आपल्या भाषणांत म्हटल्याप्रमाणे ' कन्याकुमारी-

पासून कासरगोडपर्यंत पसरलेला सारा केरळ प्रदेश हें एक मोठें खेडेंच आहे.' येथील थोडीं शहरें वगळल्यास बहुतेक ठिकाणीं लोकवस्ती नारळीच्या बागांतून व चहा-कॉफीच्या मळ्यांतून विखुरलेली आहे. पण ती कांही कमी नाही. केरळची एकूण लोकसंख्या १ कोटी ३६ लक्ष असून क्षेत्रफळ १४९८० चौरस मैल आहे. भारतामध्ये सर्वांत दाट लोकवस्ती ( दर चौरस मैलास ९७४ लोक ) याच राज्यांत आहे. जुन्या तिरुवितांकूर ( त्रावणकोर ) प्रदेशांत तर दर चौरस मैलास १११२ माणसें राहतात. कोच्चि ( कोचीन ), तिरुवितांकूर व मलबार या तीन प्रदेशांचा या राज्यांत समावेश होतो. मलबारचा भाग १९५६ पूर्वीं मद्रास राज्यांत होता. तो नव्या राज्यनिर्मितीनंतर केरळमध्ये सामील झाला. याच वेळीं दक्षिणेकडील तमिळ भाषी तालुके मद्रास राज्यांत सामील करण्यांत आले. या तालुक्यांत तांदूळ मोठ्या प्रमाणावर होत होता. यामुळे केरळचें नुकसान झालें; परंतु त्याच वेळीं मलबारचीं जंगलें मिळाल्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तींत भर पडली.

येथे सर्वांत मोठा धंदा नारळीच्या काथ्याचा—दोऱ्या, मॅटिंग, पायपुसणीं, गालिचे वगैरेंचा—असून त्यांत ५ लक्ष लोकांना उद्योग मिळतो. केरळच्या पूर्व भागांत कोट्टयम ( कोट्टायम ) जिल्ह्यांत चहाचे व रबराचे मळे असून त्यांनी हजारों एकर डोंगराळ जमीन व्यापलेली आहे. या मळ्यांची संख्या ५५ पेक्षा अधिक असून तेथे काम करणाऱ्या कामगारांची संख्या एक लाखाहून अधिक आहे. नवा मलबार सोडला तर पूर्वीच्या त्रावणकोर-कोचीन राज्यांत २८६३००० लोक प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष शेतीवर अवलंबून आहेत. त्यांपैकी १३७६६८६ कसणारे मालक, ३३३०८८ कसणारीं कुळें आणि ६८७६९४ शेतमजूर आहेत. सबंध किनाऱ्यावर मच्छीमारीचा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. त्रावणकोर-कोचीनची सुमारें १० लक्ष एकर जमीन भातशेतीखाली असून मलबारच्या ८ लक्ष एकर जमिनींत तांदूळ पिकतो. नारळाच्या लागवडीखाली १० लक्ष एकर, काजू १ लक्ष एकर, मिरीं २ लक्ष एकर, सुपारी ७५ हजार एकर, वेलदोडे ६० हजार एकर, सुंठ ३५ हजार एकर, गवती चहा ( लेमन ग्रास ) ४० हजार एकर—अशी जमीन विभागली गेली आहे. त्रावणकोर-कोचीनमध्ये ३०५२ चौरस

मैलांत जंगल असून मलबारचें जें जंगल १७५० चौरस मैलांत विस्तारलेलें आहे तें खाजगी मालकीचें आहे. समुद्रकाठच्या वाळूंत मोनाझाइट सापडतें. अभ्रक, ग्राफाइट, लिग्नाइट, सिलिमिनाइट, शाडूची माती, चुनखडी वगैरे खनिज पदार्थ ठिकठिकाणीं भरपूर सापडतात. परंतु यांचा जितका उपयोग करून घेतला पाहिजे तितका आजवर घेण्यांत आलेला नाही.

या प्रांतामध्ये ७५० च्या वर लहान-मोठे कारखाने असून ( मलबार सोडून ) त्यांत १॥ लक्षावर कामगार कामाला आहेत. ॲल्युमिनियम्, कांच ( ग्लास ), पॉटरी, रेयॉन, कागद, काजू, काथ्या, रासायनिक खतें, सिमेंट, पेन्सिल्स, शार्कलिव्हर ऑइल, आगपेट्या, खोबरेल, साबण, मॅटिंग्ज वगैरेंचे कारखाने प्रमुख आहेत. यांपैकी ७ औद्योगिक कारखाने सरकारच्या मालकीचे असून ४० कारखान्यांमध्ये सरकारचे बहुसंख्य शेअर्स आहेत. खासगी कारखान्यांमध्ये मुख्यतः काजू आणि काथ्या यांचे कारखाने मुख्य आहेत. त्याखेरीज काथ्याच्यां दोऱ्या वळणें, हातमागावर कापड विणणें, हस्तिदंताचें कोरीव काम, फर्निचर तयार करणें, कांसें, तांबें व पितळ यांचीं भांडीं तयार करणें, चामड्याचें काम, मधमाशा पाळणें, ताडा-माडाच्या पानांच्या वस्तू, चटया वगैरे तयार करणें इत्यादि उद्योग ग्रामोद्योगाच्या स्वरूपांत चालू असतात.

दरसाल सरासरी ९० इंच पाऊस पडणाऱ्या या राज्यांत अनेक धरण-योजना सध्या सुरू असून मलमपुळा, मंगलम्, वालायार या ६ कोटी रुपयांच्या योजना पूर्ण झाल्या आहेत. या योजनांमुळे लाखो एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होणार आहे. केरळमधील पेरियार, कोरायार, मुदिरापुळा, मानली, चलकुडी, वडक्कंचेरी, नेयार वगैरे नद्यांचाहि चांगला उपयोग करून घेण्यांत येत आहे.

## व्यापारी पिकांवर भर

केरळमध्ये आधीच जमीन कमी आहे. परंतु जी आहे तिचा उपयोगहि अन्नधान्यांच्या उत्पादनाच्या कामीं न करतां व्यापारी पिकांकडे करण्याची प्रवृत्ति लोकांमध्ये विशेष दिसून येते. यामुळे गेल्या कांही वर्षांत—विशेषतः दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीपासून—भातजमिनींची संख्या झपाट्याने कमी

होऊन त्यांच्या जागीं नारळी-पोफळीचीं बनें दिसूं लागलीं आहेत. अर्थात् नारळ आणि सुपारी यांच्यामुळे थोड्याशा जमीनमालकांना भरपूर पैसा मिळूं लागला असला, तरी शेती बंद झाल्याने शेकडो-हजारो शेतमजूर बेकार झाले, ( कारण नारळीच्या बागांना शेतमजुरांची फारच थोडी जरूर असते. ) व केरळचें एकमेव अन्न जें तांदूळ त्या बाबतींत हा प्रदेश पूर्णपणें परावलंबी बनला आणि दुष्काळाचें संकट कायमचें त्याच्या नशिबीं आलें. ही गोष्ट स्वार्थी जमीनमालकांच्या लक्षांत आलेली दिसत नाही. निःस्वार्थी विचारवंतांना मात्र हा धोका कळून आलेला आहे. इतर प्रदेशांना केरळच्या या प्रयोगापासून चांगला धडा घेतां येण्यासारखा आहे.

नारळ, सुपारी, काजू, अननस, फणस, केळीं, आंबे वगैरे कोकणांत व गोव्यांत होणारीं फळें केरळमध्ये विपुल होतातच; शिवाय त्याखेरीज चहा, कॉफी, रबर, काळीं मिरीं, वेलदोडे, सुंठ, तवकील, साबूदाणा वगैरे केरळचे कांही खास जिन्नसहि आहेत. तसेंच अणुशक्तीच्या निर्मितीला लागणारें ‘ थोरियम् ’ हें द्रव्य येथील किनाऱ्यावरील वाळूंत सापडतें. चहाच्या व रबराच्या मळ्यांनी खूप मोठा प्रदेश व्यापलेला असून बहुतेक मळे इंग्रज कंपन्यांच्या मालकीचे आहेत. त्यांचा फायदा निर्यात-कराच्या रूपाने मध्यवर्ती सरकारला थोडा-फार होत असला तरी प्रत्यक्ष केरळला मात्र त्यांचा कांही फायदा होत नाही; आणि म्हणून नव्या साम्यवादी सरकारने या मळ्यांच्या राष्ट्रीयीकरणाची मागणी केलेली आहे.

येथील काळीं मिरीं हें उत्पन्नाचें फार मोठें साधन होऊं शकेल. एके काळीं काळ्या मिऱ्यांचा भाव ७० रुपये मण होता. तो चढतां चढतां ४ हजार रुपये मणापर्यंत वाढला होता; आणि आता तो ७०० रुपये मणापर्यंत येऊन ठेपलेला आहे. यावरून त्याचें महत्त्व लक्षांत येईल. हीं मिरीं इंग्लंड–अमेरिकेंत विशेष खपतात. त्यामुळे परदेशी चलन मिळण्यासहि त्यांचा उपयोग होतो.

केरळमध्ये ‘ टॅपिओका ’ नांवाचें रताळ्यासारखें एक पीक होतें. मध्यंतरीं अन्नटंचाईच्या काळांत ( १९५२ सालीं ) लोकांनी टॅपिओकाचे तुकडे वाळवून त्यांचें पीठ करून खाल्लें आणि जीव कसाबसा जगवला. दुभत्या जनावरांनाहि टॅपिओका घालतात. आता सिंगापूरचा साबूदाणा बंद

झाल्यामुळे या 'टॅपिओका' पासून साबूदाणा तयार करण्याचे कारखाने केरळमध्ये सुरू झाले आहेत. अत्यंत निकृष्ट आणि माळरान जमिनींतहि टॅपिओका अत्यंत प्रचंड प्रमाणावर होऊं शकतो. त्यामुळे त्यासाठी सकस जमीन वापरावी लागत नाही. पिकांची समतोल व योग्य आखणी झाल्यास केरळची अन्नधान्य-समस्या सहज सुटूं शकेल असें तज्ज्ञांचें मत आहे.

## ४६ हजार रुपयांचा ओंडका

केरळच्या मलबार भागांत खूप मोठमोठीं दाट जंगलें आहेत. त्यांतील लाकूड जगप्रसिद्ध आहे. आपल्याकडेहि मलबार-टीक किंवा मलबारी सागवान उत्तम प्रतीचें गणलें जातें. सागाप्रमाणेच 'शीशम्' ऊर्फ शिसवीचें लाकूडहि या जंगलांत मोठ्या प्रमाणावर आणि उत्कृष्ट प्रतीचें मिळतें. शेकडो वर्षांचीं जुनीं शिसवीचीं झाडें या जंगलांत पाहावयास मिळतात. हें सारें लाकूड कालिकतच्या बंदरांतून बाहेरच्या देशांत व इतर प्रदेशांत निर्यात होतें. लाकडाचा इतका मोठा व्यापार कालिकतला चालतो की, तें त्या बाबतींत जगांतील दुसऱ्या नंबरची बाजारपेठ समजली जाते. येथील शिसवीचें उत्कृष्ट लाकूड मुख्यतः इंग्लंड–अमेरिकेला जातें. त्याच्या किंमती ऐकल्या की आपल्याला आश्चर्याचा धक्काच बसतो. कांही दिवसांपूर्वी या बंदरांतून एक शिसवीचा ओंडका परदेशाला रवाना झाला. त्याची किंमत सेहेचाळीस हजार रुपये होती ! आम्ही गेलों त्या वेळीं बाजारांत सत्तावीस हजार रुपयांचा एक ओंडका विक्रीसाठी आलेला होता. शिसवीच्या लाकडाचें फर्निचर युरोप–अमेरिकेंत फार लोकप्रिय असल्यामुळे ते लोक भरमसाट किंमत देऊन हें लाकूड खरेदी करतात. वस्तुतः परदेशी चलन मिळविण्यासाठी या लाकडाचें पद्धतशीर उत्पादन आणि संवर्धन आपल्याला करतां येण्यासारखें आहे. परंतु जंगलतोडीकडे सरकारचें दुर्लक्ष असल्यामुळे वाटेल तसा जंगलाचा नाश होत आहे, असें तेथे कळलें.

## मातृसत्ताक समाजपद्धति

जुन्या कोच्चि ( कोचीन ) राज्याचे मुख्य मंत्री श्री. इकंडा वारियर यांच्या घरीं मी त्रिचूरला उतरलों होतों. त्यांच्या दारावर एक पाटी होती. 'के. बाळकृष्ण मेनन, ॲड्व्होकेट.' हे गृहस्थ सहकुटुंब सहपरिवार

श्री. वारियर यांच्या घरींच राहत होते आणि अगदी घरच्याप्रमाणे वागत होते. आपल्याकडे ओळख करून देण्याची पाश्चिमात्यांची पद्धत अजून रूढ झालेली नसल्यामुळे श्री. वारियर यांनी श्री. मेनन यांची पद्धतशीर ओळख करून दिली नाही. पण ते बाहेर गेल्यावर आम्ही दोघेच राहिलों आणि गप्पागोष्टी करणें आम्हांला भागच पडलें. माझी अशी समजूत झाली होती की, श्री. मेनन हे वारियरांचे जावई असावेत. तरी पण खात्री करून घेण्यासाठी मीं त्यांना विचारलें, " तुम्ही वारियरांचे जावईच ना ? " त्यावर ते हसून म्हणाले, " छेः छेः ! मी त्यांचा मुलगाच आहें. "

" अरे, मग तुमचं नांव मेनन कसं ? "

" कारण माझ्या आईचं नांव मेनन आहे. माझे वडील ' वारियर ' म्हणजे देवासाठी फुलांच्या माळा करणारे—माळी जातीचे—आहेत. ती जात ' मेनन ' जातीपेक्षा उच्च समजली जाते. त्यांनी जर वारियर स्त्रीशीं लग्न केलं असतं तरच मला वारियर नांव लावतां आलं असतं. पण त्यांनी खालच्या जातींतल्या स्त्रीशीं लग्न केलं; म्हणून मला आईचं नांव लावणं भाग आहे. "

" पण समजा, तुम्ही वारियर नांवच लावलं असतं तर काय बिघडलं असतं ? "

" एवढंच बिघडलं असतं की, वारियर लोकांनी मला वाळीत टाकलं असतं अन् मेनन लोकांनी जवळ केलं नसतं. फायदा कांहीच झाला नसता. "

" पण तुम्हांला यांत कमीपणा नाही वाटत ? "

" मुळीच नाही ! ही तर आमच्या या भागांतली रूढ पद्धति आहे. माझ्या वडिलांनी तर माझ्या आईशीं लग्नहि केलं होतं. पण प्रत्यक्ष लग्न न होतां केवळ ' सम्बन्धम् 'च्या द्वारेंहि जीं नायर–मेनन मुलं होतात त्यांनाहि त्यांत कांही कमीपणा वाटत नाही आणि तीं आपल्या आईचं नांव मोठ्या अभिमानानं लावीत असतात. " श्री. मेनन म्हणाले.

श्री. मेनन यांच्याशीं बोलतांना जेव्हा ते ' माझं घर ', ' माझे लोक ' असें म्हणत, तेव्हा मला मोठें चुकल्याचुकल्यासारखें होई. कारण त्यांच्या

‘ माझें ’ या शब्दांचा अर्थ ‘ माझ्या वडिलांचें ’ नसून ‘ माझ्या आईच्या आईचें ’—‘ माझ्या मामाचें ’ असा होता. या भागांत बहुसंख्य कुटुंबांत पुरुषाला वारसा हक्कच नव्हता. स्त्री हीच संपत्तीची उत्तराधिकारिणी असे. मुलाला शिक्षण देण्याचीच फक्त जबाबदारी कुटुंबावर असे. बाप जिवंत असेपर्यंत मुलगा आपल्या बापाच्या घराण्यांतून अन्न-वस्त्र-शिक्षण मिळवूं शकत असे आणि त्याच्या मृत्यूनंतर स्वतःच्या हयातीपर्यंत आईच्या इस्टेटीचा लाभ घेऊं शकत असे. पण हें सर्व मोहबतीने. कायद्याने त्याचा कांही हक्क नव्हता. कायद्याप्रमाणे मुलगी हीच आईच्या संपत्तीची उत्तराधिकारिणी असे. त्यामुळे लग्न झाल्यानंतर एखादें वर्ष ती सासरी जाई आणि जी एकदा माहेरीं म्हणजे आपल्या हक्काच्या घरीं येई ती पुन्हा नवऱ्याच्या घरीं जात नसे. यामुळे नवराच नांदण्यासाठी बायकोच्या घरीं जाई. या कायद्याला ‘ मरिमक्कतायम् ’—मुलीच्या मुलाचा वारसा—असें नांव आहे. या कायद्यामुळे स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीचेंच नव्हे, तर त्याहूनहि श्रेष्ठ असें स्थान मिळालें होतें. परंतु हा कायदा गुंतागुंतीचा आणि भारतांत रूढ असलेल्या सर्वमान्य कायद्याहून भिन्न असल्यामुळे तो बदलावा, असे प्रयत्न पूर्वीच सुरू झालेले होते. स्वराज्यप्राप्तीनंतर नवा हिंदु-कोड कायदा देशांतील इतर भागांप्रमाणे केरळलाहि लागू झाल्यामुळे कायदेशीर रीत्या ही परिस्थिति उरलेली नाही. परंतु लोकांचीं मनें नव्या बदलाशीं अजून एकरूप न झाल्यामुळे बहुतेक ठिकाणीं जुनी परंपराच चालू आहे. स्त्रीचें आर्थिक स्वातंत्र्य आणि समाजांतील उच्च स्थान यांच्या दृष्टीने हा जुना कायदा फायदेशीरच ठरला असें म्हणतां येईल. माप्पिळा ( मोपला ) या केरळीय मुसलमानांमध्ये हाच ‘ मरिमक्कतायम् ’ कायदा लागू असून तेथे लग्न झाल्यानंतर नवरा बायकोच्या घरीं जातो व तिच्या संपत्तीचा मालक बनतो, एवढाच फरक आहे.

गेल्या खेपेस पालघाटजवळील एका खेड्यांत आम्ही सकाळच्या फराळाला गेलों होतों. ज्या घरांत आमची व्यवस्था करण्यांत आलेली होती तें एक प्रकारें आंतरजातीय कुटुंब होतें. घरचा कर्ता पुरुष ‘ नपूतिरि ’ ( नंबुद्री ) ब्राह्मण होता. परंतु त्याची पत्नी नायर असल्यामुळे त्याच्या दोन्ही मुलीहि नायरच होत्या. त्यांपैकी एकीचा नवरा नंबुद्री ब्राह्मण आणि

दुसरीचा अय्यर ( मद्रासी ) ब्राह्मण होता. त्यांची सर्व संतति नायरच समजली जाणार होती.

## नंबुद्री ब्राह्मणांच्या सोयीसाठी !

केरळमधील नायर, मेनन वगैरे लोक हे सामान्य शेतकरी असूनहि अत्यंत बुद्धिमान् आहेत. याचें कारण त्यांची सारी प्रजा ही संकरसंतति आहे. संकरज प्रजा अत्यंत बुद्धिमान् असते असें म्हणतात. परंतु हा संकर कांही उगीचच्या उगीच झालेला नाही. तो येथील नंबुद्री ब्राह्मणांच्या सोयीसाठी अस्तित्वांत आलेला आहे.

नंबुद्री ब्राह्मणांमध्ये आपल्याप्रमाणेच मुलाला बापाचा वारसा मिळतो. परंतु इस्टेटीच्या वांटण्या होऊं नयेत म्हणून त्यांनी असा नियम केला की, फक्त थोरल्या मुलानेच लग्न करावें. तेव्हा इतर मुलांपुढे प्रश्न उभा राहिला. त्यांना सर्वांनाच ब्रह्मचारी राहणें शक्य नव्हतें. तें नैसर्गिकहि नव्हतें. म्हणून त्यांनी ब्राह्मणेतर समाजांतील स्त्रियांशीं 'संबंध' ठेवले. यालाच 'संबंधम्' असें म्हणतात. त्यांची स्थिति आपल्याकडील रखेल्यां-सारखीच होती. कारण हा ब्राह्मण तिच्या घरांत फक्त रात्रींच जाई, आणि दिवसभर आपल्या वडिलार्जित घरांत राही. त्या स्त्रीच्या हातचें पाणी किंवा भोजन त्याला चालत नसे. त्याच्या या संबंधाला कायद्याची अडकाठी नव्हती; परंतु त्यांच्या मुलाला बापाचें नांव लावतां येत नसे किंवा वडिलार्जित संपत्तींत वांटा मागतां येत नसे. अर्थात् बापाने जें कांही स्वतः मिळविलें असेल तें तो आपल्या मुलांना देऊं शकत असे आणि तो देतहि असे. फक्त आपली जात व नांव तो देऊं शकत नसे. त्याची स्त्री ही लग्नाने त्याची बायकोहि झालेली नसली तरी पातिव्रत्याच्या बाबतींत ती लग्नाच्या बायकोलाहि हार जाणारी नव्हती. आणि बहुधा यामुळेच या निर्माण होणाऱ्या संततीला कमीपणा वाटत नसे. ( आपल्याकडे महाराष्ट्रांत जर हा प्रयोग झाला असता तर ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील कटुता खात्रीने कमी झाली असती असा विचार त्या वेळीं माझ्या मनांत येऊन गेला ! )

केरळमधील नंबुद्री ब्राह्मण हा संस्कृत विद्येचा भोक्ता, ज्ञाता व अत्यंत कडक सोवळा असला तरी त्याला सामाजिक जीवनांत फारसें स्थान

उरलेलें नाही. नंबुद्री बायकांचें जीवन तर जवळ जवळ पडद्यांतच व्यतीत होतें. मुसलमान बायकांप्रमाणे नंबुद्री स्त्री घराबाहेर जातांना डोकीवर छत्री घेते. मात्र ती छत्री ताडाच्या पानाची असते. त्यांना ' अंतर्जनम् ' — अंतःपुरम् असेंच म्हणतात. त्यांची स्थिति अत्यंत दयनीय आहे असें म्हणतात. ब्राह्मण हा असा मागसलेला असल्यामुळे त्याच्याविषयी अन्य समाजांना मुळीच हेवा—ईर्षा वाटत नाही. म्हणूनच दक्षिण भारतांतील अन्य प्रदेशांप्रमाणे केरळमध्ये ब्राह्मण—ब्राह्मणेतर वाद उत्पन्नच झाला नाही. आता नव्या हिंदु—कोड कायद्याने नंबुद्री ब्राह्मणाचा सवता सुभा आणि वेगळेपणा निघून जाईल आणि तो केरळ समाजांत विलीन होईल अशी स्थिति निर्माण झाली आहे.

## जातीयतेचें दुसरें टोक : अस्पृश्यता

संकराच्या पूर्वापार प्रथेमुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतरांतील वितुष्ट या प्रदेशांत वाढलें नाही हें खरें, परंतु याचा अर्थ येथे सामाजिक समता प्रस्थापित झालेली आहे असा मात्र मुळीच नाही. स्पृश्यांतील जातीयता येथे तीव्र नाही एवढाच त्याचा अर्थ. कारण अस्पृश्यांच्या छळाच्या बाबतींत येथील स्पृश्य व विशेषतः ब्राह्मण, इतर प्रांतांपेक्षा दोन पावलें पुढेच गेलेले दिसतात. उदाहरणार्थ, पालघाटजवळ ' नायडी ' नांवाची एक अदर्शनीय ( Unseeable ) जात आहे. या जातीचा एखादा माणूस स्पृश्यांना दिसला तर ( कांही वर्षांपूर्वी ) ते त्याला ठार मारून टाकीत. म्हणजे अस्पृश्यतेच्याहि पुढची पायरी या अदर्शनीयतेने गाठली होती. म्हणून ह्या जातीचे लोक दूर जंगलांत राहून चोरांप्रमाणे आपलें जीवन घालवीत असत.

अस्पृश्यांकडे पाहण्याचा ब्राह्मणांचा दृष्टिकोन किती विकृत होता याची माहिती कोळिकोड येथे आम्हांला मिळाली. तेथे ' तली ' नांवाची एक खास नंपूतिरि ( नंबुद्री ) ब्राह्मणांची आळी आहे. पूर्वी हरिजनांना त्या आळींत प्रवेश करण्यास मज्जाव होता. पण भंग्यांशिवाय ब्राह्मणांचें झालें तरी कसें चालणार ? अखेर त्यांतून असा मार्ग काढण्यांत आला की, त्या आळींत हिंदु भंग्यांनी न जातां ख्रिश्चन भंग्यांनी जावें ! ब्राह्मणांचा हा हट्ट कोळिकोड नगरपालिकेलाहि मान्य करावा लागला आणि त्या आळीसाठी

खास किरिस्तांव भंग्यांची नेमणूक करण्यांत आली. ब्राह्मणांच्या या वृत्तीमुळे खालच्या वर्गांतील अस्पृश्यांनी ख्रिश्चन धर्माचा किंवा इस्लाम धर्माचा स्वीकार केला असेल तर त्याचा दोष कोणाकडे येतो ? केरळमधील ख्रिश्चनांची संख्या बरीच मोठी असून त्यांतील बरेचसे ख्रिश्चन सीरियन ख्रिश्चन—म्हणजे युरोपांत ख्रिश्चन धर्माचा प्रसार होण्यापूर्वी हिंदुस्थानांत आलेले आहेत हें खरें; परंतु त्यांची संख्या केव्हाहि कमीच असणार. केरळमध्ये मोपल्यांचें बंड झालें तेव्हा मुख्य रोख नंबुद्री ब्राह्मणांवरच कां होता याचेंहि कारण या ब्राह्मणांच्या आचारविचारांमध्येच सापडूं शकेल. मोपला किंवा माप्पिळा हे केरळमधील मुसलमानांचें स्थानिक नांव असून मलबारच्या कांही तालुक्यांतून त्यांची बहुसंख्या आहे. हे माप्पिळा लोक अत्यंत निरक्षर व दरिद्री असून त्यांच्या अज्ञानाचा फायदा त्यांचे मुस्लिम लिगी पुढारी घेत असतात. त्यांना साक्षर करण्याचे किंवा त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याचे प्रयत्न मात्र ते मुळीच करीत नाहीत. कारण, हे मुस्लिम सुशिक्षित झाले तर मुल्ला-मौलवींच्या कचाट्यांतून सुटून कम्युनिस्ट बनतील अशी भीति त्यांना वाटते. या माप्पिळांची भाषा मल्याळम् हीच असून त्यांना उर्दूचा गंधहि नाही. परंतु ते केरळांतील अन्य समाजांशीं एकजीव होऊं शकत नाहीत याचा कांही दोष अन्य समाजांकडे असलाच पाहिजे.

११३८२

### स्वच्छ व साधे लोक

केरळचे लोक दाक्षिणात्य असले तरी तामिळनाड (मद्रास) च्या लोकांप्रमाणे 'अस्सल' नाहीत किंवा 'द्रविड' लोकांप्रमाणे सवता सुभा मागणारेहि नाहीत. त्यांच्या भाषेवर तमिळ भाषेचा खूप प्रभाव झालेला आहे. परंतु तिच्यांत संस्कृत शब्दांचें वैपुल्य इतकें आधिक आहे की, ती द्रविडी भाषेपेक्षा आर्य भाषांनाच जवळची वाटते. त्यांचा वर्ण आंध्र किंवा तमिळनाडच्या लोकांप्रमाणे काळाकुळकुळीत नसून कोकणांतल्या लोकांप्रमाणे सावळा व उजळ आहे. चांगले गोरे लोकहि अधूनमधून पाहावयास मिळतात आणि ते केवळ ब्राह्मणांतच नसून ब्राह्मणेतर समाजांतहि असतात हें विशेष होय. चेहरा—मोहरा गोवा व कोकणच्या लोकांप्रमाणेच.

परंतु गोव्याच्या व कोकणांतल्या लोकांपेक्षा कांही बाबतींत या लोकांचा

वेगळेपणहि चटकन् जाणवतो. एक म्हणजे या लोकांची कमालीची स्वच्छता-मला वाटते, केरळच्या लोकांइतके स्वच्छ लोक भारतांत अन्यत्र आढळणार नाहीत. दिवसांतून दोन वेळां स्नान करणें ही या लोकांची सवयच नसून आवडहि आहे. गावांतील तळ्यांत किंवा कालव्यामध्ये सकाळीं व संध्याकाळीं डुंबणारीं मुलेंच नव्हे तर स्त्री-पुरुषहि आपल्याला आढळतात. येथील बायका रोज डोक्यावरून अंघोळ करतात हें ऐकून बायकांच्या केसांच्या घामटपणाला विटलेल्या पुरुषांना केरळीय पुरुषांना खात्रीने हेवा वाटेल. स्त्रियांच्या या तपश्चर्येचें फळ म्हणूनच की काय, त्यांना निसर्गाने विपुल व काळाभोर लांबसडक केशकलाप दिलेला आहे. डोक्याचा मागील भाग व निम्मीशिम्मी मान झाकून टाकणाऱ्या त्यांच्या त्या सैल व ऐसपैस अंबाड्यांकडे पाहतांना आपल्याला महाराष्ट्रांतील सुपारीएवढ्या अंबाड्यांची—आणि आपलें केशदारिद्र्य लपविण्यासाठी टीचभर लांबीच्या दोन वेण्या घालणाऱ्या किंवा गंगावन वापरणाऱ्या तरुणींची हटकून आठवण होते. या अंबाड्यांवर पांढऱ्या फुलांच्या वेण्या व भरघोस गजरे जेव्हा विराजमान होतात तेव्हा मी-मी म्हणणाऱ्या शुक्राचार्यांच्या मनांतहि ‘ कसेंसेंच ’ होऊं लागत असेल यांत शंका नाही. फुलांचें वेड गोव्याच्या व मंगळूरच्या बायकांप्रमाणे केरळच्या स्त्रियांमध्येहि खूप आहे आणि गरीबांत गरीब बायकाहि फुलांच्या वेण्या घालतात. तेच तर त्यांचे दागिने !

शरीराप्रमाणेच कपड्यांची स्वच्छता हेंहि केरळवासीयांचें वैशिष्ट्य आहे. मुसलमान लोक रंगीत कपडे वापरतात व त्यांच्यांत थोडी अस्वच्छता असावी असें वाटतें, परंतु हिंदु व ख्रिश्चन लोक पांढरे शुभ्र कपडे वापरतात. हे कपडे धोब्याकडे दिलेले नसतात. घरींच धुऊन स्वच्छ केलेले असतात. यामुळे त्यांवर एक गुलाबी झांक मारत असते. यावर कोणी म्हणेल की, ‘ त्यांत काय एवढं कौतुक करण्यासारखं आहे ? एक लुंगी अन् पंचा किंवा सदरा हे दोनच कपडे ते लोक वापरतात. त्यामुळं त्यांना ते रोजच्या रोज धुणं सहज शक्य होतं. ’ ह्या म्हणण्यांत तथ्यांश नाही असें नाही; पण आपल्याकडे नुसती लंगोटी व कुडतें घालणारा शेतकरी ती लंगोटी अन् कुडतें किती दिवसांनी धुतो ? किंबहुना कित्येक शेतकऱ्यांच्या अंगावरील कपडा कधीच धुतला जात नाही, तो सदैव नवा कोराच असतो,

अशींहि उदाहरणें आपल्याला पाहावयास मिळतात. याच्या उलट, केरळच्या शेतकऱ्याच्या अंगांत कुडतें नसतें. तो लंगोटीहि लावीत नाही. तो फक्त एक लुंगी लावतो. पण ती लुंगी तो रोजच्या रोज स्वच्छ ठेवतो. पांढरपेशा लोक लुंगीवर सदरा—बहुधा अर्ध्या बाह्यांचा—घालतात. पण तो सदरा कसा स्वच्छ असतो ! कांही लोक सदऱ्याऐवजी एखादा पंचा खांद्यावरून घेतात. पायांत वहाण क्वचित्च दिसते. मात्र, काखेंत छत्री अवश्य हवी. कांही ठिकाणी बांबूची छत्री एका टोपींत खोवलेली आढळली. ती टोपी डोकीवर ठेवली की छत्री हातांत घेण्याची दगदग नाही. बायकांचे कपडेहि असेच साधे. एक सफेद लुंगी कमरेला, आणि तिच्या आंत एक लहानसा पांढरा परकर. गरीब स्त्रिया अंगांत कांहीच घालीत नाहीत. कांही स्त्रिया कोपरीसारखें पांढरें पोलकें घालतात. बस्स ! बाहेर जातांना मात्र लुंगीएवढाच पांढरा कपड्याचा तुकडा पदराप्रमाणे खांद्यावरून घेतात. येथील कपड्याची गरज इतकी कमी असल्यामुळे आपल्याइकडल्याप्रमाणे रस्तोरस्तीं धोब्याचीं व शिंप्याचीं दुकानें येथे मुळीच दिसत नाहीत. ' एक नूर आदमी दस नूर कपडा ' ही म्हण येथील लोकांनी जणू खोटी ठरविली आहे !

कपड्यांच्या या साधेपणाप्रमाणेच यांचें जीवनहि अगदी साधें आहे. स्त्रियांच्या अंगांवर दागिने फारच थोडे दिसतात. रंगीबेरंगी कपड्यांचा षौक नसल्यामुळे भपका असा जवळजवळ नाहीच. यांचें जेवणहि असेंच साधें आहे. तिन्ही त्रिकाळ नुसता भात उकडला की झालें. परसांतल्या केळीच्या पानावर तो भात घ्यायचा आणि त्या भातावरच सांबार किंवा ताक घ्यायचें ( भाताला मल्याळम् भाषेंत ' चोर ' म्हणतात आणि ताकाला ' मोर ' म्हणतात. भातावर ताक घेतलें की, ' चोरावर मोर ' ही म्हण तयार होते. आणि म्हणूनच हे दोन शब्द आमच्या लक्षांत राहिले. पाण्याला मुख्यतः ' वेळ्ळम् ' हा शब्द वापरतात. पण ' जलम् ', ' नीरु ' वगैरे शब्दहि कळूं शकतात ! ) ताट नको, वाट्या नकोत, भांडीं घासायची दगदग नको. झोपायला नुसती एक चटई मिळाली तरी पुरे !

## सौम्य व शांत स्वभाव

त्यांच्या या जीवनपद्धतीमुळे श्रीमंत व गरीब यांच्यांत बाह्यतः तरी विशेष फरक आढळून येत नाही. पोषाख आणि जेवणखाण यांवरून श्रीमंत कोण आणि गरीब कोण हें ओळखणें कठिण जातें. आणि बहुधा यामुळेच या प्रदेशांत कम्युनिझमचा शिरकाव सर्वांत प्रथम झाला असावा ! परंतु या लोकांचा सौम्य व शांत स्वभाव पाहतां हे लोक कधी काळीं साम्यवादाचे पाईक बनतील अशी शंकाहि पांच-दहा वर्षांपूर्वी कोणाला आली नसती.

मराठी, कन्नड, आंध्र व तमिळ लोक भांडखोरपणांत एकाहून एक वरचढ आहेत. ते कोणत्याहि कारणावरून एकमेकांचीं व इतरांचीं डोकीं फोडण्यास हां हां म्हणतां तयार होतात. याचा अनुभव आगगाडीच्या प्रवासांतहि येतो. पण केरळ आणि उत्कल या दोन प्रदेशांतील लोक अत्यंत सौम्य स्वभावाचे आहेत असा अनुभव आहे. ( भाषिक चळवळीमध्ये उत्कलवादी भडकले होते, हें मला माहीत आहे. पण ती त्यांची प्रकृति नव्हती, विकृति होती. तसे बिचारे गुजरातीहि भडकले होतेच की ! )

कालटीच्या सम्मेलनांत केरळीय लोकांच्या शांत स्वभावाचा आम्हांला चांगला अनुभव आला. तुम्ही त्यांच्यावर कितीहि रागावलांत आणि त्यांना टाकून बोललांत, तरी ते तुम्हांला चुकूनहि दुरुत्तरें करणार नाहीत. शांतपणें ऐकून घेतील आणि आपलें म्हणणें धीम्या स्वरांत तुम्हांला ऐकवतील. नम्रता तर जणू त्यांच्या रोमरोमीं खिळलेली आहे. वडील मंडळींसमोर मान वर करून बोलणेंहि त्यांना जमत नाही. केरळांत भांडणें-मारामाऱ्या अथवा खून फारच क्वचित् होतात. स्त्रिया रानावनांतून एकट्या हिंडतात; पण त्यांच्यावर जुलूमजबरदस्ती झाल्याचीं उदाहरणें नाहीत. यामुळे तेथील स्त्री शालीन असूनहि निर्भय आहे. मल्याळम् भाषेंत शिव्याच नाहीत असें म्हणतात. ज्यांना इतरांवर रागवायचें नसेल त्यांना आपल्या भाषेंत शिव्या निर्माण करण्याची जरूरच काय ? अशा ह्या सौम्य व शांत लोकांत शिक्षणाचा प्रसार खूप असल्यास काय आश्चर्य ? भारतांत सर्वांत जास्त साक्षरता केरळमध्ये व मुख्यतः त्रावणकोर भागांत आहे, हे सर्वश्रुत आहेच.

अनुक्रमांक २६५४४७ वि: भू-प्रवास नों: दि: २४/३/७६

## लग्नांतील आत्यंतिक साधेपणा

केरळीय लोकांच्या जीवनांतील साधेपणाला शोभेल असाच त्यांचा लग्नविधि असतो. नंबुद्री ब्राह्मणांतील लग्नें आपल्याकडील ब्राह्मणांच्या लग्नांप्रमाणे यज्ञयाग वगैरे वैदिक पद्धतीने होतात. परंतु, इतर सर्व जमातींत लग्नविधि अत्यंत सोपा व साधा असतो. मंत्र नाही, तंत्र नाही, यज्ञ नाही, याग नाही, बँड नाही, बाजा नाही, हुंडा नाही–पांडा नाही, ब्राह्मण नाही की पुरोहित नाही; जेवणावळ नाही की वरात नाही. कांही जातींत नवरा-नवरी चार लोकांसमक्ष एकमेकांच्या गळ्यांत फुलांच्या माळा घालतात, ( केरळ मंत्रिमंडळांतील थॉमस व गौरी यांचा विवाह असाच झाला होता हें वाचकांना आठवत असेलच ! ) तर कांही जातींत नवरा-मुलगा मुलीच्या घरीं जाऊन तिला साधा शुभ्र कपडा —— कमरेची लुंगी व अंगावरील उपरणें ऊर्फ दुपट्टा – देतो आणि जमलेले लोक पानसुपारी खातात. बस्स ! एवढाच कार्यक्रम ! ( केरळमधील विडाहि फार साधा असतो. पान, चुना आणि ओली सुपारी. काताची जरूर नाही. आणि काताखेरीज विडा रंगतोहि छान ! ) लग्नांतील या साधेपणामुळे या भागांत आपल्याकडल्या-प्रमाणे लग्न ही एखादी समस्या बनलेली नाही. आता दिवसेंदिवस शिक्षणाचा प्रसार वाढूं लागल्यामुळे तर लग्न आणखीच सोपें झालें आहे. कारण येथे लग्नाच्या बाबतींत स्त्री-पुरुषांना भरपूर स्वातंत्र्य आहे.

## सुस्तपणा व कारकुनी कामाची आवड

केरळच्या लोकांच्या स्वभावांतील या चांगल्या गुणांबरोबरच कांही दुर्गुणहि त्यांच्यांत आहेत. त्यांपैकी सर्वांत महत्त्वाचा दुर्गुण म्हणजे सुखा-सीनता आणि सुस्तपणा हा होय. ‘ कैरली साहित्य-दर्शन ’ या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत आचार्य काकासाहेब कालेलकर यांनी केरळीयांच्या या स्वभावाचें समर्थन पुढील शब्दांत केलें आहे. ते म्हणतात :

“ या साहित्यदर्शनांत लेखिका श्रीमती रत्नमयी देवी असें म्हणतात की, ‘ केरळचे साहित्यिक बहुधा परिश्रमविन्मुख आणि सुखासीन असतात.’ जर ही गोष्ट खरी असेल, तर मी एवढेंच म्हणेन की, निसर्ग आणि संस्कृति या दोघांनी ज्यांचा जीवनसंग्राम सोपा करून ठेवला असेल आणि

परमेश्वराने ज्यांना बुद्धीचा खजिना दिला असेल त्यांनी जास्त परिश्रम कां करावेत? पांघरावयास उबदार कपडे नकोत, साध्या मातीच्या जमिनीवर झोपण्यांत त्रास होत नाही. भात, नारळ, केळीं आणि मासळी यांचा आहार ज्यांना पुरेसा होतो, थंड हवेशीं लढण्यासाठी ज्यांना दूध, लोणी किंवा मांस विशेष खावें लागत नाही, अशा लोकांचा जीवनकलह अगदी सोपा होऊन जातो. आणि मग मन व बुद्धि हीं काव्य-शास्त्र-विनोदांतील आनंद लुटीत राहतात. या रसिकतेचा प्रभाव केरळ साहित्या-वर पडला असेल तर त्यांत काय आश्चर्य ?"

हीच गोष्ट गोव्याच्या लोकांच्या बाबतींतहि आढळते. परंतु, केरळमध्ये शिक्षणाचा प्रसार फार मोठ्या प्रमाणांत ( ४१ टक्के लोक साक्षर आहेत. १०४५० शाळा व ५६ कॉलेजें आहेत. ) झालेला असल्यामुळे केरळीयांच्या स्वभावांतील दोष जाचक होण्याइतका उघड झाला आहे. या प्रदेशांत तांत्रिक शिक्षण जवळजवळ नाहीच म्हटलें तरी चालेल. बहुतेक विद्यार्थी बी. ए., एम्. ए. किंवा बी. एस्सी., एम्. एस्सी. होतात आणि कारकुनी, मास्तरकी वगैरे नोकऱ्यांच्या शोधांत फिरूं लागतात. शरीरश्रमाची त्यांना सवयहि नाही आणि आवडहि नाही. यामुळे केरळमधील सुशिक्षित बेकारांचा प्रश्न अत्यंत अवघड होऊन बसला आहे. त्यांतल्या त्यांत खिश्चन लोक जास्त शरीरश्रम करणारे आहेत. यामुळे त्यांनी आपल्या वसाहती बनवून पडीत जमीन लागवडीला आणण्याचे प्रयोगहि केले आहेत. परंतु हिंदूंमध्ये मात्र अजूनहि शरीरश्रमाची गोडी निर्माण होत नाही. कोळिकोडचे प्रख्यात कार्यकर्ते श्री. श्यामजी सुंदरदास यांनी मला सांगितलेला त्यांचा अनुभव या ठिकाणीं नोंदविण्यासारखा आहे.

ते म्हणाले, " एक दिवशीं एक पदवीधर तरुण माझ्याकडे आला आणि नोकरी मागूं लागला. कारकूनच नव्हे तर पट्टेवाला बनण्यासहि तो तयार होता. परंतु माझ्याकडे ' टेबल वर्क 'ची नोकरी शिल्लक नव्हती. म्हणून मी त्याला म्हणालों, ' मी तुला पांच एकर जमीन आणि शेतीसाठी लागणारीं अवजारें देतों. सहा महिनेपर्यंत तुझ्या पोटापाण्याचीहि तरतूद करून ठेवतों. मात्र सहा महिन्यांत तूं परिश्रम करून स्वावलंबी बनलं

पाहिजेस.' पण त्या तरुणाने तें मान्य केलं नाही; आणि तो पुन्हा नोकरी-साठी वणवण भटकूं लागला. ''

**सर्व व्यापार गुजरात्यांच्या हातीं !**

कोळिकोड ( लोकसंख्या दीड लाख ), त्रिचूर ( सत्तर हजार ), कोच्चि ( कोचिन )–एर्नाकुलम् ( बासष्ट हजार ), मत्तंचेरी ( त्र्याहत्तर हजार ), कोट्टयम ( कोट्टायम )–अलेप्पी ( एक लाख सोळा हजार ), क्विलॉन, ( सहासष्ट हजार ) तिरु अनंतपूरम्–त्रिवेंद्रम– ( दोन लाख ), पालघाट ( एकूणसत्तर हजार ), वगैरे मोठमोठ्या शहरांत आपण फिरूं लागलों की एक गोष्ट चटकन् आपल्या लक्षांत येते. ती म्हणजे येथील सगळा महत्त्वाचा व्यापार परप्रांतीयांच्या व विशेषतः गुजराती लोकांच्या हातांत आहे. या व्यापाऱ्यांना पैशाखेरीज दुसरें कांही सुचत नाही. आणि ते केरळीय लोकांच्या जीवनांत समरस होण्याचा प्रयत्न करीत नाहीत, अशी तक्रार श्री. श्यामजीभाईनीच केली. ( अलवाय–अलेप्पी येथे ओगल्यांचा चिनी-मातीच्या भांड्यांचा एक कारखाना आहे हें सर्वांना ठाऊकच आहे. ) साहित्य-संगीतकलेमध्ये रस घेणारा केरळीय माणूस व्यापारांत लक्ष घालीत नाही याविषयी मला मुळीच आश्चर्य वाटलें नाही. कारण महाराष्ट्र आणि बंगाल या त्याच्या सहधर्म्यांचा स्वभावहि असाच आहे हें मला माहीत होतें.

**श्री. नायडू यांचा अनुभव**

कोळीकोडजवळील एका बेटावर जो स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचा कारखाना आहे, तेथे आम्ही सहज सहलीला म्हणून गेलों होतों, तेव्हा तेथील कारखान्याचे तेलुगु मालक श्री. नायडू यांच्याशीं गप्पागोष्टी करतांना त्यांनीहि केरळच्या मजुरांसंबंधी अशीच तक्रार केली. ते म्हणाले, “ मल्याळी मजूर अत्यंत सुस्त आहेत. इतर मजुरांच्या निम्म्यानेदेखील ते काम करीत नाहीत. पण हक्कासाठी भांडायला मात्र सदा तयार असतात ! आता तर काय त्यांचंच सरकार आलंय्. ते आता असे कांही विचित्र कायदे पास करून ठेवतील, की आम्हांला आपलं चंबूगवाळंच आवरावं लागेल.'' मीं त्यांना विचारलें, “ तुम्ही बाहेरचे मजूर कां आणीत नाही ? ” ते म्हणाले, “ अहो, इथं इतकी बेकारी असतांना बाहेरचे मजूर आणले

तर इथले लोक आम्हांला जिवंत तरी ठेवतील का ? हे लोक स्वतः करणार नाहीत नि इतरांनाहि करूं देणार नाहीत. ”

जर ही स्थिति खरी असेल तर केरळच्या पुढाऱ्यांनी गंभीरपणें तिचा विचार केला पाहिजे. एखाद्या प्रदेशाचा व्यापार परप्रांतीयांच्या हातांत असेल तर त्याचा त्या प्रदेशाच्या अर्थकारणावर आणि सुस्थितीवर कांही परिणाम होतो की काय या गोष्टीचाहि विचार या निमित्ताने सर्वांनी केला पाहिजे.

## भाषा आणि साहित्य

केरळची भाषा मल्याळम् ही असून ही भाषा बोलणाऱ्या लोकांची एकूण संख्या १ कोटी ३४ लाख आहे. या भाषेवर संस्कृत आणि तमिळ या दोन भाषांचा इतका अधिक प्रभाव पडलेला आहे की, कांही लोक तिला तमिळची मुलगी मानतात तर कांही विद्वान् तिला संस्कृतोद्भव मानतात. परंतु निष्पक्ष इतिहासज्ञांच्या मतें मल्याळम् ही एक स्वतंत्र अशी भाषा आहे. प्रारंभीं तिच्यावर द्रविडकुलांतील तमिळ भाषेचा प्रभाव पडला आणि नंतर संस्कृतचें राज्य सुरू झालें. हें इतकें की कित्येक नंबुद्री ब्राह्मण संस्कृतांत उत्कृष्ट बोलूंहि शकत होते. ( अशा नंबुद्री ब्राह्मण कुळांतच श्रीमत् आद्य शंकराचार्यांचा जन्म झाला. ) संस्कृत आणि मल्याळम् यांच्या मिश्रणाचा षौक जुन्या केरळीय साहित्यिकांमध्ये फार दिसून येतो. अशा मिश्रित भाषेला ‘ मणिप्रवाळ ’ ( मोतीं व प्रवाळ ) शैली असें म्हणतात. उदाहरणार्थ, तोलकवि म्हणतो :

पल्लितोल उटयाटस्य यस्य पंत्रण्टर प्रिया ।
कोणन्चेट्ट अभिधानस्य, अर्धार्धे प्रणतोस्म्यहम् ॥

[ अर्थ : ‘ हत्तीचें कातडें पांघरणारा, गंगेचा प्रियकर, आणि तीन नेत्र असणारा असा जो परमेश्वर त्याच्या चरणीं मी नमस्कार करतों.’ ]

या श्लोकांत ‘ पल्लु ’ म्हणजे दांत या मल्याळम् शब्दापासून ‘ पल्लि ’ म्हणजे हत्ती ( ‘ दन्त ’पासून ‘ दन्ति ’प्रमाणे ), ‘ पंत्रण्ट ’ म्हणजे बारा, त्याचे निम्मे म्हणजे सहा व येथे अर्थ गंगानदी, मुक्कण–त्रिनेत्र, शिव, त्रिनेत्राच्या अर्ध्यांचा अर्धा–चरण–पाय ! अशी गंमत केलेली आहे.

अर्थात् हल्ली ही शैली राहिलेली नाही. लोकसुलभ भाषेकडेच लेखकांचें विशेष लक्ष आहे. तरीहि मल्याळम् भाषेंत संस्कृतचें प्राधान्य सहज लक्षांत येतें.

## लोकप्रिय साहित्यप्रकार : काव्य

मल्याळम् भाषेंत सर्वांत अधिक लोकप्रिय साहित्यप्रकार काव्य हा आहे, हें मला समजलें तेव्हा आश्चर्य वाटलें नाही. कारण कलारसिक केरळीयांना गद्यापेक्षा पद्यच आवडणार हें उघड आहे. बंगाल व गोमंतक या प्रदेशांचा अनुभवहि असाच आहे. कालटीच्या ' केरळ कला-मंडळा '-तर्फे झालेला कथाकलि नृत्याचा प्रयोग पाहत असतां श्री. ओ. एम्. अनुजन व ओळप्पमणा या तरुण कवि-बंधूंशीं व कोळिकोडला श्री. एन्. व्ही. कृष्णवारियर या ' केरळ साहित्य अकादमी ' च्या सदस्य कवींशीं बोलत असतां काव्याच्या लोकप्रियतेची कल्पना आली. परंतु ही लोकप्रियता फक्त कवींमध्येच असावी; सामान्य लोकांना कथा-कादंबरीच आवडत असावी अशीहि मला शंका आली. कारण काव्याचे संग्रह भराभर बाहेर पडत असले तरी त्यांचा खप मात्र अगदी नाममात्र असतो. केरळमधील वयोवृद्ध कवि श्री. वळ्ळात्तोळ नारायण मेनन हे आज सर्वश्रेष्ठ कवि समजले जातात. त्यांना महाकवि असें म्हणतात. त्यांनी मल्याळम् भाषेंत ऋग्वेदाचें संपूर्ण पद्यबद्ध भाषांतर केलेलें असून त्याच्या प्रकाशनासाठी दिल्लीच्या साहित्य अकादमीने १५ हजार रुपयांची मदत दिली आहे. त्यांनी गांधीजींच्या मृत्यूसंबंधी लिहिलेलें काव्य फार गाजलें. मद्रास राज्याचे राजकवि बनण्याचा मानहि त्यांना मिळाला होता.

आजच्या तरुण कवींत श्री. जी. शंकर कुरुप हे सर्वांत अधिक लोकप्रिय आहेत. त्यांच्याखेरीज श्री. वैलोप्पिलि श्रीधर मेनन, श्री. वेन्निकुलम् गोपाल कुरुप, श्री. एन्. व्ही. कृष्णवारियर, श्रीमती बालामणि अम्मा, श्री. पी. कुन्हीरामन् नायर, श्री. पाला नारायणन् नायर वगैरे कवि विशेष प्रसिद्ध आहेत.

लघुकथालेखकांमध्ये श्री. कारुर नीलकण्ठन् पिळ्ळै, श्री. पोन्कुन्नम

चार्की, सरस्वती अम्मा, श्री. पी. सी. कुट्टिकृष्णन् ऊर्फ ' उरूब ', के. टी. मुहम्मद, एन्. ललितांबिका अन्तर्जनम्, वैक्कम् मुहम्मद बशीर, पी. केशवदेव, एम्. पी. चेल्लप्पन नायर वगैरे नांवें विशेष प्रासिद्ध आहेत. यांपैकी श्री. के. टी. मुहम्मद या तरुण कथाकाराला पहिल्या अखिल भारतीय कथास्पर्धेत पहिलें पारितोषिक मिळालें होतें हें अनेक वाचकांना आठवत असेल. श्री. उरूब यांच्या ' तुरन्निहट्ट जालकम् ' ( उघडी खिडकी ) या कथासंग्रहाला मद्रास सरकारचें बक्षिस मिळालें होतें. ते कादंबरीकार व नाटककारहि आहेत.

कादंबरीकारांमध्ये तकषि शिवशंकर पिळ्ळै, पी. केशवदेव, बशीर व एस्. के. पोट्टेक्कार हीं नांवें विशेष उल्लेखनीय आहेत. सरदार के. माधव पणिक्कर यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्याहि चांगल्याच लोकप्रिय आहेत. सरदार पणिक्कर यांचीं अनेक काव्येंहि प्रसिद्ध आहेत. परंतु तीं जुन्या प्रणालींतील आहेत.

नाटककारांमध्ये येडेसरी गोविंदन् नायर, (' कूट्ट कृषि '—सामुदायिक शेती ), चेरुकाड (' तारवादीतम् '—कुळाचा अभिमान ) व श्री. एम्. गोविन्दन् (' नी मनुष्यने कोलारडु '—तुम्ही माणसांना मारतां कामा नये ) हीं तीन नांवें उल्लेखनीय आहेत. ( कंसांतील नांवें त्यांच्या नाटकांचीं आहेत. )


## नियतकालिकांचा संसार

साक्षरताप्रसाराचें प्रमाण वाढल्याने साहित्यिक ग्रंथांची विक्री वाढते किंवा नाही हा प्रश्न विवादास्पद असला—कारण केरळमध्ये पुस्तकांचा खप मराठीपेक्षा जास्त नाही असें मला कळलें,—तरी नियतकालिकांचा खप साक्षरतेच्या प्रमाणांत वाढत जातो एवढें मात्र खरें. रोज आणा–दीड आणा खर्च करून वर्तमानपत्र विकत घ्यायचें व तें वाचायचें ही गोष्ट केरळच्या खेड्यापाड्यांतूनहि रूढ झालेली आहे. भारतांतल्या या सर्वांत छोट्या राज्यांत २३ दैनिकें असून त्यांचा दररोजचा खप सरासरी १० ते १५ हजार आहे, ही गोष्ट आश्चर्यजनक नाही काय ? कोळिकोडला आम्हीं ' मातृभूमि ' या दैनिकाच्या कचेरीस भेट दिली, तेव्हा त्याची ती सिमेंट

कॉंक्रीटची प्रचंड इमारत, रोटरी मशीन, अत्यंत थोड्या माणसांत भरपूर काम करून घेण्याची त्यांची पद्धत, हें सर्व पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. ' मातृभूमि ' हें दैनिक कॉंग्रेसवादी असून त्याचा रोजचा खप ६७ हजार आहे. याच्या रोज तीन आवृत्त्या निघतात आणि कोळिकोड–( कालिकत )-ला कित्येक लोक सकाळची आणि संध्याकाळची अशा दोन्ही आवृत्त्या विकत घेऊन वाचतात, हें पाहून मला आश्चर्य वाटलें. साप्ताहिक ' मातृभूमी 'चा खप ५० हजार असून याच संस्थेतर्फे ' युगप्रभात ' नांवाचें जें हिंदी पाक्षिक निघतें त्याचा खप ४ हजार आहे. दक्षिण भारतांत यशस्वीपणें हिंदी पत्र चालविण्याचा हा प्रयोग खात्रीने स्वागतार्ह म्हटला पाहिजे. कदाचित् पुढेमागे दक्षिणेंतून हिंदीचीं दैनिकेंहि सुरू होतील आणि दक्षिणचे लोक उत्तर भारतीयांना आह्वान देऊं शकतील. मद्रासला हिंदी चित्रपट निघण्यास सुरुवात झालीच आहे. ' युगप्रभात 'च्या बाबतींत एक कौतुकास्पद गोष्ट अशी आहे की, संपादकांपासून कंपॉझिटर्सपर्यंत सर्व मंडळी केरळीय आहेत. हिंदी पत्र काढण्यासाठी त्यांना काशी-प्रयागहून माणसें आणावीं लागलीं नाहीत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. केरळमध्ये एकहि इंग्रजी दैनिक नाही याचें मला आश्चर्य वाटलें. कदाचित् लोकांतील मातृभाषा-भक्तीमुळे इंग्रजी दैनिक काढणें शक्य होत नसावें. मद्रासहून ' हिंदु ' किंवा ' इंडियन एक्स्प्रेस ' विमानाने येईल तेव्हाच इंग्रजी वर्तमानपत्र मिळायचें. तोपर्यंत सगळी ताजी बातमी ' मातृभूमी ' तून लोकांना वाचावयास मिळते. दैनिकांची गर्दी मुख्यतः तिरुवितांकूर ( त्रावणकोर ) भागांत असून नुसत्या कोट्टयम् या छोट्या शहरांत ६ दैनिकें प्रकाशित होत असतात. त्यांपैकी ' नवयुगम् ' हें विशेष लोकप्रिय आहे. त्याखेरीज कम्युनिस्टांचें मुखपत्र ' देशाभिमानी ' ( कोळिक्कोड ), मुस्लिम लीगचें मुखपत्र ' चंद्रिका ' ( कोळिक्कोड ), खिश्चनांचें मुखपत्र ' मनोरमा ' ( त्रिवेंद्रम् ), प्रजा–समाज-वाद्यांचें ' पौरशक्ति ' ( कोळिक्कोड ), आर. एस्. पी. चें ' कौमुदी ' ( कोट्टयम् ), एर्नाकुलमहून निघणारें ' दीनबंधु ' वगैरे दैनिकें आणि ' मातृभूमी 'खेरीज-' देशमित्रम् ' ( कॉंग्रेस ), ' मलयाळ राज्यम् ' ( कॉंग्रेस ), ' मलयाळ मनोरमा ' ( खिश्चन ) वगैरे साप्ताहिकें विशेष महत्त्वाचीं आहेत. मासिकें मात्र नांव घेण्यासारखीं नाहीत याचें आश्चर्य वाटलें.

## कलेच्या क्षेत्रांतील कामगिरी

ललित कलांच्या क्षेत्रांत केरळीय लोक गोमंतकीयांप्रमाणे पहिल्यापासूनच आघाडीवर आहेत. प्रसिद्ध केरळीय चित्रकार रविवर्मा यांचीं चित्रें महाराष्ट्रांत आजहि घरोघरीं पाहावयास मिळतात. त्यांचीं मूळ मोठीं चित्रें त्रिवेंद्रम्, त्रिचूर व म्हैसूर येथील म्यूझियम्समधून ठेवलेलीं आहेत. व्यंगचित्रांच्या क्षेत्रांत अद्वितीय ठरलेले श्री. शंकर पिल्ले यांचें नांव त्यांच्या 'शंकर्स वीकली'च्या द्वारें सबंध जगांत लोकप्रिय झालेलें आहे.



[ कथाकली नृत्य ]

परंतु केरळची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण कला म्हणजे 'कथाकली नृत्य' होय. महाकवि श्री. वळ्ळत्तोळ नारायण मेनन यांनी 'केरळ कला-मंडळ' नांवाची संस्था स्थापन करून तिच्या द्वारें केरळच्या या खास नृत्यप्रकाराचा

आधुनिक विकास घडवून आणला. या नृत्यामध्ये वेषभूषेला सर्वांत अधिक महत्त्व असून ती फारच बोजड व अवघड असते. नेहमीच्या नृत्यांत पदन्यासाला महत्त्व असतें तर कथाकलीमध्ये चेहऱ्यावरील हावभावांवर नृत्याचें यश अवलंबून असतें. निपुण कथाकलीकाराच्या चेहऱ्यावरील प्रत्येक बारीकसारीक स्नायु सजीव व चैतन्ययुक्त वाटतो. आजच्या कथाकलीकारांमध्ये राष्ट्रपतिपदक मिळविलेले वयोवृद्ध कुंजू कुरुप, श्री. कृष्णन् कुट्टी, श्री. कुंजू नायर, श्री. नाणु नायर वगैरे नांवें विशेष प्रख्यात आहेत. या नृत्यप्रकारांत स्त्रियांची भूमिका पुरुषच करतात. यामुळे आपल्याला स्त्रीपात्रें जरा विचित्र वाटतात. परंतु एकूण कथाकली नृत्य रुबाबदार असतें यांत शंका नाही.

## केरळचे विशेष व्रतोत्सव

भारतांतील बहुधा प्रत्येक प्रांताची स्वतःची अशी स्वतंत्र कालगणना आणि विशेष व्रतोत्सव असल्याचें दिसून येतें. केरळ तरी याला कसा अपवाद असणार? त्याचा स्वतःचा एक स्वतंत्र शक किंवा संवत् असून त्याला 'कोल्लवर्षम्' किंवा 'कोलम्बान्द' असें नांव आहे. १५ ऑगस्ट इ. स. ८२५ या दिवसापासून हें केरळीय वर्ष सुरू झालें. श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्यांच्या मृत्यूनंतर ५ वर्षांनी 'कोल्लम्' (क्विलॉन) शहरांत हिंदु पंडितांचें एक प्रातिनिधिक संमेलन भरलें होतें त्याची स्मृति म्हणून हा शक सुरू झाला. शंकराचार्यांच्या वेदान्त मतानुसार लोकांनी आचार–व्यवहार ठेवावा असें या संमेलनांत ठरलें. त्यानंतर १९४९ पर्यंत त्रावण-कोर–कोचीन राज्यांत या 'कोल्लवर्षम्' चा उपयोग सरकारी सन म्हणून केला जात होता; आणि आजहि लोक खाजगी व्यवहारांत धार्मिक व सांस्कृतिक कार्यासाठी हाच सन वापरीत असतात.

केरळचे स्वतंत्र असे तीन सण आहेत : १. 'ओणम्', २. 'तिरुवा-तिरा', आणि ३. 'विषु'! ओणम् किंवा 'तिरुओणम्' हा नवधान्याचा सण आहे. सिंह (श्रावण–ऑगस्ट–सप्टेंबर) महिन्यांत जेव्हा धान्याची कापणी होते तेव्हा दहा दिवसपर्यंत मेजवान्या, नावांच्या शर्यती व नृत्यें यांच्याद्वारें हा सण साजरा केला जातो. तिरुवातिरा हें आर्द्रा-व्रत (मदनोत्सव)

असून तें क्रिया अठ्ठावीस दिवसपर्यंत करीत असतात. ' विषु ' हा केरळचा नववर्षदिनोत्सव आहे. मेष ( चैत्र–मार्च–एप्रिल ) महिन्यांत जेव्हा सूर्य विषुववृत्त रेषेवर पोहोचतो व रात्र आणि दिवस समान होतात तेव्हा त्याला केरळचे लोक ' विषु ' असें म्हणतात. दिवाळीप्रमाणे आतषबाजीने लोक या सणाचें स्वागत करतात. हल्ली ख्रिश्चन व मुसलमान लोकहि या सणांत सहभागी होत असतात.

नववर्षाची सुरुवात सुंदर व शुभ वस्तूंच्या दर्शनाने करायची असते. याला ' कणि ' ( दर्शन ) असें म्हणतात. एक तेवती समई, फणस, आंबे वगैरे फळें, धुतलेलें वस्त्र, सोन्याचे दागिने, कण्हेरीचीं फुलें वगैरे वस्तू यांत असतात. सकाळीं उठल्याबरोबर इतर कांहीहि न पाहतां सरळ या वस्तू पाहायच्या. — तोपर्यंत डोळे झाकून घ्यायचे. अर्थात् ही तयारी रात्रींच करून ठेवायची. घरच्या सर्वांनी ' कणि ' पाहिल्यानंतर ते घरच्या कर्त्या पुरुषाकडे जातात. याला ' कारणवर ' असें नांव आहे. कारणवर त्या मंडळींना पैसा देतो. या पैशाला ' कैनेट्टम ' ( सर्वप्रथम दिला जाणारा पैसा ) असें म्हणतात. याचा अर्थ असा की, वर्षभर मुठींत पैसा राहावा, पैशाची टंचाई कधी भासूं नये. धोबी, न्हावी वगैरे बारा बलुतीं येतात, त्यांनाहि आणेली–चवली द्यावी लागते. ' कणि ' ही फक्त मानवांनाच नव्हे तर घरच्या गाई-म्हशींना व झाडांनाहि दाखवतात. त्यानंतर आतषबाजी सुरू होते.

येशू ख्रिस्ताच्या बारा शिष्यांपैकी सेंट थॉमस डिडिमस इ. स. ४८ सालीं केरळमध्ये आला होता आणि त्याने लोकांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली होती असें म्हणतात. याला इतिहासाचाहि आधार आहे. या सेंट थॉमसचा उत्सव डिसेंबर महिन्यांत मोठ्या थाटामाटांत साजरा केला जातो.

केरळचे महिने राशींच्या नांवावर असून त्यांचे उच्चारहि जरा वेगळे आहेत. मेडम् ( मेष ), इडवम् ( वृषभ ), मिधुनम् ( मिथुन ), कर्किडसम् ( कर्क ), चिङ्ङम् ( सिंह ), कन्नी ( कन्या ), तुलावम् ( तुला ), वृश्चिकम्, धनु, मकरम्, कुंभम्, मीनम् अशीं तीं नांवें असून मेडम् हा चैत्र व मीनम् हा फाल्गुन होय. या क्रमाने इतर सगळे महिने येतात.

## केरळची समस्या

सर्वांत मुख्य समस्या येथील प्रमाणाबाहेर वाढलेली व वाढत असलेली लोकसंख्या ही आहे. आचार्य विनोबा भावे यांनी सुचविल्याप्रमाणे या समस्येंतून सुटण्याचा मार्ग एकच आहे. तो म्हणजे येथील लोकांनी स्थलांतर करून भारताच्या अन्य प्रदेशांत जेथे भरपूर जमीन असेल त्या ठिकाणीं जाणें हा होय. त्या दृष्टीने प्रयत्नहि सुरू झाले आहेत. केरळमधील कांही कुटुंबें अंदमानमध्ये वसाहती करण्यास गेलीं आहेत असें कळलें.

दुसरा प्रश्न येथील सुशिक्षितांची बेकारी हा आहे. या सुशिक्षितांनी शरीरश्रम करण्यास आणि तांत्रिक शिक्षण घेण्यास तयार झाल्याखेरीज हा प्रश्न सुटणार नाही. केरळमध्ये आणखी कांही कारखाने उघडून सुशिक्षितांची बेकारी कमी करण्याचा प्रयत्न सरकारतर्फे व्हावयास हवा.



# उत्कल

मुलांना जगाची व हिंदुस्थानची तोंडओळख करून देणारें एक भूगोलाचें मराठी पाठ्यपुस्तक नुकतेंच पाहण्यांत आलें. त्यांत उत्कल किंवा उडीसा ( ओरिसा ) राज्याचा नुसता उल्लेखहि आलेला नाही, मग त्यासंबंधी माहिती असणें तर दूरच राहिलें. अर्थात् मीं पाहिलेलें हें पुस्तक कांही अपवादात्मक नव्हतें. मला आठवतें, आम्ही लहानपणीं जो भूगोल शिकलों त्यांतहि कोठे ओरिसाचें नांव आल्याचें आठवत नाही. भारताच्या पूर्वसीमेवरील बंगाल अनेक कारणांनी गेलीं दीड-दोनशे वर्षे आपल्या नजरेसमोर आहे. ईशान्य सरहद्दी-वरील प्रदेश आणि मणिपुरी नृत्याचें माहेरघर म्हणून ' असम ' किंवा आसाम प्रांतहि आपणांस माहीत झालेला आहे. राजेंद्रबाबू, जयप्रकाश नारायण, चंपारण्यांतील सत्याग्रह वगैरे गोष्टींमुळे बिहारहि आपल्या ओळखीचा झाला आहे. तेलंगी ब्राह्मणांमुळे आणि भाषावार प्रांतरचनेचा जोरदार पुरस्कार करून त्यासाठी लढणारा प्रदेश या दृष्टीने आंध्रहि आपल्या चांगलाच परिचयाचा झालेला आहे. परंतु या राज्यांच्या बेचक्यांत सापडलेला बिचारा ओरिसा मात्र कोणाच्याच खिजगणतींत नसतो— किंवा आतापर्यंत नव्हता असें म्हटलें पाहिजे. वस्तुतः पुरीचा जगन्नाथ आणि शंकराचार्यांचा मठ या गोष्टी आपणाला चांगल्या परिचित आहेत; परंतु ही जगन्नाथपुरी ज्या उत्कल प्रांतांत आहे त्याच्याविषयी मात्र आपणाला कधीच उत्सुकता वाटली नाही !

याचें कारण काय ? याचें कारण या प्रदेशाचा मागसलेपणा. गेल्या शे-दीडशे वर्षांत जीवनाच्या नानाविध क्षेत्रांत भारताच्या बहुतेक प्रांतांतून मोठमोठे कर्तृत्ववान् पुरुष निर्माण झाले आणि त्यांनी अखिल भारतीय व कित्येकांनी जागतिक कीर्ति संपादन केली. परंतु ओरिसांतून मात्र असा कोणी भारतीय कीर्तीचा राजकीय नेता, सामाजिक कार्यकर्ता, कवि, लेखक, चित्रकार अथवा संगीतज्ञ निर्माण होऊं शकला नाही अथवा जगाचें लक्ष वेधून घेईल अशी घटना या प्रदेशांत घडली नाही. यामुळे साहजिकच याच्याकडे कोणाचें लक्ष गेलें नाही. याचें आणखी एक कारण म्हणजे गेल्या चार-पांचशे वर्षांत या प्रदेशावर बाहेरच्या लोकांनीच राज्य केलें. कधी मुसलमानांनी, कधी मराठ्यांनी तर कधी इंग्रजांनी आणि इंग्रजांच्या आगमनानंतर हा भाग त्यांनी बिहारला जोडून बिहार-ओरिसा असा संयुक्त प्रांत करून टाकला होता. तत्पूर्वी बंगाल-बिहार-ओरिसा हा सगळा एकच प्रांत होता. आणि त्यापैकी बंगाली लोक सर्वांत अधिक सुशिक्षित व सुधारलेले असल्यामुळे बिहार-ओरिसा-आसाममध्ये बंगाली बाबूच राज्यकर्ते व पुढारी होते. अखेर १९३६ सालीं उडियाभाषी जनतेचा एक स्वतंत्र प्रांत करण्यांत येऊन त्याला उडिसा किंवा ओरिसा असें संबोधण्यांत येऊं लागलें.

## उज्ज्वल भूतकाळ

गेलीं कांही शतकें उत्कल देश अंधारांत खितपत पडलेला असला तरी त्याचा प्राचीन काळ मात्र कोणालाहि हेवा वाटावा इतका उज्ज्वल आणि वीर्य-शौर्याने काठोकाठ भरलेला असा होता. जुन्या काळीं या देशाला ‘ कलिंग ’ असें नांव होतें. सम्राट् अशोकाने कलिंगावर स्वारी करून पराभव केल्याचें आणि त्या युद्धांतील मानवहानि पाहून त्याचें हृदयपरिवर्तन झाल्याचें आपण इतिहासांत वाचतों. परंतु, तेवढ्यावरून त्या काळीं कलिंग किती सामर्थ्यशाली होता याची कल्पना येत नाही. त्यासाठी आपणाला हें माहीत असलें पाहिजे, की अशोकाचा आजा सम्राट् चंद्रगुप्त मौर्य याने कलिंगावर ताबा मिळविण्याचा अटोकाट प्रयत्न केला, परंतु तें कांही त्याला शक्य झालें नाही. ज्याने सारा दक्षिण भारत पादाक्रान्त केला त्या सम्राट्

चंद्रगुप्ताला कलिंग जिंकतां आला नाही यावरूनच कलिंगाच्या बलाढ्य-पणाची कल्पना येऊं शकेल. अशोकाने कलिंगाचा पराभव केला; पण त्यासाठीं किती मनुष्यहानि व्हावी लागली याचा हिशेब खुद्द अशोकानेच लिहून ठेवलेला आहे. आपल्या तेरा क्रमांकाच्या शिलालेखांत अशोक लिहितो की, कलिंगच्या युद्धांत एक लाख माणसें धारातीर्थी मरण पावलीं, दीड लाख लोक पकडून गुलाम करण्यांत आले आणि लाखो लोक युद्धामुळे व रोगराईने मृत्युमुखीं पडले. इतकें भयंकर युद्ध ज्या कलिंग देशाने केलें तो कांही सामान्य देश नसला पाहिजे खास !

## खारवेलाने उगविलेला सूड


या युद्धांत अशोकाला उपरति होऊन, 'चंडाशोका'चा ( उग्र अशोकाचा ) बौद्धधर्मीय अहिंसक अशोक बनला हें खरें. परंतु तेवढ्याने कलिंगवासीयांचें दुःख थोडेंच कमी होणार ? पराभवाच्या अपमानाचें शल्य त्यांच्या हृदयांत डाचतच होतें. त्यांतूनच इसवी सनापूर्वी दुसऱ्या शतकांत सम्राट् खारवेल उदयास आला. हा धर्माने जैन होता. वस्तुतः जैन व बौद्ध दोघेहि अहिंसा धर्माचे अनुयायी. परंतु, आपल्या देशाचा अपमान खारवेलाला सहन झाला नाही. त्याने अशोकाच्या मगधावर दोन वेळां हल्ले चढविले. पहिल्या वेळीं खारवेलाची स्वारी होत आहे हें कळतांच मगधाचा ग्रीक राजा डेमेट्रियस हा भिऊन मथुरेला पळून गेला ! दुसऱ्या खेपेस खारवेलाने आपले हत्ती थेट पाटलीपुत्राच्या सुंग राजवाड्यांत नेऊन बांधले. केवळ मगधाचा पाडाव करूनच खारवेल थांबला नाही, तर त्याने उत्तरेस वायव्य सरहद्द प्रांतापर्यंत आणि दक्षिणेस तेलंगणाच्या अंगणापर्यंत आपले हत्ती नेऊन भिडविले.

याचा अर्थ उत्कलचे लोक केवळ लढाईच्या बाबतींतच श्रेष्ठ होते असा नव्हे. जीवनाच्या इतर क्षेत्रांतहि त्यांनी फार मोठी कर्तबगारी करून दाखविली होती. विशेषतः समुद्रावर त्यांनी जें प्रभुत्व मिळविलें होतें तें अत्यंत कौतुकास्पद होतें. पूर्वेकडे फिलिपाइन्स बेटांपर्यंत आणि दक्षिणेकडे हिंदीमहासागरांतील द्वीपसमूहांपर्यंत कलिंगांचें साम्राज्य पसरलेलें होतें. कोणार्कच्या मंदिरावर जीं जिराफाचीं चित्रें दिसतात त्यावरून उत्कलवासी

लोक आफ्रिकेपर्यंतहि जाऊन पोचले असावेत असा तर्क करतां येतो. आज ओरिसाजवळ एकहि बंदर नाही. परंतु पूर्वीच्या काळीं अशीं बंदरें येथे असावींत असा अंदाज करणें शक्य आहे.

## कलेच्या क्षेत्रांतील कामगिरी

जलमार्ग व स्थलमार्ग येथील सामर्थ्याच्या बाबतींत उडिया लोक जसे अव्वल दर्जाचे होते; तसेच किंबहुना त्यापेक्षाहि अधिक कलेच्या बाबतींत त्यांनी प्रगति केलेली होती. सम्राट् अनंगभीम देवाने ( सन ११८९-१२२३ ) ११९८ सालीं बांधलेलें २१४ फूट ८ इंच उंचीचें जगन्नाथाचें विशाल मंदिर किंवा गंग वंशांतील सम्राट् नरसिंहदेव ( सन १२३८-१२६४ ) याने बंगाल व आंध्र जिंकल्याच्या आनंदाप्रीत्यर्थ कीर्तिमंदिर म्हणून बांधलेलें २२७ फूट उंचीचें कोणार्कचें सूर्य-मंदिर हीं पाहिलीं की त्यांच्या भव्यतेनेच छाती दडपून जाते. भुवनेश्वराच्या परिसरांतील लिंगराज राजारानी, मुक्तेश्वर, परशुरामेश्वर, वैताल वगैरे मंदिरांवर जी अप्रतिम कलाकुसर आणि मूर्तिकला व शिल्पकला पाहावयास मिळते तिच्यामुळे आपण थक्क तर होतोंच; परंतु एकेकाळीं आपण भारतीयांनी शिल्पकलेच्या क्षेत्रांत किती प्रगति केली होती हें पाहून आपलें हृदय आनंदाने व अभिमानाने भरून येतें. कोणार्क व भुवनेश्वर येथील शिल्पकला व वास्तुकला हीं इतक्या श्रेष्ठ दर्जाचीं आहेत की, तेवढ्यावरूनहि उत्कलवासी जनतेचें एके काळचें श्रेष्ठत्व जगाने मान्य करावें. या मंदिरावरील नर्तकी




[ जगन्नाथमंदिर : पुरी ]

व वादिका यांचीं शिल्पें पाहिलीं असतां संगीत-नृत्यवादनाच्या क्षेत्रांत या प्रदेशाने किती आघाडी मारली होती याची चांगली कल्पना येते.

गीतगोविंदाचा रचयिता जो जयदेव कवि त्याच्यावर अनेक प्रदेश आपला हक्क सांगतात. उडिया लोकहि त्याला आपलाच मानतात. जगन्नाथाच्या मंदिरांत तो भगवद् उपासना करीत होता. तेथे त्याची पद्मावतीशीं दृष्टभेट झाली व त्यांचें प्रेम जमून विवाह झाला अशी कथा उत्कलमध्ये प्रचलित आहे.

त्यानंतर इसवी सनाच्या १५ व्या शतकांत सारला पीठांतील सारलादास यांनी संस्कृत महाभारताच्या धर्तीवर उडिया महाभारत रचलें. या महाभारताला इतकी लोकप्रियता लाभली, की त्या काळच्या विद्वानांनी सारलादासांना ' शूद्रमुनि ' अशी पदवी दिली. या वेळेपासून उडिया विद्वान् संस्कृतमध्ये साहित्य-रचना करण्याऐवजी उडिया भाषेंत काव्यरचना करूं लागले. त्या दृष्टीने ही घटना अत्यंत महत्त्वाची आहे.

यानंतर १६ व्या शतकांत महापुरुष श्री जगन्नाथदास यांनी अत्यंत लहान वयांत उडिया भाषेंतील भागवताची रचना केली. त्यांचें हें भागवत आजहि लोक अत्यंत आवडीने वाचतात. आचार्य विनोबा भावे यांनी उत्कलमध्ये प्रवेश करतांच हें भागवत वाचण्यास सुरुवात केली होती. या भागवतावर खूष होऊन बंगालचे महाप्रभु चैतन्यदेव यांनी श्री जगन्नाथदासांना ' अतिजड ' म्हणजे ' सर्वश्रेष्ठ ' अशी पदवी बहाल केली होती.

अशा प्रकारें साहित्याच्या क्षेत्रांतहि उत्कलने आघाडी मारली होती.

### अवनतीच्या खोल गर्तेत

पण कालचक्र हें सदैव फिरतच राहतें. आज उच्च शिखरावर असलेलीं राष्ट्रें उद्या खोल महासागराच्या तळाशीं बुडून जातात आणि जंगलांत भटक्येपणा करणाऱ्या टोळ्या विश्वविजयी होऊन जगाला सुसंस्कृतीचे धडे देऊं लागतात. याला कलिंग तरी कसा अपवाद होणार ? सोळाव्या शतकानंतर त्याच्या अवनतीला सुरुवात झाली आणि कालापहाडच्या हल्ल्यापुढे त्याने कच खाल्ली. त्यानंतर कित्येक वर्षें मुसलमानांनी ओरिसावर राज्य केलें. येथील मंदिरें मुसलमानांनी फोडलीं, सुंदर मूर्तींचा नाश केला आणि

उत्कलीय जनतेंत पराभूत मनोवृत्ति खोलवर रुजून बसली. त्यानंतर नागपूरकर भोसल्यांनी १७५३ सालीं मोंगलांकडून ओरिसा जिंकून घेतला व पन्नास वर्षेंपर्यंत तेथे राज्य केलें. या अवधींत त्यांनी तेथील मंदिरांना संरक्षण दिलें आणि कांही इनामेंहि तोडून दिलीं. परंतु तेथील जनतेच्या मनांत मात्र मराठ्यांविषयी प्रीति निर्माण झाली नाही. आपल्या मुलांना भीति दाखविण्यासाठी 'बरगी आशिल' (बरगी आला) असें म्हणण्याची प्रथा अजूनहि ओरिसांत आहे. बरगी म्हणजे बारगीर, मराठा. इतकी त्यांची धास्ती तेथील लोकांनी घेतली. यामुळे १८०४ सालीं इंग्रजांनी मराठ्यांचा धुव्वा उडवून ओरिसा आपल्या ताब्यांत घेतला आणि सापडेल तो मराठा कापून काढला तेव्हा तेथील जनतेने सुटकेचा निःश्वास सोडला असल्यास नवल नाही. कांही मराठा कुटुंबें त्यांतूनहि तेथे लपून राहिलीं. त्यांनी आपलीं नांवें सोडलीं, भाषा सोडली आणि ती संपूर्ण उडिया बनून गेलीं. आधुनिक उडियाचे एक श्रेष्ठ कवि श्री. मधुसूदनराव हे महाराष्ट्रीय होते असें म्हणतात.

भारतामध्ये जेथे जेथे इंग्रजांचा प्रवेश झाला तेथील लोक खडबडून जागे झाले आणि आधुनिक शिक्षण व विज्ञान यांचें महत्त्व जाणून त्या मार्गाने द्रुतगतीने प्रगति करूं लागले. परंतु हें भाग्य उत्कलला मात्र लाभलें नाही. कारण इंग्रजांनी बंगाल व बिहारच्या कचाट्यांत त्याला अडकवून टाकलें. यामुळे बंगाली बाबूंचेंच राज्य ओरिसावर सुरू झालें. इतकें, की शालेय शिक्षणानंतर कॉलेजसाठी पाटण्याला तरी जावें लागे किंवा कलकत्त्याला तरी. हें शिक्षण सामान्य लोकांना कसें झेपणार? आणि याचा परिणाम असा झाला, की उडिया माणूस म्हणजे आचारीच बनला.

अखेर १ एप्रिल १९३६ रोजीं भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व मान्य करून ब्रिटिश सरकारने ओरिसाचा स्वतंत्र प्रांत बनविला आणि तेव्हापासून या प्रदेशाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्यास सुरुवात केली. परंतु त्याच्या मार्गांत एक फार मोठी धोंड होती. ती म्हणजे देशी संस्थानांची. सुमारें दोन डझन संस्थानें ओरिसाभर पसरलेलीं होतीं. त्यांच्यामुळे ओरिसाला पद्धतशीर प्रगति करणें शक्य होत नव्हतें. भारत स्वतंत्र

झाल्यावर सरदार पटेल यांच्या कुशलतेमुळे ही धोंड दूर झाली आणि १ जानेवारी १९४८ रोजीं सगळीं संस्थानें ओरिसांत विलीन झालीं. हें राज्य स्वतंत्र झालें त्या वेळीं त्याचा कारभार तुटीचाच होता; परंतु तरीहि लोकांनी हिम्मत सोडली नाही. त्यांतूनच आता एक समृद्ध प्रांत निर्माण होऊं लागला आहे.

ओरिसाच्या मागासलेपणाचें मुख्य कारण म्हणजे हा भाग जंगलांनी भरलेला असून यांत आदिवासी व मागसलेल्या जमातींच्या लोकांची संख्या सुमारें दीड कोटि असून त्यांपैकी आदिवासी ३० लाख, मागस जमाती ( शेड्यूल्ड कास्ट ) ३६ लाख व इतर मागसलेल्या जाती ( बॅकवर्ड क्लासेस् ) ४२ लाख मिळून सुमारें एक कोटि लोक मागसलेले आहेत. हे लोकहि एके ठिकाणीं नसून अत्यंत विस्कळितपणें जंगलांतून राहतात. सबंध प्रांतांत सुमारें पांच लाख लोकसंख्या असलेलें कटक हें एकमेव शहर आहे. प्रांताचें क्षेत्रफळ ६० हजार चौरस मैल आहे. सबंध प्रांतांत दर चौरस मैलीं २४४ लोक पडतात. त्यावरून लोकसंख्या किती विखुरलेली असेल याची कल्पना येईल.

## सुपीक व समृद्ध जमीन

ओरिसाची जमीन मात्र अत्यंत सुपीक व समृद्ध आहे. येथील मुख्य पीक भाताचें असून दरवर्षी कांही ना कांही भात हा प्रांत इतर प्रांतांना देतो. साऱ्या भारतांत अन्नाची टंचाई होती, तेव्हादेखील ओरिसाने सुमारें ८ लाख टन तांदूळ मुख्यतः बंगाल, मद्रास व बिहार या प्रदेशांना दिला. रेशनिंगच्या त्रासाचा अनुभव या प्रांताला मुळीच घ्यावा लागला नाही, ही खरोखरी किती भाग्याची गोष्ट होती! भाताप्रमाणेच ज्यूट, गळिताचीं धान्यें, डाळीं, नारळ, हळद, विड्याचीं पानें, आंवळा, हाडें व कातडीं इत्यादि माल ओरिसांतून निर्यात होतो आणि चहा, तेलें, साखर, सूत, कापड, सुपारी, गहू व मिरची या वस्तु त्याला बाहेरून आणाव्या लागतात.

ओरिसाचा एकतृतीयांशापेक्षा जास्त भाग जंगलांनी व्यापलेला आहे. या जंगलांपासून १९५२-५३ सालीं एक कोटीहून अधिक रुपयांचें उत्पन्न

सरकारला मिळालें. या जंगलांवरच आदिवासींचें जीवन अवलंबून असून कोंढ, संताळ, गडजा, कोया, जुआंग, सवरा, बुंदा वगैरे जातींचे आदिवासी स्वच्छंदपणें येथे आपलें आयुष्य कंठीत असतात. या जंगलांतून इमारती लाकूड, बांबू, रेल्वेच्या स्लिपर्ससाठी लागणारें लाकूड, विड्यांना लागणारीं केंडूचीं पानें, वेत, मद्य, शिंगें, मोहाचीं फुलें, रेशमाचे किडे, लाख, हस्तिदंत, कातडीं, औषधि वनस्पति वगैरे नाना प्रकारच्या वस्तु मिळत असतात. या भागांत राहणारे आदिवासी अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू व काटक असतात. त्यांना विश्वासांत घेऊन या जंगली संपत्तीची वाढ करणें सहज शक्य आहे. त्यासाठी रस्ते करणें आवश्यक आहे. ओरिसा सरकारचे प्रयत्न या दृष्टीने चालूच आहेत.

खनिज संपत्तीच्या बाबतींत तर ओरिसा इतका संपन्न आहे, की कुणालाहि हेवा वाटावा. दगडी कोळशापासून सोन्यापर्यंत बहुतेक सगळे खनिज पदार्थ ओरिसांत सांपडतात. त्यांपैकी लोखंड मॅंगेनीज, बॉक्साइट, चुनखडी, क्रोमाइट, कोळसा, ग्राफाइट आणि डोलोमाइट हे मुख्य आहेत. या भागांत दोन अब्ज टनांहून जास्त लोखंड विद्यमान आहे असें शास्त्रज्ञांचें मत आहे.

## हिराकुड धरणाचा फायदा

अर्थात् ही खनिज संपत्ति भूगर्भांतून वर काढून उपयोगांत येण्यालायक करण्यासाठी विद्युत्शक्तीची फार जरूर आहे. ही जरूर हिराकुड धरणाने पुरी होऊं शकेल. संबलपुराजवळ महानदीवर हें प्रचंड धरण बांधलें जात आहे. या धरणाची लांबी सुमारें तीन मैल असून त्याच्या दोन्ही बाजूंस १७ मैल लांबीचे बांध घालण्यांत येतील. धरणाची उंची १५० फूट असून धरणांतील पाणी २६३ चौरस मैलांत पसरलें असेल. आणि त्याला एकूण ७४ कोटि रुपये खर्च येईल. या धरणाचें पाणी ११ लाख एकर जमिनीला मिळूं शकेल आणि त्यामुळे सरकाराला १७ कोटि रुपयांचें उत्पन्न अन्नधान्यें व ऊस यांच्या उत्पादनांवर मिळूं शकेल.

या धरणापासून ३॥ लाख किलोवॅट वीज निर्माण होईल व त्यांपैकी ३ लाख किलोवॅट वीज प्रत्यक्ष वापरासाठी मिळूं शकेल. त्या दृष्टीने उद्योगधंदे

व कारखाने यांची सुरुवात आतापासूनच झाली आहे. चौद्वारला एक कापड–गिरणी, राजगंगपूरला एक सिमेंट फॅक्टरी, कटकला रेफ्रिजरेटर तयार करण्याचा कारखाना, तालचेर व रामपूर येथे कोळशाच्या खाणी हीं आजच उभारलीं जाऊं लागलीं आहेत. त्यांखेरीज इतरहि अनेक् कारखाने लौकरच निघतील असें दिसत आहे. अशा प्रकारें जी महानदी म्हणजे ( तिच्या भयंकर पुरांमुळे ) ओरिसाला एक आपत्ति वाटत होती, तीच आता सर्वांत मोठी साह्यकर्ती किंवा नवजीवनदात्री बनलेली आहे. यापुढे तिच्या पुरांवर तर नियंत्रण बसेलच; पण त्याचबरोबर समुद्रांत वाहून जाणाऱ्या पाण्याचाहि या प्रांताला भरपूर उपयोग होऊं शकेल.

महानदीप्रमाणेच मुचकुंद नदीचाहि उपयोग करून घेण्यांत येणार आहे. कोरापुट जिल्ह्यांत डुडुमा या ठिकाणीं ही नदी ५४० फूट उंचीवरून खाली पडते. या धबधब्यावर १ लाख किलोवॅट वीज निर्माण होईल. ओरिसा व आंध्र यांच्या सीमेवर ही नदी असल्यामुळे या विद्युत्-केंद्रासाठी येणाऱ्या साडेनऊ कोटि रुपये खर्चापैकी तीन कोटि रुपये खर्च आंध्र सोशील आणि त्यालाहि त्या प्रमाणांत वीज मिळेल.

भारतांतील इतर प्रदेशांप्रमाणें ओरिसांतहि ग्रामोद्योगांना फार महत्त्वाचें स्थान आहे. खेड्यांना लागणारीं मातीचीं व काशाचीं भांडीं तयार करणें, शंख-शिंपले गोळा करून त्यांच्या नानाविध कलाकृति तयार करणें. हस्तिदंत व शिंगें यांच्या वस्तु बनविणें वगैरे ग्रामोद्योग तर आहेतच; पण सर्वांत मोठा ग्रामोद्योग किंवा कुटिरोद्योग म्हणजे हातमागाचें नक्षीदार कापड तयार करणें. रंगीबेरंगी धाग्यांनी विणून कापडावर सुंदर वेलबुट्टी किंवा पशुपक्ष्यांचीं मजेदार चित्रें काढण्याच्या कलेंत उत्कलच्या ग्रामीण लोकांनी कल्पनातीत प्रगति केलेली आहे. या कापडामुळे खेड्यांतील कलावंतांच्या प्रतिभेला चांगलें क्षेत्र मिळतें. त्यांचीं डिझाईन्स अगदी साधीं आणि रंग खूपच भडक असतात. परंतु मऊ तलम कापडावर ठराविक कृत्रिम पद्धतीचीं डिझाईन्स पाहून कंटाळलेल्या डोळ्यांना निसर्गाला जवळ भासणारीं हीं डिझाईन्स एकदम आवडतात, म्हणूनच उत्कलमधील या कापडाला भारताबाहेरील पाश्चात्त्य देशांत–विशेषतः विलायतेंत–फार मोठी मागणी असते. १९५१-५२ सालीं नुसत्या

कटक मार्केटिंग असोसिएशननेच तीन लाख वार कापड तयार करून ८ लाख रुपयांची विक्री केली. उद्यां खेडोपाडीं वीज खेळूं लागली की हें उत्पादन अनेक पटींनी वाढेल आणि युरोप-अमेरिकेच्या बाजारपेठांत शोकिनांना आकर्षित करणारें उत्कलचें हातमागाचें कापड वैपुल्यानें दिसूं लागेल.

## दुसरें कोकणच जणू !

ओरिसांत हिंडूं लागलों की, आपणां महाराष्ट्रीयांना एक विशेष आत्मीयता येथील भूमीबद्दल वाटूं लागते. याचें कारण तेथील नैसर्गिक परिस्थिति हुबेहूब आमच्या कोकणासारखी किंवा गोव्यासारखी आहे. येथील माती कोकणाइतकी लालभडक नसली तरी जवळ जवळ पिवळट-तांबडीच आहे. पूर्वेकडील समुद्र उघडा असल्यामुळे तेथील वाळू बरीच आंतपर्यंत उडून येते. म्हणूनहि कदाचित् मातीचा लालपणा कमी झाला असावा. त्याच नारळी, तेच आंबे, तेच काजू, तेच फणस आणि तींच केळीं येथे आढळतात. आणि मासळी-भात तर येथील लोकांचा मुख्य आहारच. आम्ही कोणार्कहून परत येतांना आमचा ड्रायव्हर वाटेंत भेटलेल्या एका ब्राह्मण चौकीदाराजवळ समोरच्या ब्राह्मणी नदींतील माशां-विषयी चौकशी करूं लागला तेव्हा मला मोठें आश्चर्य वाटलें, आणि मीं ड्रायव्हरला म्हणालोंहि, " या भटजीला माशाची काय माहिती असणार ? " तो नुसता हसला. पण आमच्या शेजारीं बसलेले ओरिसा म्यूझियमचे क्युरेटर श्री. बिपिन बिहारी नाथ म्हणाले, " इकडे सर्वच लोक मासळी खातात. फक्त कांही जमातींतील विधवा बायका तेवढ्या मासळी खात नाहींत."

कोकणाप्रमाणेच येथील हवा उष्ण व दमट असल्यामुळे कपडे जवळ-जवळ लागतच नाहीत. विशेष सुधारलेले व सुशिक्षित लोक क्वचितच सूट-बूट वापरतात; परंतु, सर्वसामान्य शिक्षित लोक पंचावजा आखूड धोतर आणि आखूड बाह्यांचा सदरा घालतात. कोट व टोपी दिसतच नाही म्हटलें तरी चालेल. पायजम्यांचा रिवाजहि नाही. बिहार, आसाम, बंगाल व ओरिसा या चारहि प्रदेशांत पायजमा आढळत नाही. महाराष्ट्राइतका

पायजमा मला वाटतें या देशांत कोठेच वापरला जात नाही. ओरिसांतील ग्रामीण लोक तर सदराहि क्वचितच वापरतात. एक पंचा कमरेला व एक पंचा अंगावर झाला की पुरें ! अंगावरील पंचा किंवा उपरणेंहि अनिवार्य नसते. नुसता कमरेचा पंचा असला तरी चालतें. स्त्रियांच्या पोषाखांतहि रंगीबेरंगीपणापेक्षा साध्या पांढऱ्या पांच वारी साड्याच मुख्यतः दिसतात. अर्थात् आदिवासी स्त्रियांत रंगीत लुगडीं आढळतात.

येथील स्त्रियांमध्ये पडद्याची चाल अजिबात नाही. पुरुषांइतक्याच मोकळेपणाने परंतु शालीनतेने त्या वावरतात; आणि तितक्याच कर्तबगारहि असतात. उत्कलच्या राजकीय जागृतीचें बरेंचसें श्रेय या स्त्रियांना दिलें पाहिजे. महाराष्ट्रीय स्त्रीनेहि आदर्श म्हणून समोर ठेवाव्यात अशा महिला या प्रदेशांत आहेत.

कोकणाप्रमाणेच येथेहि कमालीची स्वच्छता दिसून येते. पाऊस आणि समुद्रकिनाऱ्याची रेती यांची या स्वच्छतेला मदतच होते. गोव्यांतील किंवा कोकणांतील एक गोष्ट मात्र येथे मुळीच दिसली नाही. ती म्हणजे नट्टापट्टा व फुलांचा षोक. पश्चिम किनाऱ्यावरील बहुतेक सर्व जमातींच्या स्त्रियांत फुलांचा अतोनात षोक आढळतो. मंगळूरकडे तर फुलांच्या वेण्यांत डोकेंहि झाकून जातें. मद्रासकडेहि फुलांचा षोक दिसतो. परंतु येथे मात्र विलासिता व फुलांचा षोक यांचें दर्शन घडलें नाही. जेथील देवळा-देवळांवर शृंगाराचीं व संभोगाचीं चित्रें कोरलेलीं आहेत त्या ओरिसा प्रदेशांत विलासाचा व छानछोकीचा इतका अभाव असावा हें पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहिलें नाही.

## सुंदर दृश्यांची रेलचेल

लहान-मोठे डोंगर-पर्वत, दाट जंगलें, छोट्या-मोठ्या नद्या, एका रेषेंत आखल्यासारखा दिसणारा समुद्र-किनारा आणि समुद्रांतून स्नान करून वर येणारा सूर्य, घाटमाथ्यावरून जाणारे नागमोडी रस्ते या सर्वांमुळे येथे सुंदर दृश्यांची जणू रेलचेल झालेली आहे. टिक्करेपारा या ठिकाणीं महानदी खडकाळ व डोंगराळ भागांतून जाते. येथे सुमारें १४ मैल लांबीची खिंड तयार झालेली आहे. नदीच्या काठच्या टेकड्यांची उंची समुद्रसपाटीपासून

अनुक्रम २६४४७ वि: भू-प्रवास
क्रमांक ........ नों: दि: २४/३/६



२ हजार फूट आहे. या खिंडीला ‘ सातकोसिया खिंड ’ असें म्हणतात. येथील दृश्य फारच सुंदर दिसतें. या ठिकाणीं महानदीमध्ये सुसरीहि आढळतात. हिराकुंड धरण तयार झाल्यानंतर महानदीला या टिक्करेपाऱ्याजवळ मोठें धरण बांधण्याची योजना आहे.

असेंच आणखी एक सुंदर निसर्गदृश्याचें स्थान म्हणजे चिलका सरोवर. या सरोवराचें क्षेत्रफळ सुमारें चारशे चौरस मैल असून एवढें मोठें सरोवर भारतांत दुसरें नाही असें म्हणतात. कलकत्ता-मद्रास रेल्वे मार्गावर हें असून याच्या काठाकाठाने अनेक मैलपर्यंत आगगाडी जाते. यामुळे गाडींतूनहि याचें छान दर्शन होतें. हें सरोवर बंगालच्या उपसागराला लागूनच आहे. यामुळे भरतीच्या वेळीं यांत समुद्राचें पाणी शिरून तें खारट बनतें. यांत अनेक लहान-लहान नद्या येऊन मिळतात. याची लांबी ४४ मैल आहे. यामुळे जलमार्ग म्हणूनहि याचा उपयोग होतो. या सरोवराची खोली मात्र सरासरी पांच-सहा फूट असून कांही थोडा ( नैर्ऋत्येकडील ) भाग वगळल्यास बारा फुटांहून जास्त खोली कोठेहि नाही. येथील नैसर्गिक दृश्यें मोठीं मनोहर असून डिसेंबरपासून मार्चपर्यंत जगाच्या वेगवेगळ्या भागांतून सायबेरियन बदकें, नाना जातींचे व नाना रंगांचे पशुपक्षी येथे मासे पकडण्यासाठी येतात. तेव्हा पक्ष्यांच्या शिकारीचे शौकीन लोक येथे गर्दी करतात आणि वनविहारासाठी आलेल्या टोळ्या जिकडे तिकडे दिसूं लागतात. एरव्हीहि सुट्टीच्या दिवसांत येथे कलकत्त्यापासूनचे अनेक लोक येतात.

परंतु केवळ मनोरंजन एवढाच कांही या सरोवराचा उपयोग नाही. शेकडों लोकांना अन्न मिळवून देण्याचें कार्यहि हें सरोवर करीत असतें. येथे उत्कृष्ट मासळी सापडते. समुद्रांतील मासे लाटांबरोबर सरोवरांत लोटले जातात आणि मग त्यांना तेथेच राहावें लागतें. कांही मासे मुद्दाम येथे येऊन अंडीं घालतात, यामुळे येथे विपुल मासळी मिळते. १९५१–५२ सालीं ८० हजार मण मासळी या सरोवरांतून मिळाली. त्यावरून या उद्योगाची कल्पना येईल.

याखेरीज कटकजवळील महानदीचें विशाल पात्र, काठजूडी नदीला बांधलेली प्रचंड भिंत, वगैरे अनेक नैसर्गिक व मानवनिर्मित प्रेक्षणीय स्थळें

या प्रांतांत आहेत. कोणार्क, भुवनेश्वर, पुरी, धौली, उदयगिरिखंडगिरि, शिशुपालगढ, बाराबारी किल्ला हीं स्थानें तर विख्यातच आहेत.

ओरिसा हा नदीमातृक देश आहे. येथे प्रचंड महानदीपासून अगदी ओहोळासारख्या भासणाऱ्या छोट्या नदीपर्यंत अनेक नद्यांचें जाळें पसरलेलें आहे. या नद्यांचीं नांवें मोठीं काव्यमय आहेत. महानदी ही आपल्या नांवाप्रमाणेच लांब-रुंद आहे; तर अशोकाला ज्या नदीच्या काठीं भुवनेश्वराजवळ उपरति होऊन तो बौद्ध धर्मानुयायी बनला त्या नदीचें नांव ' दया ' असें आहे. त्याखेरीज मुचकुंद, ब्राह्मणजी, शालंदी, सुवर्णरेखा, वैतरणा, इंद्रावती, चंद्रभागा, वंशधारा, ऋषिकुल्या, उदान्ती, सुंदर वगैरे अनेक काव्यमय नांवें असलेल्या नद्या आहेत.

येथील माणसें आकाराने लहानशींच आहेत. धिप्पाड माणूस क्वचितच पाहावयास मिळतो. तशींच जनावरेंहि अगदी खुजीं आहेत. गाडीला जोडलेले बैल हे गाडीच्या चाकाच्या उंचीच्या निम्म्यानेहि उंच असत नाहीत. यामुळे त्यांना वेसण घालण्याची गरजच भासत नाही. वेसणच काय, पण कासराहि नसतो. यामुळे गाडी वळवितांना गाडीवान खाली उतरून स्वतःच्या हाताने गाडी वळवितो. गाडी तरी काय असते ? लाकडी आसाने जोडलेल्या दोन चाकांवर टाकलेली लांब शिडी म्हणजे गाडी ! तिच्यांत ओझेंहि बेताचेंच असतें. अशा जनावरांच्या माता ( गाई ) दूध तरी किती देणार ? यामुळे येथे दुभत्याचा फार तुटवडा असतो. अलीकडे शहरांतील गवळी परप्रांतांतून म्हशी आणून हा प्रश्न सोडवूं लागले आहेत.

## विनयी आणि आतिथ्यशील लोक

उत्कलचे लोक अत्यंत विनयशील व आतिथ्यशील असल्याचा अनुभव मला दोन्ही खेपांना आला. आपण मागसलेले आहोंत या भावनेंतून कदाचित् हा विनय आला असण्याची शक्यता आहे. आपल्याकडून जरा कांहीं चूक झाली अथवा विलंब झाला तर हे लोक कष्टी होतात आणि क्षमा मागतात. तसें पहिल्यास उर्दू व इंग्रजी बोलणारे लोकहि पदोपदीं क्षमा मागतात; परंतु त्या क्षमेमध्ये इतका अहंकार भरलेला असतो की ते क्षमा मागत नसून क्षमा करीत आहेत असा भास होतो. तसें यांचें नाहीं. श्रद्धा तर जणू त्यांच्या रोमारोमांत भिनलेली आहे. यामुळेच गांधीजी

आणि विनोबा यांचें कार्य येथें इतकें फोफावूं व मूळ धरूं शकलें. अर्थात् हे गुण जगन्नाथपुरीच्या किंवा इतर क्षेत्रस्थ पंड्यांच्या ठिकाणीं मुळीच आढळणार नाहीत ! त्यांची व देशांतील इतर क्षेत्रांच्या ठिकाणच्या पुजाऱ्यांची जात एक आहे. तोच उर्मटपणा, तीच मग्रुरी, पैशासाठी तीच लाचारी, तेंच ढोंग आणि देवाचा तोच काळाबाजार येथेहि आढळेल. परंतु त्यावरून सर्वसामान्य उडिया जनतेच्या स्वभावाची कल्पना करणें चूक होईल.

ओरिसाच्या शेजारीं बंगाल, बिहार व आंध्र हे तीन प्रदेश आहेत. हे तीनहि प्रदेश भांडखोरपणाबद्दल बदनाम झालेले आहेत. सरहद्दीवरून त्यांच्या कांही ना कांही कुरापती चालूच असतात. उडिया लोक मात्र या प्रकारच्या भांडणांत सहसा पडत नाहीत. आपलीं गाऱ्हाणीं किंवा अडचणी स्वतःच गुंडगिरी करून न सोडवितां योग्य व सनदशीर मार्गांनीच त्यांचें निराकरण करून घ्यावयाचें व तसें करतांना आपल्यावर अन्याय झाला तरी देशाचें व्यापक हित डोळ्यांसमोर ठेवून तो सहन करावयाचा आणि योग्य संधीची वाट पाहत राहावयाचें, हा मार्ग उडिसाने स्वीकारलेला आहे. त्यामुळे आज जरी त्याचें थोडेंफार नुकसान झाल्यासारखें वाटलें व इतर प्रदेशांनी त्यांचा भाग आपल्यांत सामील करून घेतला असला तरी शेवटीं उत्कलला न्याय मिळाल्याशिवाय राहणार नाही.

## रूप-सौंदर्याची उणीव

ओरिसांतून आपण हिंडूं लागलों की एक गोष्ट चटकन् जणवते. ती म्हणजे तेथील रूपसौंदर्याचा तुटवडा. पुरुषांची गोष्ट तर सोडूनच द्या; पण स्त्रियांमध्येहि सुंदरपणा असा जवळजवळ दिसतच नाही. अनुगुल व पुरीच्या सर्वोदय-संमेलनाची सारी भोजनव्यवस्था तेथील तरुण स्त्रियांनी व मुलींनी अंगावर घेतलेली होती आणि त्यांनी ती अगदी व्यवस्थितपणें पार पाडून दाखविली. त्यावरून त्यांच्या अंगीं असलेल्या कर्तृत्वशक्तीचा प्रत्यय अवश्य आला. परंतु, त्या चार-पांचशे तरुणींमध्ये एकहि अशी दिसली नाही की जिला ‘ सुंदरी ’ अशी संज्ञा देतां येईल. त्यांपैकी बहुतेक

सर्व बायका उच्च वर्गांतील होत्या, ही गोष्टहि लक्षांत ठेवली पाहिजे. ही स्थिति जर वरच्या वर्गांतील स्त्रियांची, तर मग जवळजवळ १ कोट संख्या असलेल्या आदिवासी व मागसलेल्या जमातींतील स्त्रियांसंबंधी बोलावयास नकोच. याचें कारण असें सांगतात, की या प्रदेशांत आर्य, द्रविड आणि आदिवासी यांचें आतोनात मिश्रण झालेलें आहे. येथील लोकांचा वर्ण पुष्कळच उजळ आहे, नाकडोळेहि व्यवस्थित आहेत; परंतु पुरुषांत देखणेपणा नाही आणि स्त्रियांत सौंदर्य नाही. अधून-मधून एखादा देखणा पुरुष दिसतो. पण अधून-मधून त्याची चौकशी केली तर असें आढळून येतें की तो स्वतः बंगाली आहे किंवा त्याचे पूर्वज बंगालमधून आलेले ब्राह्मण अथवा कायस्थ होते. आपल्याकडे श्रीमंत, घरंदाज किंवा सरदार-दरकदार यांच्यामध्ये तरी देखणेपणा व नाजुकपणा हटकून आढळतोच; परंतु येथे तेंहि शक्य नाही. कारण, येथील माजी संस्थानांचे बहुतेक अधिपति आदिवासी जमातींतीलच होते. आम्ही ज्या सरकारी गेस्ट हाउसमध्ये उतरलों होतों तेथेच एक आमदार असलेला माजी राजा उतरलेला होता. त्याच्या ठिकाणीं लठ्ठपणाखेरीज राजेपणाचें एकहि चिह्न दिसत नव्हतें. त्याचा भाऊ तर आफ्रिकेंतून पकडून आणलेल्या एखाद्या जाडजूड शिद्द्यासारखा दिसत होता. ओरिसाचे माजी मुख्य मंत्री श्री. नवकृष्ण चौधरी यांच्या पत्नीकडे पाहिल्यानंतर प्रारंभीं असेंच वाटतें, की त्या आदिवासी असाव्यात. त्यांच्याकडे पाहणाऱ्यांना यांचें सारें शिक्षण शांतिनिकेतनमध्ये झालें असेल हें खरेंहि वाटणार नाही.

## जातीय वादाचा विखार कमी

जातीय वादाचा प्रश्न भारतांतील कोणत्या प्रांतांत नाहीं ? कोठे ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आहे, कोठे शीख-हिंदु वाद आहे, कोठे कायस्थ-भूमिहार वाद आहे, तर कोठे लिंगायत-लिंगायेतर वाद आहे. तेव्हा उडीसा तरी याला कसा अपवाद राहणार ? येथील मुख्य वाद कायस्थ व ब्राह्मण यांच्यांत आहे. वस्तुतः या दोन जमातींची संख्या शेकडा १–२ टक्केहि नसेल; परंतु आमदारांत व मंत्रिमंडळांत यांचीच संख्या सगळ्यांत जास्त आहे. येथे कायस्थांना ‘ करण ’ असें म्हणतात. चौधरी, महंती, कानूनगो

वगैरे करण व मिश्र, दास, पंडा, महापात्र वगैरे ब्राह्मण यांपैकी अधिकार कोणाच्या हातीं राहावा याबद्दल भांडणें चालूं असत. परंतु, आता मात्र खालच्या वर्गांतील जनता जागृत होऊं लागली असून या दोघांचाहि उपयोग करून स्वतःच्या हातीं राज्यकारभार घेण्याची महत्त्वाकांक्षा ती बाळगीत आहे. अर्थात् उत्कलमधील ब्राह्मण, कायस्थ हे समजूतदार असून त्यांनी काळाचीं पावलें ओळखलेलीं आहेत. त्यामुळे येथील निवडणुका जातीय दृष्टीनें न होतां आर्थिक व राजकीय कार्यक्रमावर होऊं लागल्या आहेत. १४० सभासदांच्या प्रादेशिक कायदेमंडळांत निम्म्याहून थोडे अधिक कॉंग्रेसचे सभासद असून विरोधी पक्षांत मुख्यतः गणतंत्रीदल या जुन्या राजेरजवाड्यांच्या सभासदांचें बहुमत आहे. सोशालिस्ट व कंम्युनिस्ट यांचेंहि प्रत्येकीं ७–८ सभासद या असेंब्लींत आहेत आणि ते खूपच जागरूक आहेत.

उडीसा हा मागासलेला प्रांत असल्यामुळे येथे शिक्षणाचें प्रमाण फारच कमी असेल अशी कल्पना प्रारंभीं होते; परंतु ती चुकीची आहे. १९५१ सालीं या प्रदेशांत सुमारें १६ टक्के लोक साक्षर होते. एकूण भारताच्या तुलनेने पाहतां ही संख्या कांही कमी म्हणतां येणार नाही. शिवाय, गेल्या तीन-चार वर्षांपासून शिक्षणाची प्रगति फारच झपाट्याने होत आहे. १९४१ सालीं साक्षरतेचें प्रमाण फक्त ९ टक्के होतें, तें १९५१ सालीं १५·८ टक्के झालें. १९३६ सालीं शिक्षणावर फक्त २६ लाख रुपये खर्च होत होते, तर १९५३ सालीं १ कोटि ७७ लाख रुपये खर्च झाले. यावरून या दिशेने किती वेगांत प्रगति चालू आहे याची कल्पना येईल. १९५३ सालीं या प्रदेशांत २० कॉलेजें, १९८ हायस्कुलें, ५५० प्राथमिक शाळा आणि १२ हजार प्राथमिक शाळा होत्या. त्यानंतर त्यांत किती तरी वाढ झाली आहे. आदिवासी मुलांसाठी आश्रम-पद्धतीच्या ३२ प्राथमिक शाळा असून त्यांत १६०६ मुलें शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळा ५७५ असून त्याला 'सेवाश्रम' असें म्हटलें जातें. या शाळांतून २३,८०९ विद्यार्थी शिकत आहेत. या शाळांवर गत वर्षी ५ लाख रुपये खर्च करण्यांत आले. स्त्रियांना सेवेचें शिक्षण देण्यासाठी अनुगुल येथे एक 'वेल्फेअर ट्रेनिंग सेंटर' चालविण्यांत येतें.

आसाम-बंगालप्रमाणे ओरिसांतहि मुख्य व्यापार गुजराती व मारवाडी यांच्या ताब्यांत आहे. कटक येथील चांदीच्या कलाकुसरीचीं दुकानें गुजरात्यांच्या मालकीचीं आहेत आणि जंगलांतील लाकडाचा व्यापारहि त्यांच्याच ताब्यांत आहे. इतर प्रकारच्या व्यापारांत मारवाडी आघाडीवर आहेत. या प्रदेशांत मुसलमानांची संख्या सर्वांत कमी म्हणजे तीन टक्के आहे. हे मुसलमानहि शहरांत आहेत.

भारतापुढे लोकसंख्येच्या वाढीचा जो भयंकर प्रश्न ' आ ' वासून उभा आहे तो उत्कलमध्ये जवळजवळ नाही म्हटलें तरी चालेल. गेल्या दहा वर्षांत भारतांत सरासरीने १३·३६ टक्के लोकसंख्या वाढली, तर ओरिसांत ही टक्केवारी फक्त ६·३८ आहे. येथे दर चौरस मैलीं २४४ लोक राहतात. याचा अर्थ येथे लोकसंख्येच्या वाढीला भरपूर वाव आहे. निदान कांही जिल्ह्यांतून तरी आणखी पुष्कळच लोकसंख्या सामावूं शकेल. शिवाय, कारखान्यांची वाढ झाल्यानंतर लोकांना उपजीविकेची भरपूर सोय होऊन जमिनीवर अवलंबून राहणाऱ्यांची संख्या आणखी कमी होईल. त्या दृष्टीने पूर्व पाकिस्तानांतून येणाऱ्या लोकांना हा प्रांत आपल्या घरांत ठेवून घेऊं शकेल. पण बंगाली निर्वासित बंगाल सोडून अन्यत्र जायलाच तयार होत नाहीत त्याला कोण काय करणार ?

## भाषांतील साम्य

उडिया भाषा आम्हा महाराष्ट्रीयांना विशेष जवळची वाटते. वस्तुतः असमिया ( आसामी ), बँगला ( बंगाली ) व उडिया ( ओरिया ) या तीन भाषा एकाच गटांतल्या. त्यांच्यांत इतकें साम्य आहे, की त्रयस्थाला वाटावें, त्या एकच आहेत. असमिया भाषेची लिपीहि जवळजवळ बंगालीच आहे. अर्थात् या सर्व लिप्या देवनागरीमध्येच थोडे-फार फरक होऊन बनलेल्या आहेत. उडिया लिपि तशी फार सोपी आहे. नागरीच्या अक्षरांवर ˘ असें एक अर्धे किंवा तीनचतुर्थांश वर्तुळ टोपीसारखें ठेवलें की झालें उडिया अक्षर. पूर्वीच्या काळीं इतर भाषांप्रमाणे उडिया भाषेंतील साहित्यहि ताडपत्रांवर लिहिलें जात होतें. त्या वेळीं सोयीसाठी लिपीला गोलाइ देण्यांत आली असें म्हणतात. अर्थात् आजकालच्या कागदाच्या जमान्यांत

त्या टोपीची कांही जरूर उरलेली नाही. परंतु उत्कलवासीयांनाहि आपलीच लिपि सुंदर दिसते.

ब्रिटिश अमदानींत सुमारें शंभर-सव्वाशे वर्षें बंगाली भाषिकांचें आधिपत्य उत्कलवर राहिल्याने बंगालीचा फार मोठा प्रभाव उडिया भाषेवर पडणें स्वाभाविकच होतें. परंतु, बंगालीच्या खालोखाल छत्तीसगढी व मराठी भाषांचा जो प्रभाव उडिया भाषेवर पडलेला आहे तो मात्र आश्चर्य वाटण्यासारखा आहे. त्यांतहि छत्तीसगढाचा भाग ओरिसाला लागून असल्यामुळे त्या भाषेचा परिणाम होणें अशक्य नव्हतें; पण मराठीचा काय संबंध ? सुमारें पन्नास वर्षें मराठ्यांनी या प्रदेशावर राज्य केलें हा संबंधच कदाचित् या प्रभावाच्या मुळाशीं असेल. आजहि मोडी लिपींत लिहिलेले कागदपत्र येथे सांपडतात. त्यावरून मराठ्यांच्या अमदानींत येथे मराठींतूनच राज्यकारभार चालत असावा हें स्पष्ट होतें.

मराठी व इतर दाक्षिणात्य भाषा यांचें वैशिष्ट्य म्हणजे ‘ ळ ’ व ‘ ण ’ या अक्षरांचें वैपुल्य. उत्तरेकडील भाषांत ‘ ळ ’ नाहीच आणि ‘ ण ’ चा अनेक वेळां तेथे ‘ न ’ होतो. उडिया भाषेंत मात्र ‘ ळ ’ आणि ‘ ण ’ यांची रेलचेल आहे. जेथे संस्कृतच्या नियमाप्रमाणे ‘ ल ’ आला पाहिजे तेथेहि ते ‘ ळ ’ चा सर्रास उपयोग करतात. उदाहरणार्थ : ‘ ळळिता ’, ‘ बाळक ’, ‘ देऊळ ’ वगैरे. अर्थात् लिहितांना ते ‘ ल ’ च लिहितात; पण बोलतांना मात्र ‘ ळ ’ बोलतात. त्यांच्या प्रादेशिक राष्ट्रगीतांतील हें कडवें पाहा—

**ताळ तमाळ सुशोभित तीरा**
**शुभ्र तटिनी तीर, शीतळ समीरा**
**जननी जननी जननी**
**वंदे उत्कल जननी ॥**

( ताल व तमाल वृक्षांनी याचा किनारा सुशोभित आहे आणि याच्या नद्यांचे तीर शुभ्र आहेत. येथे शीतल वारा वाहत असतो. अशी ही आमची उत्कल जननी आहे. तिला आमचा नमस्कार असो ! )

मराठी व उडिया भाषांतील कांहीं समानार्थक शब्द असे आहेत—

| | | | |
|---|---|---|---|
| फणस-पणशा | पाणी -पाणी | माणूस-मजिस | आजी-आई |
| वाट -बाटा | नाही -नाही | भात -भात | पैसा -पइसा |
| नव्हे -नुहे | मका -मको | गांव -गाँ | मी -मूँ |
| दार -फाटक | कुलूप-कोलप | बहीण -भइणी | बाप -बापा |
| शेळी -छेळी | शिंग -सिंग | मुलें -पिला | जास्ती-जास्ती |
| कात -खइर | वही -खाता | थट्टा -थट्टा | मीठ -लूज |

कांहीं वाक्येंहि कळायला फार सोपीं असतात. उदाहरणार्थ : 'तुम्हर नाम कण ? (तुझें नांव काय ?) 'आपणंक घरे किए अछि ?' (आपल्या घरीं कोण आहे ?) 'बालकमाने खेलन्ति' (मुलें खेळतात.) मूँ कालि गोटा ए सवारि देखियिलि (मी एक वाहान पाहिलें होतें.), 'ए रेल कलिकता जिब' (ही गाडी कलकत्त्याला जाईल.) 'मूँ भात खाइलि' (मीं भात खाल्ला.), 'आजिकालि आपण कि काम करिछन्ति ?' (आजकाल आपण काय काम करतां ?) 'मोते भोक करुछि' (मला भूक लागली आहे.)

बंगाली लोकांप्रमाणे उडिया लोक 'अ' चा उच्चार बहुधा पूर्ण 'ओ' असा न करतां 'ऑ' असा करतात. यामुळे त्यांचें बोलणें कळण्यास फारशी अडचण पडत नाही. अनेकदा तर ते आपल्यापेक्षाहि स्पष्ट 'अ'-कार उच्चारतात आणि आपण शब्दांतील शेवटचें अक्षर हलन्त (अर्धें) उच्चारतों तसें न करतां ते पूर्ण उपच्चारतात. उदाहरणार्थ : आपण 'रथ' शब्दाचा उच्चार 'रथ्' असा करतों तर ते 'रऽथऽ' असा दीर्घ करतात. या दीर्घीकरणामुळे कवितेंत मात्राहि वाढल्या जातात. उदाहरणार्थ : आमच्या संमेलनांत जेवण्यापूर्वी पुढील श्लोक म्हटला जात असे—

घेनिबा आगरु मुखे सदा मो नित्य भक्स ।  
घेनिबि सतत मने हरि हे दया रक्ख ॥  
जीवन शकति दाता अन्न हीं पूर्ण ब्रह्म ।  
उदर-भरण नु हे जाण ये यज्ञकर्म ॥

(वदनिं कवळ घेतां नाम घ्या श्रीहरीचें ' या आपल्या सुप्रसिद्ध महाराष्ट्रीय श्लोकाचें हें शब्दशः भाषांतरच आहे.)

ज्या अक्षरांखाली जाड रेघ मारलेली आहे तीं दीर्घ उच्चारलीं जातात आणि त्यांच्या दोन मात्रा धरल्या जातात. अर्थात् अशा प्रकारची प्रथा गुजराती कवितेंतहि आढळते आणि हा फरक दाखविण्यासाठी त्यांच्याकडे चिह्नें वापरलीं जातात हें आपणांपैकी अनेकांना माहीत असेल. मराठींत आपण ऱ्हस्व शब्दांना दीर्घ करतों त्यांतलाच हा प्रकार.

## नियतकालिकांचा संसार

साहित्य-संगीत-कलेच्या बाबतींत आजचा उत्कल खूपच मागसलेला आहे. कटकहून निघणाऱ्या ' डगर ' ( रस्ता ) या मासिकाचे संपादक श्री. नित्यानंद महापात्र यांची मीं मुलाखत घेतली. त्यावरूनच मुख्यतः ही माहिती मला मिळालेली आहे. श्री. नित्यानंद महापात्र हे स्वतः उडिया भाषेंतील चांगले लेखक असून त्यांनी कादंबरी-कथा-कविता वगैरे पुष्कळ साहित्य लिहिलेलें आहे.

त्यांना मीं विचारलें, " तुम्ही लेखकांना लेखनमोबदला देतां का ? किती देतां ? "

त्यावर ते हसून म्हणाले, " उडिया भाषेंत लेखकांना लेखनमोबदला मिळतो; आणि जो मिळतो तोहि अगदी नाममात्र असतो. मी स्वतः पदराला खार लावून मासिक चालवीत आहें. केवळ षोक म्हणून ! त्यामुळे लेखकांना पैसे देणें मला शक्यच होत नाही. इतर मासिकांचेंहि असेंच आहे. आमच्या येथे जास्तींत जास्त खप असलेलें मासिक म्हणजे श्री. गोदावरीश मिश्र यांच्या संपादकत्वाखाली निघणारें ' निया खुँटा ' ( जळकें लाकूड ). त्याचा खप ८ हजार आहे. त्यांत मुख्यतः राजकीय विषयांवरील लेखच येतात. हेंच काय तें स्वावलंबी पत्र आहे. श्री. हरेकृष्ण मेहताब ( एके काळचे मुंबई राज्याचे राज्यपाल ) यांचें ' झंकार ' म्हणून मासिक असून त्याचा खप हजाराच्या आंतच आहे.

" आणि साप्ताहिकें ? " मीं विचारलें.

" नांव घेण्यासारखें ' मातृभूमि ' हें एकच साप्ताहिक आमच्या येथे आहे. बाकी दैनिक पत्रें आठवड्यांतून एखाद्या दिवशीं १–२ पानें जोडून आपले साप्ताहिक अंक काढतात आणि कम्युनिस्ट, सोशालिस्ट, गणतंत्रीदल वगैरे राजकीय पक्षांचीं मामुली स्वरूपाचीं प्रचारकी साप्ताहिकें आहेत. "

" आणि दैनिकें ? "

" आमच्या येथे उडिया भाषेंतलीं तीन अन् इंग्रजी एक अशीं चार दैनिकें आहेत. सर्वांत जुनें दैनिक ' समाज ' हें ' पीपल्स सोसायटी '-मार्फत चालविलें जातें. दुसरें दैनिक श्री. हरेकृष्ण मेहताब यांचें ' प्रजातंत्र ' हें आहे. हीं दोन्ही दैनिकें कॅाँग्रेसचीं आहेत. श्री. मेहताब यांचें ' ईस्टर्न टाईम्स ' हें इंग्रजी दैनिकहि कटकहूनच निघतें. उडिया भाषेंतील तिसरें दैनिक ' मातृभूमि ' असून त्याचे संपादक श्री. चिंतामणि मिश्र हे कम्युनिस्ट असले तरी हें पत्र स्वतंत्र विचाराचें आहे. "

" आपण लेखकांना पैसे देत नाही, तर मग लेखकांचें चालतें कसें ? "

" आमच्या येथील बहुतेक लेखक सरकारी नोकर किंवा प्रोफेसर वगैरे आहेत. त्यांचें जीवन लेखनावर मुळीच अवलंबून नाही. मी स्वतः लेखक असूनहि मला लेखनावर कांही मिळत नाही. माझ्या छापखान्यावरच माझें पोट चालतें. "

## प्रमुख साहित्यिक

उडिया भाषेंतील मुख्य मुख्य लेखक व कवि पुढीलप्रमाणे आहेत—

श्री. कालिन्दीचरण पाणिग्राही हे फार नाणावलेले लेखक असून ' मुक्तागडर क्षुधा ' ( मुक्ता गढरची भूक ), ' माटीर माणिसो ' ( मातीचा माणूस ) या त्यांच्या कादंबऱ्या व ' प्रियदश्शी ' ( प्रियदर्शी अशोक ) हें नाटक विशेष प्रसिद्ध आहे. पूर्वी ते उडिसा सरकारच्या प्रकाशन खात्यांत मोठ्या हुद्दयावर होते; हल्ली ते पुस्तकें लिहिण्यांत गुंतले आहेत.

श्री. मायाधर मानसिंह हे संबलपूरच्या गंगाधर महेर कॉलेजचे प्रिन्सिपॉल असून उत्कृष्ट कवि आहेत. श्री. सचिरा उतरॉय हे कादंबरीकार व कथालेखक म्हणून प्रसिद्ध आहेत.

नुकतेंच ज्यांच्या ‘ अमृतर संतान ’ ( ‘ अमृताचीं फुलें ’ ) या कादंबरीबद्दल भारत सरकारने पांच हजार रुपयांचें बक्षीस दिलें ते श्री. गोपीनाथ महन्ती सध्या जगन्नाथपुरीच्या डिस्ट्रिक्ट बोर्डाचे स्पेशल ऑफिसर आहेत. त्यांनी मुख्यतः आदिवासी व मागस जमातीच्या लोकांवरच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांचेच थोरले बंधु श्री. कान्हूचरण महन्ती हे ओरिसा सरकारच्या डेव्हलपमेंट डिपार्टमेंटमध्ये असिस्टंट सेक्रेटरी असून त्यांचा ‘ हा अन्न ! ’ ‘ आणि तुंड बाइद ’ ( बोभाटा ) या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत.

श्री. अनंत पटनायक हे पुरोगामी ( कम्युनिस्ट ) कवि असून त्यांचा ‘ शांतिक पोत ’ हा काव्यसंग्रह प्रकाशित झालेला आहे.

विनोदी लेखकांमध्ये श्री. रामचंद्र मिश्र, श्री. सुनील मोहन मिश्र व श्री. महापात्र नीलमणि साहु हे विशेष लोकप्रिय आहेत. श्री. कालीचरण पटनायक हे नांव घेण्यासारखे नाटककार असून श्री. पटनायक यांचें ‘ भात ’ हें नाटक विशेष प्रसिद्ध आहे.

उडिया भाषेंत उत्कृष्ट साहित्य निर्माण न होण्याचें कारण म्हणजे बंगाली भाषेचें आक्रमण हें होय. बहुतेक सुशिक्षित उडिया लोकांना बंगाली वाचतां येतें. त्यामुळे पुस्तकें व दैनिकेंहि बंगाली भाषेंतीलच वाचणें ते पसंत करतात. यामुळे उडिया भाषेंतील साहित्य वाचण्याकडे सुशिक्षितांची प्रवृत्ति कमीच असते. खालच्या वर्गात वाचनाची गोडी अजून निर्माण झालेली नाहीं.

साहित्य व नियतकालिकें यांचा वाचकवर्ग प्रामुख्याने शहरांतच असतो; आणि शहर या संज्ञेस प्राप्त होईल असें एकच शहर उत्कलमध्ये आहे. तें म्हणजे कटक. तेथेच बहुतेक सगळीं नियतकालिकें निघतात. बहुतेक लोकसंख्या जंगलांतून व डोंगर-दऱ्यांतून पसरलेल्या खेड्यांत विखुरलेली आहे. आता तेथे औद्योगिक क्रांति सुरू झालेली आहे. ती जेव्हा पुरी होईल. तेव्हा लोकांमध्ये वाचनाची गोडी वाढेल असें वाटतें.

जी गोष्ट साहित्याची, तीच संगीताची. अव्वल दर्जाचे संगीतज्ञ व गायक-वादक तेथे जवळजवळ नाहीतच म्हटलें तरी चालेल. श्री. निमाई हरिचंदन, श्री. सिंहारि श्यामसुंदर कर, श्री. काशीनाथ पूजापंडा, कुमारी सुनंदा पटनायक व श्री. जगबंधु साहु हींच चार-पांच नांवें तेथे ऐकावयास मिळालीं.

## प्राचीन शिल्पकलेचे नमुने

ओरिसा नैसर्गिक संपत्ति व साधनसामुग्री यांनी जसा समृद्ध आहे तसाच शिल्पकलेच्या बाबतींतहि अत्यंत भाग्यवान् आहे. भारतीय शिल्पकलेची ओळख करून घेणाऱ्याने जोंपर्यंत कोणार्क, भुवनेश्वर व जगन्नाथपुरी या तीन ठिकाणचीं शिल्पें पाहिलेलीं नाहींत तोंपर्यंत त्याचें ज्ञान अपूर्णच राहील. येथील शिल्पकला मुख्यतः बाराव्या शतकाच्या आसपास निर्माण झालेली आहे. त्या वेळीं उत्कलचे राजे महाप्रतापी होते आणि आपल्या पराक्रमाची खूण म्हणून अथवा देवांविषयीची श्रद्धा म्हणून त्यांनी येथील मंदिरें उभारलीं. आज इतक्या वर्षांनंतरहि या मंदिरांतील शिल्पकला पाहून आपलें मन थक्क होतें आणि त्या कलेंतील भव्यतेपुढे आपलें मस्तक नत होतें.

## कोणार्कचें सूर्यमंदिर

भारतांत सूर्याचीं अशीं स्वतंत्र मंदिरें फार क्वचित् पाहावयास मिळतात. त्यांतहि तें भव्य असणें ही गोष्ट विरळाच. परंतु, जगन्नाथपुरीच्या ईशान्येस सुमारें वीस मैलांवर असलेल्या कोणार्क या ठिकाणीं असलेलें सूर्यमंदिर भव्यतेच्या व कलाकुसरीच्या बाबतींत भारतांतील श्रेष्ठतम मंदिरांत मोडतें. हें मंदिर गंग वंशांतील सम्राट् नरसिंह याने (सन १२३७ ते १२६४) बांधलें. अगदी समुद्राच्या काठीं असल्यामुळे या मंदिराच्या जांभ्या दगडांवर समुद्राच्या खाऱ्या पाण्याचा व हवेचा परिणाम होऊन त्याचा बराच भाग पडलेला आहे. परंतु त्याच्या अवशिष्ट भागांवरून शास्त्रज्ञांनी असें शोधून काढलें आहे, की जेव्हा हें देऊळ पूर्ण स्वरूपांत होतें तेव्हा त्याची उंची २२७ फूट होती. या मंदिराचें वैशिष्ट्य असें की, याच्या पायथ्याशीं रथाचीं चाकें आहेत आणि त्याला घोडे जोडलेले आहेत. यांमुळे सबंध मंदिर म्हणजे सूर्याचा रथच आहे असें दुरून पाहणाऱ्याला वाटतें. या मंदिरांतील मुख्य देवतेची म्हणजे सूर्याची मूर्ति, मात्र विद्यमान नाही. ती मोडून तोडून तरी गेली असावी किंवा कुठे तरी रेतींत गाडली गेली असावी. मंदिराच्या वरच्या बाजूस मध्याह्नींच्या व सूर्यास्ताच्या वेळच्या सूर्याच्या मूर्ति, नृत्यांगना व वाद्यांगना यांच्या मूर्ति माणसांची व जनावरांचीं सुंदर चित्रें हीं सर्व अत्यंत प्रेक्षणीय आहेत. नटमंडपाच्या भिंतीवरील नृत्य-

वाद्यांचीं चित्रें तर माणसाला थक्क करून सोडतात. पुरी, भुवनेश्वर व कोणार्क या तीनहि ठिकाणीं स्त्री-पुरुष संभोगाचीं चित्रें अथवा शिल्पें पाहावयास मिळतात, त्यांचें औचित्य काय याचा उलगडा मात्र सामान्य प्रेक्षकास होत नाही.

## पुरीचा जगन्नाथ

जगन्नाथाच्या रथयात्रेचा सोहळा पाहणें हें धार्मिक वृत्तीच्या हिंदूंच्या जीवनांतील एक मोठें उद्दिष्ट असतें. असा हा जगन्नाथ दिसायला मात्र अगदीच बेंगरूळ आहे, हें पाहिलें की आपला विरस होतो. कृष्ण म्हणजेच जगन्नाथ. एका बाजूला बलराम, दुसऱ्या बाजूला कृष्ण आणि मध्ये सुभद्रा अशा तीन लाकडी मूर्ति जगन्नाथाच्या मंदिरांत आहेत. त्यांना मूर्ती म्हणण्या-पेक्षा लाकडी ठोकळे म्हणणेंच जास्त बरोबर होईल. हे ठोकळे कुजून जाऊं नयेत म्हणून दर बारा वर्षांनी ते बदलले जातात.

येथील दुसरें वैशिष्ट्य म्हणजे भाताचा प्रसाद. जगन्नाथाला तिन्ही-त्रिकाळ मातीच्या मडक्यांत शिजविलेल्या वरण-भाताचा नैवेद्य दाखविण्यांत येतो. व तीं लहानलहान मडकीं प्रसाद म्हणून विकलीं जातात. २–४ आण्यांचा प्रसाद घेतला की पोटभर जेवण होतें. त्या दृष्टीने ही चांगली सोय म्हटली पाहिजे.

जगन्नाथाचें मंदिर मात्र अवाढव्य आहे. त्याची उंची २१४ फूट असून त्याचें आवारहि चांगलें ऐसपैस आहे. अनंग भीमदेव (सन ११८९ ते १२२३) याने हें देऊळ बांधलें. मुसलमानांच्या स्वाऱ्या व हल्ले यांना तोंड देऊन आज ज्या स्थितींत हें देऊळ उभें आहे. तें पाहिलें की यांतील चिवटपणा सहज लक्षांत येतो.

येथे नाजुक कलाकुसर किंवा अद्भुत कलाविलास पाहावयास सापडत नाही. किंबहुना येथील अश्लील व बीभत्स चित्रांमुळे हें मंदिर जास्तच बदनाम झालेलें आहे. भुवनेश्वर व कोणार्क येथील अश्लील चित्रांतहि एक प्रकारची जी नाजुक कला पाहावयास मिळते तिचा येथे मागमूसहि लागत नाही.

येथील पुजारी अत्यंत उर्मट व असभ्य म्हणून कुप्रसिद्ध आहेत. अर्थात् इतर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणीं जसे पंड्ये-पुजारी असतात त्यांहून हे कांही

वेगळे आहेत असें नाही; परंतु, आसपासची जनता गरीब असल्यामुळे यांचा उर्मटपणा उठून दिसतो.

जगन्नाथ हें उत्कलचें मुख्य दैवत असल्यामुळे जगन्नाथाचे रथोत्सव हेच येथील मुख्य सण अथवा उत्सव होत. रथयात्रा, चंदनयात्रा, झूलनयात्रा, रहसयात्रा, दोलायात्रा वगैरे उत्सव फार मोठ्या प्रमाणावर साजरे होतात. त्यांखेरीज दिवाळी, दूर्गापूजा ( दसरा ) वगैरे सणहि इतर प्रांतांप्रमाणेच साजरे होतात.


येथील जर कोणती गोष्ट मला सर्वांत जास्त आवडली असेल तर ती म्हणजे समुद्रकिनारा. एका रेषेंत आखल्याप्रमाणे लांबच लांब पसरलेला एवढा मोठा किनारा क्वचितच पाहावयास मिळतो. पहाटेच्या वेळीं समुद्रांतून स्नान करून वर येणाऱ्या सूर्याचें दर्शन घेण्यासाठी किती तरी लोक या चौपाटीवर फिरावयास येत असतात. अर्थात् क्षितिजाजवळ ढग असल्यामुळे लाटांवर हेलकावे खात वर येणारा भिजलेला सूर्य पाहण्याचें भाग्य फारच थोड्यांना लाभतें. परंतु, ज्यांना लाभतें त्यांचा आनंद काय वर्णावा !

परंतु, या किनाऱ्याचा भौतिक दृष्ट्या मात्र कांही उपयोग नाही; कारण तो फारच उथळ आणि उघडा आहे. यामुळे येथे बंदर बनूं शकलेलें नाही. येथेच नव्हे, तर सबंध ओरिसांत समुद्र असून बंदर नाही ! मात्र लहान लहान होड्यांतून खोल समुद्रांत जाऊन तेथे बोटी पकडतां येतात. या प्रदेशाचा सारा समुद्री व्यापार कलकत्ता व विझगापट्टण या बंदरांवर अवलंबून आहे. येथील कोळी आपल्या होड्या समुद्रांत नेतात तेव्हाचें दृश्य मोठें प्रेक्षणीय असतें. किनाऱ्याकडे धावत येणाऱ्या लाटा ओलांडून आंत शिरणें म्हणजे एक दिव्यच असतें.

## भुवनेश्वर : मंदिरांचें आगर

ओरिसाची नवी राजधानी म्हणून भुवनेश्वर हें शहर लोकांना माहीत होण्यापूर्वी ‘ मंदिरांचें आगर ’ या नात्यानेच तें कलावंतांना व लोकांना परिचित आहे. या ठिकाणीं कमींत कमी पांचशें लहान-मोठीं देवळें असावींत असा श्री. एम्. एम्. गांगुली या बंगाली संशोधकाचा अंदाज आहे.

यांपैकी लिंगराज, परशुरामेश्वर, वैताल, राजाराणी, मुक्तेश्वर वगैरे मंदिरें विशेष प्रेक्षणीय आहेत. लिंगराज मंदिराच्या आवाराची लांबी ५२० फूट असून रुंदी ४६५ फूट आहे. याच्या मुख्य शिखराची उंची जोत्यापासून १४७ फूट आहे. यावरून त्याच्या भव्यपणाची कल्पना येईल. या देवळांतील शिवलिंगहि अवाढव्य आहे. परंतु, भव्यता हाच कांही या देवळाचा विशेष गुण नव्हे. येथील कलाकुसरहि मोठी मोहक आहे. उदाहरणार्थ, पुरुषभर उंचीची एक पार्वतीची दगडी मूर्ति येथे आहे. तिच्या अंगावरील वस्त्र इतक्या नाजुकपणें कोरलेलें आहे, की त्यांतील रेषान् रेषा स्पष्ट दिसते. या व इतर मूर्तींचा दगड काळसर असून त्यांवर भक्त लोक तेल ओततात यामुळे त्या दगडी नसून लोखंडीच आहेत असा भास होतो. येथील केदार गौरी मंदिराच्या आवारांत स्फटिकासारखें निळसर पाणी असलेली विहीर आहे. तें पाणी औषधी म्हणून प्रसिद्ध आहे.



[ भुवनेश्वर-मंदिर ]

राजाराणी किंवा राजरानी हें मंदिर अनेक कारणांनी प्रेक्षणीय आहे. मुख्य म्हणजे या देवळांत देव नाही. मूर्तीची प्रतिष्ठापना होण्यापूर्वींच तें अर्धवट सोडून देण्यांत आलें असावें असें म्हणतात. यामुळे परधर्मीयांनाहि या देवळांत प्रवेश करतां येतो. दुसरें म्हणजे येथील कलाकुसर फार नाजूक व मोहक आहे. हें छोटेंसें टुमदार देऊळ इतर मंदिरांपासून दूर वाळीत पडल्यासारखें आहे, यामुळे तिकडे सामान्य प्रवाशांचें लक्ष जात नाही.

ओरिसाची जुनी राजधानी कटक हें शहर चारहि बाजूंनी महानदी व काठजुडी या नद्यांनी घेरलेलें असल्यामुळे त्याच्या दक्षिणेस वीस मैलांवर

असलेल्या भुवनेश्वर या इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं नवी राजधानी बांधण्याचें ठरविण्यांत आलें. भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पंजाब (चंदीगड) व ओरिसा या दोन प्रदेशांनीच आपल्यासाठी नव्या राजधान्या वसविल्या. त्या दृष्टीने हे प्रयोग इतर प्रांतांनी अभ्यासिण्यासारखे आहेत यांत शंका नाही. १३ एप्रिल १९४८ रोजीं भुवनेश्वरच्या नव्या राजधानीचा कोनशिला-समारंभ पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें करण्यांत आला. परंतु, बांधकामाच्या सामानाच्या टंचाईमुळे प्रारंभीं चार वर्षे विशेष काम होऊं शकलें नाही. त्यानंतर मात्र हें काम झपाट्याने सुरू झालें आणि आज तीनपंचमांश भाग बांधून पुरा झाला आहे. आतापर्यंत या कामावर पांच कोटि रुपये खर्च झाले असून जवळजवळ तेवढेच होतील असा अंदाज आहे. शहराला न पेलण्यासारखें अवाढव्य स्वरूप येऊं नये म्हणून त्याची पांच भागांत विभागणी करण्यांत आलेली आहे. यांपैकी प्रत्येक भाग बहुतेक बाबतींत—शाळा, क्रीडांगणें, बाजार व उद्यानें वगैरे बाबतींत—स्वयंपूर्ण करण्यांत आलेला आहे. सध्या सरकारी नोकरांच्या राहण्यासाठी घरें बांधून झालेलीं आहेत. त्यांच्या शेजारींच इतर लोकांना घरें बांधण्यास परवानगी देण्यांत येणार आहे. अद्यापि खासगी मालकांनी घरें बांधण्यास सुरुवात केलेली नाही. येथील घरें बैठी, एक मजली असल्यामुळे राजधानीची 'शान' त्यांच्यांत नाही. परंतु मोकळी हवा व स्वच्छता या दृष्टींनी तीं चांगलींच आहेत असें म्हणावें लागेल. मुलांच्या शाळा, बाजार, असेंब्ली-हॉल, मंत्र्यांचे बंगले, गेस्ट हाऊस वगैरे सर्वच इमारती अगदी साध्या आहेत. परंतु, साधेपणा-बरोबरच जी कलात्मक दृष्टि त्यांत असावयास हवी होती ती मात्र दिसत नाही. वस्तुतः भुवनेश्वर म्हणजे कलेचें आगर. तेथील कांही तरी कलेची छाप या नव्या राजधानीवर दिसावयास हवी होती. परंतु तेथील घरें अगदी हिंदी-छापाचीं दिसतात. याचें कारण त्यांच्या उभारणीचें कार्य स्थानिक शिल्पज्ञांच्या हातीं नसून सिंधी-पंजाबी ठेकेदारांकडे आहे हें तर नसेल? सध्या ही राजधानी म्हणजे माळरानच आहे. परंतु, लौकरच येथे उद्यानें-उपवनें होतील आणि प्रारंभीं निदान २५ हजार लोकांच्या निवाऱ्याची तरी सोय येथे होईल असें दिसतें.

## उत्कलचे थोर पुरुष

आधुनिक उत्कलचे निर्माते म्हणून उत्कलमणि गोपबंधु दास आणि मधुसूदन दास यांचीं नांवें प्रामुख्याने घेतलीं जातात. प्रांतांतील गरीब जनतेच्या सेवेचें व्रत गोपबंधु दास यांनी घेतलें होतें आणि तें त्यांनी आमरण पाळलें. गरिबांच्या सेवेपायीं त्यांनी आपल्या घरादाराची व मुलांबाळांचीहि चिंता केली नाही. त्यांचेच शिष्य आचार्य हरिहर दास. ते आज हयात असून इतक्या उतारवयांतहि त्यांचें समाजकार्य चालू आहे. शिक्षणप्रसार, हरिजनसेवा, खादीचा प्रचार वगैरे कार्यें त्यांनी मुख्यतः केलीं आहेत.

आजच्या उत्कल प्रांताची कल्पना मधुसूदन दास यांची. हा प्रांत स्वावलंबी व्हावा यासाठी त्यांनी लोकांना उद्योगधंद्यांची गोडी लावली आणि लहान-मोठे कारखाने सुरू केले.

या तीन महापुरुषानंतर ओरिसाचे माजी मुख्य मंत्री श्री. नवकृष्ण चौधरी यांचे थोरले बंधु प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते श्री. गोपबंधु चौधरी यांचें नांव घेतलें पाहिजे. निरलसपणें व निरभिमान वृत्तीने लोकसेवा कशी करावी याचा आदर्श म्हणून श्री. गोपबाबू व त्यांच्या पत्नी श्रीमती रमादेवी चौधरी यांच्याकडे बोट दाखवितां येईल. त्यांचे बंधु श्री. नवकृष्ण चौधरी व त्यांच्या पत्नी श्रीमती मालतीदेवी चौधरी हेहि उत्कृष्ट कार्यकर्ते म्हणून प्रसिद्ध आहेत हें चौधरी घराणें शिक्षणांत व समाजकार्यांत अत्यंत पुढारलेलें आहे. श्री गोपबाबू पूर्वी फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेट म्हणून काम करीत होते त्या वेळीं बालासारे जिल्ह्यांत खूप मोठा पूर आला. त्या पुरांत सापडलेल्या लोकांच्या मदतीसाठी सरकारने हजारो रुपये खर्च केले पाहिजेत अशी परिस्थिति होती; परंतु मॅजिस्ट्रेट या नात्याने त्यांनी फक्त दहा हजार रुपयांपर्यंतच खर्च येईल असा रिपोर्ट तयार करावा म्हणून श्री. गोपबाबूंवर दडपण आणण्यांत आलें तें सहन न होऊन त्यांनी आपल्या जागेचा राजीनामा दिला.

श्री. नवबाबू व श्रीमती मालतीदेवी यांचें शिक्षण रवीन्द्रनाथांच्या शांतिनिकेतनमध्ये झालेलें असून अव्वल दर्जाचे कलावंत व कलारसिक म्हणून ते लोकांना परिचित आहेत. उडिया व बंगाली लोकांमधील कटुता

कमी करण्याच्या कामीं या पतिपत्नींनी मोठीच कामगिरी बजावली आहे असें म्हणतां येईल.

मुंबईचे माजी राज्यपाल श्री. हरेकृष्ण मेहताब ही उत्कलमधील फार मोठी शक्ति आहे. नुसत्या कर्तबगारीचा विचार केल्यास श्री. मेहताब यांचा क्रमांक खूपच वर लागेल. उत्कलच्या गेल्या मंत्रिमंडळामध्ये ते मुख्य मंत्री होते आणि अजूनहि त्यांच्याबद्दल जनतेंत व सरकारी नोकरांत खूपच आत्मीयता दिसून येते. त्यांनी पुन्हा उत्कलच्या राजकारणांत प्रवेश करून प्रांताचीं सूत्रें आपल्या हातीं घ्यावीत असें म्हणणारे अनेक लोक मला ओरिसांत भेटले. ते उत्कृष्ट लेखक व इतिहासतज्ञ म्हणूनहि प्रसिद्ध आहेत.

उत्कलच्या प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री. विश्वनाथ दास हेहि मोठे कर्तबगार पुरुष आहेत. ते पूर्वी उत्कलचे मंत्रीहि होते.

## उत्कलच्या भाषिक मागण्या

भाषावार प्रांतरचनेच्या वेळीं कोणीं काय मागण्या कराव्यात याला कांही धरबंदच राहिलेला नाही. याला उत्कलहि कसा अपवाद असणार ? त्याला मध्यप्रदेशांतील बस्तर, बिलासपूर, खरियाल व पद्मपूर वगैरे जिल्हे हवे आहेत, तर बिहारमधून सराईकेला, खरा सुवान, ढालभूम, सिंहभूम, मानभूम वगैरे भाग हवा आहे. त्याला बंगालमधून मिदनापूर, कंठी हे भाग हवेत आणि मद्रासमधून मंजुषा व इतर कांही प्रदेश हवा आहे. अर्थात् इतर प्रांतांप्रमाणे धाकदपटशा व मारामाऱ्या यांवर उत्कलवासीयांचा विश्वास नसल्यामुळे कायदेशीर मार्गानेच जे कांही मिळेल तेवढें घ्यावें अशी त्यांची विचारसरणी आहे अर्थात् यांपैकी फारच थोडा भाग त्याला मिळण्याची शक्यता आहे. कारण, इतर प्रदेश सुखासुखी आपली भूमि सोडण्यास तयार होतील असें दिसत नाही. यांतील बराच भाग आदिवासींचा असल्यामुळे तो अमुक एका भाषेंत मोडतो असें ठरविणें कोणालाहि कठीणच जाणार आहे.

अधिकांश एकत्र कुटुंबपद्धति आहे. मात्र आदिवासी लोकांत पाश्चात्त्यां-प्रमाणे विभक्त कुटुंबपद्धति आहे. विवाह होतांच मुलगा वेगळें घर थाटतो.

शिक्षितांमध्ये विभक्त होण्याची प्रवृत्ति वाढत आहे. पडदापद्धति नाही. परंतु, वडील मंडळींच्या समोर येण्याची सुनांना परवानगी नसते.

**सणवार**

( १ ) पणा संक्रांति : वैशाखाच्या पहिल्या दिवशीं ठिकठिकाणीं जत्रा भरतात.

( २ ) रजसंक्रांति : आषाढ शुद्ध प्रतिपदा–तीन दिवस सर्वत्र सुट्टी असते. शेतकरी वगैरे सर्व कामें बंद करतात. स्वयंपाकहि होत नाही; खेळ खेळतात. हुतुतूला प्राधान्य असतें. स्त्रियांचे वेगळे खेळ आहेत.

( ३ ) भाद्रपदांतल्या प्रत्येक रविवारीं मुली देवीची पूजा करतात.

( ४ ) दिवाळीपासून कार्तिक पौर्णिमेपर्यंत ' हविष्य ' राखतात. तो उपवासाचा एक प्रकार असतो. त्यांत कांही विशिष्ट पदार्थच खातां येतात.

( ५ ) रथयात्रा : आषाढ शुद्ध द्वितीया– ९ दिवस चालते.

( ६ ) अग्नि उत्सव : माघ मौर्णिमेला. घरोघर कचऱ्याची आग पेटवून गाव स्वच्छ करतात.


( ७ ) कुमार पौर्णिमा ( कोजागरी ) : याआधी महिनाभर मुली चंद्राची पूजा करतात व या दिवशीं सकाळीं सूर्याची पूजा करून संध्याकाळीं चंद्राची पूजा करतात.

( ८ ) प्रथमा अष्टमी ( कार्तिक ) : प्रथम-संतानाची पूजा करतात.

( ९ ) अशोकाष्टमी ( चैत्र )–या दिवशीं अशोकाचीं फुलें खातात. म्हणजे वर्षभर शोक होत नाही अशी समजूत आहे. याखेरीज गणेश-चतुर्थी, गोपाष्टमी, नवरात्र, दसरा, दिवाळी, दीपदान, ( कार्तिक पौर्णिमा ) वसंतपंचमी, मकर संक्रांति, धनु संक्रांति, होळी, राखी पौर्णिमा, देवस्नान पौर्णिमा, ( ज्येष्ठ–या दिवशीं जगन्नाथाला स्नान घालण्यांत येतें. ) चंदन पौर्णिमा ( वैशाख ) वगैरे अनेक सणांची रेलचेल उत्कलमध्ये आहे.

**लग्नकार्यं**

वेगवेगळ्या जातींत वेगवेगळे रिवाज आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्या-जिल्ह्यांतहि फरक पडतो. मुलीच्या घरीं लग्न होतें व मुलाकडील फक्त पुरुष मंडळीच लग्नाला जातात. लग्नांत भांडण केलेंच पाहिजे अशी एक पद्धत आहे. जेव्हा लग्न ठरविण्यांत येतें तेव्हा मुलीचा बाप मुलाच्या बापाला विचारतो, “ तुम्हांला काय हवं ? ” तो उत्तर देतो, “ मुलगी व तुलसीपत्र ! ” त्याप्रमाणें तेवढेंच देण्याची पद्धत होती. पण आजकाल सायकल, मोटार, शिक्षणाचा खर्च वगैरे देण्यांत येतो. हुंडा मागण्याची पद्धत नाही. मुलीचे वडील जें द्यायचें असेल तें देतात, पण आजकाल शिकलेले लोक पुष्कळ मागण्या करूं लागले आहेत.



# भारताची एकात्मता

भारत देश हा एक व अखंड आहे असें आपण हजारों वर्षांपासून म्हणत व मानीत आलों आहोंत. परंतु, भारताच्या एकात्मतेचा व अखंडत्वाचा आपला अनुभव बहुतांशीं भावनात्मकच असतो. लहानपणीं वडील माणसें सांगतात म्हणून आपण तें खरें मानून चालतों आणि मोठेपणीं संसारचक्रांत गुरफटून गेल्यामुळे त्यासंबंधी विचार करण्यास किंवा प्रत्यक्ष अनुभव घेण्यास आपल्याला सवडच होत नाही—आणि तशी ती झाली तरी सर्व देशभर भटकून येण्याची शक्यता आपल्यापैकी फारच थोड्यांच्या बाबतींत असते, यामुळे बालपणीं झालेल्या संस्कारांना सत्य मानून आपण भारताची एकात्मता निर्विवाद आहे असें गृहीत धरूनच चालतों. अर्थात् या संस्कारजन्य भावनेलाहि महत्त्व असतेंच आणि ती चांगलीच प्रभावीहि असते यांत शंका नाही. परंतु आजच्या विज्ञानाच्या जमान्यांत केवळ भावनेवर भरंवसा ठेवून भागणार नाही तिला प्रत्यक्ष अनुभवाची जोड दिली तरच ती टिकूं शकेल.

या दृष्टीने जेव्हा मी विचार करूं लागतों तेव्हा मलाच माझ्या भाग्याचा हेवा वाटूं लागतो. माझ्या पायावर चक्र आहे की नाही हें मला माहीत नाही; परंतु वयाच्या दहाव्या वर्षीं मी जो घरांतून बाहेर पडलों तो गेलीं

सत्तावीस-अठ्ठावीस वर्षें सारखा भटकतों आहें. कधी पायीं, कधी सायकलवर, कधी मोटारींतून तर कधी आगगाडींतून !

अर्थात् १९३८ पर्यंत म्हणजे पुण्याच्या नूतन मराठी विद्यालयांतून मॅट्रिकला बसेपर्यंत माझें क्षेत्र कोल्हापूर, वाई, पुणें, मुंबई, खानदेश एवढ्या प्रदेशापुरतेंच मर्यादित होतें. परंतु, मॅट्रिकचा निकाल लागण्यापूर्वीच मी वर्ध्याला गेलों आणि तेव्हापासून माझी जी अखिल भारतीय भ्रमंती सुरू झाली ती गेलीं वीस-बावीस वर्षें सतत चालू आहे. वर्षांतून चार-पांच महिने तरी मी घराबाहेर काढतों आणि एखाद्या फिरत्या एजंटाप्रमाणे कांही धंद्यासाठी मी हें फिरत नाही, तर आपला हा भारत देश आहे तरी कसा, या भारतांतील आपले देशबांधव खरोखरीं कसे आहेत, तें प्रत्यक्ष स्वतःच्या डोळ्यांनी पाहावें, अनुभवावें आणि लेखांच्या द्वारें इतरांना त्याची प्रचीति आणून द्यावी याच उद्देशाने मी भटकत असतों. आणि काश्मीर व आसाम हे दोन प्रदेश सोडल्यास बाक़ी साऱ्या प्रांतांतून मी कमी-अधिक प्रमाणांत हिंडलों आहें. बिहार व ओरिसा आणि कर्नाटक व तामिळनाडसारख्या कांही प्रांतांतून एकाहून अधिक वेळां गेलों आहें; तर पंजाब, राजस्थान, बंगालसारख्या प्रांतांतून फारच थोडा हिंडलों आहें. तरी पण भारताच्या बहुतेक भागांचें दर्शन मला घडलें आहे आणि तेथील लोकांची तोंडओळख मला झाली आहे, असें मी आत्मविश्वासपूर्वक म्हणूं शकतों. आणि म्हणूनच हा विषय मीं पसंत केला आहे.

युरोपियन लोक जेव्हा आपल्या देशांत येतात आणि येथे हिंडून देश पाहतात तेव्हा ते मोठमोठ्या शहरांतील बादशाही हॉटेलांत राहूनच या देशाचें निरीक्षण करतात. यामुळे त्यांना खरा देश कधी दिसतच नाही; व मग या देशासंबंधी मनास येईल तें ते लिहितात. त्यांचेंच अनुकरण आपल्यापैकी सुशिक्षित व पैसेवाले लोक करतात. परंतु मी मात्र हॉटेलांत राहणें कटाक्षाने टाळतों. ( अर्थात् आर्थिक दृष्ट्या तें मला शक्यहि नसतें म्हणा ! ) माझ्या सुदैवाने देशभर मला पुष्कळ मित्र लाभलेले आहेत आणि आतिथ्य हा आपल्या भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असल्यामुळे माझ्यावर तसा प्रसंगहि क्वचितच येतो.

आता सौराष्ट्रांतलाच अनुभव सांगतों.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



वि: क्रमांक ......
नों: दि: ..........

एरव्ही मी माझ्या कांही कामासाठी जेथे जातों त्याच्या आसपासचीं ठिकाणें पाहून येतों. परंतु, सौराष्ट्रांत मात्र मी खास त्या प्रदेशाची ओळख करून घेण्यासाठीच गेलों होतों. आणि गुजरात व सौराष्ट्रांत मिळून चांगले वीस-एकवीस दिवस मीं काढले. परंतु, या प्रवासांत मला एकदांहि हॉटेलांत खावें लागलें नाही की धर्मशाळेंत उतरावें लागलें नाही. इतकेंच नव्हे तर भावनगरसारख्या शहरीं पुण्याच्या वाडिया कॉलेजांतील प्राध्यापक श्री. जगदीश यांच्या प्रेमळ आग्रहावरून मला त्यांच्या घरीं राहावें लागलें तेव्हा सुप्रसिद्ध गुर्जर साहित्यिक कै. झवेरचंद मेघाणी यांचे चिरंजीव श्री. महेंद्र मेघाणी ( ‘ मिलाप ’ मासिकाचे संपादक ) हे मी त्यांच्याकडे न उतल्या-बद्दल माझ्यावर चांगलेच रागावले.

सुप्रसिद्ध गुजराती कवि व कथाकार श्री. नाथालाल दवे यांना मी सौराष्ट्रांत हिंडणार असल्याचें कळविलें तेव्हा त्यांनी ठिकठिकाणच्या आपल्या मित्रांना पत्रें लिहून माझी उतरण्याची व जेवाणाखाण्याची व्यवस्था केली. ती व्यवस्था इतकी उत्कृष्ट झाली की, भारतासारख्या आपल्या गरीब देशांतील मध्यमवर्गीय साहित्यिकांनी व कलावंतांनी देशांत हिंडावयाचें असेल तर याच पद्धतीचा अवलंब केला पाहिजे असें माझें ठाम मत झालें. कारण, त्यामुळे हॉटेलासाठी होणारा भरमसाट खर्च वांचतो, एवढेंच नव्हे तर त्या त्या प्रदेशांतील लोकांशीं निकटचा संबंध निर्माण होऊन त्यांची खरी ओळख पटते.

सौराष्ट्र-गुजरातेंतील लोकांच्या आतिथ्यशीलतेबद्दल मीं पूर्वी बरेंच ऐकलें होतें. परंतु, हें आतिथ्य उपभोगण्याचें भाग्य फक्त गुर्जर मंडळींनाच लाभत असावें अशी माझी कल्पना होती. शिवाय मी सौराष्ट्रांत गेलों त्या वेळीं मुंबईच्या प्रश्नावरून गुजरात-महाराष्ट्रांतील वातावरण भलतेंच तापलेलें होतें. यामुळे तेथे आपलें कसें काय स्वागत होणार याबद्दल मी अत्यंत साशंक होतो; परंतु प्रत्यक्ष अनुभव मात्र वेगळाच आला. मी कुणी बाहेरचा माणूस आहे असें मला एकाहि ठिकाणीं वाटलें नाही. सौराष्ट्रीय जनता आणि महाराष्ट्रीय जनता यांच्यांत खूपच साम्य असलेलें मला आढळलें. विद्येविषयी प्रेम, पराक्रमाची हौस व परंपरा आणि स्त्री-पुरुषांतील समता हे तीन गुण दोन्ही समाजांत समान आहेत. आणि यामुळेच बहुधा मराठी

लोकांबद्दल आणि शिवाजीमहाराज व लोकमान्य टिळक यांच्याबद्दल सौराष्ट्रीय जनतेंत विशेष आकर्षण असावें. बिहार, उत्तर प्रदेशांत हिंडतांना आपल्याला असें वाटतें की, आपण फक्त पुरुषांच्या देशांतूनच फिरत आहोंत. या भागांत स्त्री नांवाचा प्राणी नाहीच; परंतु सौराष्ट्रांतील स्त्रिया व मुली इतक्या मोकळेपणाने समाजांत वावरतात की, त्या बाबतींत मराठी स्त्रियांना त्या मुळीच हार जाणार नाहीत.

सौराष्ट्रांत महाराष्ट्राप्रमाणेच जातीयता आहे. किंबहुना असें म्हणतां येईल की, भारतांत आपण कोठेहि गेलों तरी ‘ जात ’ आणि ‘ जातीयता ’ यांचें वर्चस्व खूपच असलेलें दिसून येतें. या आपल्या देशांत ‘ धर्म ’ हा नुसता नांवाचाच आहे. खरी आहे ती ‘ जात ’ च ! परंतु प्रत्येक ठिकाणीं जातीयतेचें स्वरूप मात्र वेगवेगळें असल्याचें दिसून येतें. बिहारमध्ये भूमिहार व रजपूत यांचा झगडा आहे, तर उत्तर प्रदेशांत कायस्थ व ब्राह्मण यांच्यांत संघर्ष आहे. महाराष्ट्रांत ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद आहे, तर तामीळनाडमध्ये ब्राह्मण-ब्राह्मणेतरवादाने द्रविड विरुद्ध आर्य असें स्वरूप धारण केलेलें आहे. सौराष्ट्रांतील जातीय वाद हा एका वेगळ्याच प्रकारचा आहे. तेथे प्रत्येक जातीच्या अनेक पोटजाती असून त्या आपल्याला स्वतंत्र धर्मच समजतात. केवळ ब्राह्मणांचीच गोष्ट घेतली तर औदिच्य, नागर, श्रीमाळी खेडावाळ वगैरे अनेक पोटजाती त्यांच्यांत असून त्यांच्यामध्ये लग्नसंबंध होत नाहीत. अशा प्रकारें हा जातीय वाद इतका विखुरलेला आहे की, त्याचा राजकारणावर फारसा परिणाम झालेला दिसून येत नाही.

सौराष्ट्रांतील विवाहित स्त्री ओळखण्याची खूण म्हणजे तिच्या हातांतील बांगड्या व नाकांतील चमकी ही होय. ( बंगालमध्ये हातांतील शंखाच्या बांगड्या ही सौभाग्यखूण आहे. महाराष्ट्रांत बांगडी ही एकमेव सौभाग्यखूण नसली तरी ती एक महत्त्वाची खूण आहेच. ) परंतु अलीकडे कुंकू लावण्याची प्रथाहि सौराष्ट्रांत वाढूं लागली आहे. मला वाटतें, सिनेमामुळे ही कुंकुम-कला सर्व देशभर लोकप्रिय होत आहे. कारण, आतां बंगाल-मध्येहि बायका कुंकू लावूं लागल्या आहेत. भारतीय स्त्रीमध्ये एकात्मता निर्माण करण्यास हें कुंकू हातभार लावील अशी आशा करण्यास हरकत नसावी !

११३e२ मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ २६४४८ मू-प्रवास क्रमांक नों: दि: २४।३।



आपल्या परंपरागत मूर्तिपूजेविरुद्ध कितीहि बंडे पुकारलें तरी ती आपल्या देशांतून सुखासुखी किंवा फार लौकर जाईल असें मला वाटत नाही. किंबहुना कांही शिक्षित मंडळींमध्ये मूर्तिपूजेचा प्रसार वाढत असलेला पाहून ती कधी काळीं आपल्यांतून जाईल की नाही याबद्दलहि मला शंका वाटते. मला वाटतें, भारतीय संस्कृतीच्या एकतेचें मूर्तिपूजा हेंहि एक प्रतीक असावें. जेथे मूर्तिपूजा आहे तेथे सुधारलेला अध्यात्मवाद येत आहे. सारांश काय की, आपल्या देशांत निव्वळ भौतिकवादाला प्राधान्य देणारे लोक नेहमीच अत्यंत थोडे राहणार असें दिसतें.

या दृष्टीने मद्रासचा माझा अनुभव मोठा मजेदार आहे. 'आणि माणसाचा मुडदा पडला' या कादंबरीचे लेखक व प्रख्यात चित्रपट-कथा-लेखक श्री. रामानंद सागर हे त्या वेळीं मद्रासच्या जेमिनी कंपनींत पटकथा लिहीत होते. मी कांजीवरम्–(कांचीपुरम्)–च्या सर्वोदय सम्मेलनास आल्याचें कळतांच ते मला भेटण्यासाठी मद्रासहून कांजीला आले. त्यांच्या-बरोबर जेमिनींतील तामीळ पटकथा-लेखक व महाकवि श्री. कोत्तमंगलम् सुब्बु हेहि होते. पहिल्याच भेटींत श्री. सुब्बूशीं इतकी मैत्री जडली की, मुद्दाम मद्रासला जाऊन त्यांच्याबरोबर कांही तास घालविण्याचें मीं ठरविलें. श्री. सुब्बु यांचा स्वतःचा बंगला व मोटारहि असल्यामुळे माझा पुष्कळ वेळ वांचला हें सांगणें नकोच. पण त्यांच्या घरांत वावरतांना एखाद्या महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय पांढरपेशाच्या घरांतच आपण आहोंत असें मला वाटत होतें. पाहुण्यांच्या गर्दीमुळे 'आव जाव घर तुम्हारा' पद्धतीच्या देशस्थ घराण्यांची मला आठवण झाली. आणि जेवण-घरांतील साधेपणा पाहून तर मीं सुब्बूंना सांगून टाकलें की, तुम्ही पक्के देशस्थ आहांत! जेवणांत अवडंबर असें नव्हतेंच. भात, सांबार अन् एक – दोन भाज्यांचें अगदी साधें जेवण. तेंहि केळीच्या पानावरील. केळीच्या पानाखेरीज दुसरें पात्र ( वाटी वगैरे ) नाही. यामुळे स्टेनलेस स्टील अथवा चांदी यांचा बडेजाव तेथे आढळत नाही. आपल्याकडे माणसाला जरा जास्त पैसा मिळूं लागला की, पाटावर बसून जेवणें त्याला कमीपणाचें वाटूं लागतें. टेबल–खुर्चीचा उपयोग आपण केला नाही तर आपल्या इभ्रतींत कांही तरी उणेपणा राहून जाईल अशी भीति त्याला वाटते की काय कोण जाणे! –

अर्थात् टेबलाचा कांही विशेष उपयोग होतो, सुटसुटीतपणा येतो वगैरे गोष्टी नजरेआड करतां येणार नाहीत. पण् त्यापेक्षा भपक्यालाच बहुतेक लोक महत्त्व देतात यांत शंका नाही. श्री. सुब्बु यांच्या घरीं मात्र आम्हीं अगदी जमिनीवर—अक्षरशः जमिनीवर—बसून जेवण केलें. बसायचा पाट घेण्याची जरूरच नव्हती इतकी मऊ व गुळगुळीत जमीन होती.

"जेवणामध्ये तुम्ही वाट्यांचा उपयोग कां करीत नाही ?" असें मीं त्यांना विचारलें, तेव्हा ते म्हणाले, "जेवणांत भांडं घेतलं की तें उष्टं निखरकटं होतं. असं भांडं पुनः विस्तवांत घालून शुद्ध करून घ्यावं लागतं. म्हणून आम्हांला सगळा कारभार केळीच्या पानावरच आटोपता घ्यावा लागतो." भारतीय संस्कृतींतील सोवळ्या-ओवळ्याच्या व स्वच्छतेच्या कल्पनांचा अतिरेक दक्षिणेकडेच पाहावयास मिळतो. आधुनिक विज्ञानाच्या दृष्टीने त्यांत काही दोष असतील, परंतु त्या लोकांची निष्ठा वाखाणण्यासारखी आहे यांत शंका नाही. पुष्कळशा सिनेमावाल्यांप्रमाणे श्री. सुब्बु हेहि अत्यंत ईश्वरभक्त व कर्मठ आहेत. जानवें, गंध, पूजा-अर्चा वगैरे गोष्टी ते अगदी कटाक्षाने पाळतात. अर्थात् इतकें असूनहि ते जातिभेद मात्र मुळीच पाळत नाहीत. यामुळे नवीन सुधारकांशीं त्यांचा खटका उडण्याचा प्रसंग येत नाही.

मुसलमानांच्या राजकीय व सांस्कृतिक स्वाऱ्यांपासून सुरक्षित राहिल्यामुळे दक्षिण भारतांत आपल्याला भारतीय संस्कृतींतील दोन महत्त्वाच्या बाबी स्पष्ट दिसून येतात. एक म्हणजे साधेपणा आणि दुसरी म्हणजे अस्मिता. कांचीपुरम्च्या संमेलनाच्या वेळीं मद्रासचे मुख्य मंत्री श्री. नाडर यांना जवळून पाहण्याची संधि मिळाली होती. खाली एक लुंगी व सदरा या दोन वस्त्रांनिशीं हे मुख्य मंत्री वावरत होते. यामुळे सामान्य नागरिक व मुख्य मंत्री यांच्यांत कांही फरक आहे असें वाटतच नव्हतें. दक्षिण भारतीय माणूस कितीहि उच्च पदावर गेला तरी आपली लुंगी व सदरा सोडीत नाही. कांही लोक ऑफिसमध्ये कोट-पालटूण वापरतात, परंतु, त्यांची संख्याहि अगदी बोटांवर मोजण्याइतकीच असते. शिवाय, कचेरींतून घरीं आल्याबरोबर त्या पोषाखाचा त्याग करून नेहमीची लुंगी गुंडाळण्याची त्यांना घाई झालेली असते. विदेशी वेषभूषेचें वेड महाराष्ट्रांत

जितकें आढळतें तितकें इतरत्र कोठेंच आढळत नाही. याच्या उलट, आंध्र, तामिळनाड, केरळ, उडीसा व बंगाल या प्रदेशांतील लोकांमध्ये आपल्या स्वतःच्या कपड्यांबद्दल एक प्रकारची जिद्द आढळून येते. ऐन इंग्रजी अमदानींत त्यांनी या बाबतींतील आपला आग्रह सोडला नाही. त्यामुळे आता ते तो सोडतील असें वाटत नाही. आम्ही मराठ्यांनी पोषाखाच्या बाबतींतील अस्मितेचा त्याग केलेला असल्यामुळे मला या लोकांबद्दल विशेष कौतुक व आदर वाटतो. बंगालपासून केरळपर्यंतच्या या पट्ट्यामध्ये पोषाखाच्या बाबतींतील हा आग्रह हीसुद्धा भारताच्याच एकात्मतेची एक खूणच समजली पाहिजे.

शेंडी–जानव्याच्या बाबतींतहि महाराष्ट्राखेरीज इतर बहुतेक प्रदेशांत फार कडवा आग्रह दिसून येतो. या बाबतींत बिहारी कम्युनिस्टांचें उदाहरण वाचकांना मजेदार वाटेल. तेथील हिंदुसभावाले, जनसंघवाले, कॉंग्रेसवाले व समाजवादी हे तर शेंडी–जानवें आणि स्त्रियांतील पडद्यापद्धति यांना चिकटून आहेतच, पण कम्युनिस्टहि अद्यापि शेंडी–जानव्याचा त्याग करायला तयार नाहीत. मग स्त्रियांना पडद्याबाहेर आणण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. मुस्लिम शासकांच्या जुलूम–जबरदस्तीची प्रतिक्रिया या दृष्टीने त्यांच्या या वृत्तीकडे पाहिल्यास तिचें समर्थन करतां येतें. परंतु, ही प्रतिक्रिया अजूनहि कशी थांबूं नये याचें मात्र आश्चर्य वाटतें. आमच्या महाराष्ट्रांत पुरोगामी मंडळीच नव्हे तर हिंदुसभावाले व जनसंघीय मित्रहि शेंडी–जानव्याची किंवा सोवळ्या–ओवळ्याची मुळीच पर्वा करीत नाहीत ही गोष्ट जेव्हा मीं बिहारी कम्युनिस्ट मित्रांना सांगितली तेव्हा त्यांनी आश्चर्याने तोंडांत बोट घातलें.

बिहारमधील हिंदु लोक कटाक्षाने धोतर नेसतात. विजार हा फक्त मुसलमानांचा पोशाख आहे. त्यामुळे मी जेव्हा विजार घालून तेथील हॉटेलांत जाई तेव्हा मी अ-हिंदु आहें असें समजून (डोकीवर तर शेंडी नसेच !) तेथील लोक मला कसें अस्पृश्यासारखें वागवीत याची आठवण झाली की अजूनहि हसूं येतें. तेथील लोकांच्या मानसिक मागासलेपणाची माहिती मला नसती तर त्यांच्याकडून मिळणाऱ्या त्या अपमानास्पद वागणुकीमुळे माझें माथें भडकलें असतें. पण, बारा गांवचें पाणी प्याल्यामुळे

माझें डोकें शांत ठेवून त्यांतूनहि आनंद मिळवूं शकत असे. कांही गोऱ्या राष्ट्रांत काळ्या लोकांना अपमानास्पद रीतीने वागविलें जातें म्हणून आपण अकांडतांडव करतों. परंतु, आमच्या स्वतःच्या देशांत भिन्न जातीय व भिन्न धर्मीय लोकांना आपण कसें वागवितों हें जेव्हा आपण पाहतों. तेव्हा गोऱ्यांना नांवें ठेवण्याचा अधिकार आपल्याला पोचत नाही असें मला वाटतें. उच्च-नीच-भाव आणि शिवाशीव यांच्या बाबतींतील प्रवृत्ति साऱ्या भारतांत सारखीच आढळते.

याजबरोबर आमच्या इतिहासामुळेहि आमच्यामध्ये एक प्रकारची एकात्मता निर्माण झालेली आहे. महाराष्ट्रांतील शिवाजी, राजस्थानचा राणा प्रताप, पंजाबचा रणजितसिंह, वगैरे ऐतिहासिक महापुरुषांबद्दल सर्व देशभर सारखाच आदर आढळतो. आधुनिक भारतांतील टिळक, गांधी, टागोर, नेहरू यांच्याबद्दलहि एक विलक्षण आत्मीयता देशांत सर्वत्र आढळून येते आणि आपण सारे एकाच भारतमातेचीं लेंकरें असून आपल्याला एकत्रच नांदावयाचें आहे ही भावना प्रत्येक सुबुद्ध व्यक्तींत दिसून येते. आपल्या भारतभूमीबद्दल विलक्षण अभिमान देशांत सर्वत्र दिसून येतो. आणि यामुळेच आसाममध्ये पुराचें संकट कोसळलें तर केरळचा नागरिक दुःखी होतो आणि मद्रासकडे रेल्वेचा अपघात झाला तर पंजाबी शीखाचा जीव अस्वस्थ होतो. ऑलिंपिक सामन्यांत पंजाबी हॉकी टीमने जागतिक विजय मिळवला की मराठी माणसाची छाती अभिमानाने फुलून जाते आणि बंगाली चित्रकाराला जागतिक कीर्ति मिळाल्याचें ऐकून कन्नड भाषिकाला अभिमान वाटतो– हे सारे भारतीय एकात्मतेचेच साक्षात्कार नव्हेत काय ?

❂ ❂ ❂

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २५.४.४.६० वि: भू-प्रवास
क्रमांक २५६ नों. दि.
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. क्र. ११३६२

REFBK-0011392

REFBK-0011392